म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें.
विषय नाटक
दा. क्र. २२२१२

# जयवंत दळवी



IRBK-0122212

# पुरुष

वाचनालय नारक

22292

७

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :–खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

20 MAR 1996

27 AUG 1998

27 MAY 2000

2 OCT 2001

( क्र. मा. पहा )
५०००–११–८६

# स्पर्श

स्वतंत्र सामाजिक नाटक

जयवंत दळवी

मॅजेस्टिक प्रकाशन

IRBK-0122212

पहिली आवृत्ती :
जुलै, १९८७

© सौ. उमा दळवी, १९८७

प्रकाशक :
अशोक केशव कोठावळे
मॅजेस्टिक प्रकाशन
३१६, प्रसाद चेंबर्स
गिरगाव, मुंबई ४.

मुद्रक :
रवींद्र केशव कोठावळे
ॐ मुद्रणालय
२५० अ, शनिवार पेठ
पुणे ३०.

मुखपृष्ठ :
कमल शेडगे

मूल्य : २० रुपये

'स्पर्श' नाटकाचा प्रथम प्रयोग
घि गोवा हिंदू असोसिएशन (कला विभाग), मुंबई,
या संस्थेतर्फे शनिवार, ११ ऑक्टोबर, १९८६ रोजी
दुपारी ४ वाजता रवीन्द्र नाट्य मंदिर, मुंबई, येथे
सादर करण्यात आला.

दिग्दर्शन–नेपथ्य–प्रकाशयोजना | दामू केंकरे
पार्श्वसंगीत | अशोक पत्की
ध्वनिसंकलन | राजा देसाई
रंगभूषा | अशोक पांगम

सीता | भावना
रामराव | विश्वास मेहेंदळे
नाटेकर | मोहनदास सुखटणकर
विनू | विवेक लागू
रेखा | गौरी पडते
वीणा | निर्मल कामत
सुधीर | शशांक बावकर
नीता | रुपाली नार्वेकर
तात्या | अविनाश इंगळे

या नाटकाच्या तालमींना प्रारंभ करण्यापूर्वी
परवानगीसाठी लिहा :

जयवंत दळवी | १३, विकास | भवानीशंकर रोड | मुंबई ४०० ०२८

# अंक पहिला

2292
नाटक

[ जिल्ह्याचे ठिकाण. रामराव करंदीकरांचा जुनाट बंगला. रामराव करंदीकर हे परंपरेने जमीनदार आणि व्यवसायाने वकील. वयाने अंदाजे पंचावन्न.

पडदा वर जाताच बंगल्यातला दिवाणखाना दिसतो. दिवाणखाना ऐसपैस आहे. समोर मध्यभागी मुख्य दरवाजा आहे. जुन्या पद्धतीचा, कोरीव काम असलेल्या लाकडी चौकटीचा. दरवाज्यापलीकडे अंगण आहे. अंगणाचा थोडासा भाग लक्षात येतो. तिथेच उजवीकडे एखादी खोली असावी— दिसत नसली, तरी. त्या खोलीत वकीलसाहेबांची कचेरी आहे. शिवाय तिथेच पलीकडे त्यांची जुनी मोटार आहे! मुख्य दरवाज्यातून त्या अंगणात काही वावर दिसतो—एखादे दुसरे अशील येऊन गेल्याचा किंवा एखादा—दुसरा नोकर इकडून तिकडे गेल्याचा वावर. अंगणाच्या डावीकडल्या भागाकडे गोठा असावा. तिथे एखादी—दुसरी गाय आहे. अंगणाच्या एका टोकाला बकुळीचे मोठे झाड आहे. त्याच्या काही फांद्या दिसतात किंवा दिसत नाहीत. पण त्या बकुळीच्या भोवती पार आहे. पारावर बकुळीच्या मुळाशी छोटी गणपतीची दगडी मूर्ती आहे. तिथे निरांजन लावण्याची प्रथा आहे. अर्थात यांतले काही दिसत नाही. हा बंगला रेल्वे-स्टेशनला अगदी जवळ आहे. त्यामुळे गाडी गेल्याचा, शंटिंगचा किंवा शिट्ट्यांचा असा आवाज अधूनमधून येत असतो.

दिवाणखान्याला आणखी तीन खोल्या जोडलेल्या आहेत. उजवीकडे रामरावांची झोपण्याची खोली आहे. डावीकडे त्यांचा मुलगा विनायक याची झोपण्याची खोली आहे. त्याच्या डावीकडे आणखी एक खोली आहे. तिथे स्वैपाकघर, जेवणाची खोली वगैरे व्यवस्था असावी.

दिवाणखान्याच्या एका कोपऱ्यात पुढे आलेला माडीचा दरवाजा आहे, तो दरवाजा सदैव बंद केलेला असतो. अर्थात कुलूप न लावता. त्या दरवा-

ज्याने माडीवर जाता येते, पण माडीवर कोणी जात नाही. कारण ती माडी वापरात नाही. अडगळीच्या सामानासाठी ती वापरली जाते. तिथे जुने, मोडके पलंग, मोडक्या खुर्च्या, लाकडी फळ्या, शेती-बागायतीची अवजारे, मातीच्या कुंड्या असल्या गोष्टी खचून भरल्या आहेत. अर्थात यांतलेही काही कोणाला दिसत नाही. खूप वर्षांपूर्वी—म्हणजे रामरावांच्या लग्नानंतर एक-दोन वर्षांनी, रामरावांच्या वडिलांनी— म्हणजे अप्पांनी या माडीच्या छपराला दोरखंड बांधून आपल्या गळ्याला फास लावला होता. या त्यांच्या आत्महत्येमुळे माडी ओसाड पडली आहे.

दिवाणखान्याच्या भिंतीवर एक मोठे लंबकाचे घड्याळआहे. ते भिंतीवर असेल किंवा स्टॅण्डवर ठेवलेले असेल. ते अशा पद्धतीने ठेवलेले असावे, की प्रेक्षकांना काटे दिसू नयेत, वेळ कळू नये. पण धीरगंभीर टोके ऐकू यावेत. याशिवाय भिंतीवर जुन्या स्त्री-पुरुषांचे पाच-सहा फोटो आहेत. झिगाने भरलेल्या बाळाची फ्रेम असावी. शिवाय टळकपणे दिसतील, अशी दोन पेंटिंग्जही आहेत. ती चित्रे पूर्वी कधीतरी रामरावांच्या पत्नीने काढलेली आहेत.

दिवाणखान्यात जुन्या पद्धतीचे फर्निचर आहे. वकीलसाहेबांचे टेबल आणि खुर्ची, टेबल-लॅम्प, काही ग्रंथ, ब्रीफची पुडकी, एक आरामखुर्ची, एक दिवाण, दोन-तीन खुर्च्या, दोन-तीन वेताचे मोढे.

पडदा वर जातो, तेव्हा गिच्च काळोख असतो. मुख्य दरवाजा बंद आहे. बाजूच्या गजांच्या एका खिडकीतून अंगणाकडच्या एका क्षीण दिव्याचा प्रकाश मळकट होऊन आत झिरपला आहे. रातकिड्यांचा आवाज. दूरवरून कोल्हे, कुत्रे, भालू यांचा मिश्र भयाण आवाज. असेच दोन क्षण जातात आणि एकदम काळजावर आपटल्यासारखे टण्...टण्...टण्... असे घड्याळाचे तीन ठोके पडतात. पुन्हा दोन क्षण जातात....माडीवर काहीतरी उंदीर-घुशीने खड्खड् केल्याचा आवाज येतो. पुन्हा शांतता. रातकिड्यांचा, कोल्ह्या-कुत्र्यांचा आवाज येतो. मागोमाग आगगाडीच्या एखाद-दुसऱ्या शिट्टीचा उदास आवाज.

क्षणभराने रामराव आपल्या बेडरूममधून बाहेर येतात. दिवाणखान्यात दिवा लावतात. ते झोपेतून उठून बाहेर आलेले आहेत. वयाने पंचावन्नच्या आसपासचे गृहस्थ. त्यांचा चेहरा बराच गोंधळलेला आहे. त्यांची पत्नी सीताबाई शेजारी बिछान्यात दिसली नाही, म्हणून ते थोडे भयभीत झाले आहेत. ते येतात आणि दचकून इकडे-तिकडे पाहतात. तेवढ्यात माडीवर घुशीने उडी मारल्यामुळे काहीतरी काठी वगैरे पडल्याचा आवाज ऐकू येतो... ]

रामराव : ( एकदम दचकून ) माडीवर कोण ? सीता....ए सीता...सीता...( विनायकच्या बंद खोलीकडे वळून ) विनायक...एऽ विनू...विन्या...

[ तेवढ्यात विनायक येतो. सत्तावीस–अठ्ठावीस वर्षांचा मुलगा. डोळे चोळत, जांभई देत येतो. ]

विनू : कोण ?...कोण आलंय् , अण्णा ?
रामराव : कुणी आलेलं नाही, सीता कुठं गेलीय् ?
विनू : कधी ?
रामराव : कधी काय ? मला आत्ताच थोड्या वेळेपूर्वी जाग आली...तर ही बिछान्यात नाही...टॉयलेटमध्येही नाही...
विनू : माडीवर गेली असणार... ( वर बघत, ऐकत ) आई, एऽ आई...
रामराव : ती वर नाही रे, माडीचा दरवाजाही ओढलेला आहे...गेली कुठं ?
विनू : ( मुख्य दरवाज्याकडे दचकून पाहत ) या दरवाज्याचा अडसर काढलाय्...

[ जातो आणि दरवाजा उघडतो. तेवढ्यात दुरून स्टेशनकडून आगगाडीची उदास शिट्टी दुहेरी–तिहेरी ऐकू येते. ]

विनू : आई एऽऽ आईऽऽ !
सीता : ( दुरून आवाज येतो ) अरे, काय गडबड चाललीय् तुमची ?
विनू : ( वळून ) ती बघा, अण्णा...पारावर बसलीय् ..
रामराव : पारावर ? या वेळी ? काय वेडबिड लागलंय् , की काय तिला ?
विनू : ( बाहेर बघत ) चल, बघू आत...( आतल्या बाजूला येत...अण्णांना उद्देशून) दोन दिवसांपूर्वी....अशीच मध्यरात्री... ही काळोखात माडीवर....
रामराव : ( थोडे दचकून ) माडीवर ?...तिथं काय करात होती ?

[ तेवढ्यात सीताबाई येते. पन्नास–बावन्न वर्षांची. अंगाने थोडी स्थूल, कानशिलांकडे किंचित केस पांढुरके. अलीकडे तिची झोप उडाली आहे. म्हणून तिचे डोळे जरासे काळसर आणि ओढलेले दिसतात. ती वाकलेली नाही, पण तिची हालचाल मंद झालेली आहे. ]

सीता : ( आत येत...दरवाज्याला धरून) केवढी गडबड तुमची, अजून पहाट झाली नाही, तर....! लोकांना झोपू द्यायचं नाही...( गोठ्यात गाय हंबरते. )

माझा आवाज ऐकला, म्हणून हंबरतेय्...( त्या दोघांना ) झोपा ना !

रामराव : ( थोडे चिडून ) तू कुणाला झोपू देशील तर ना !

सीता : ( आत येत ) व्या ! आपण रात्रभर घोर घोर घोरायचं.... आणि....

रामराव : ( चिडून ) मी काय आत्ताच घोरायला लागलो काय ?... तीस वर्षं झाली लग्नाला...

सीता : ( किंचित हसत ) आणि ते घोरणं तरी कसलं ? गाडी स्टेशनात शिरल्यासारखं घर्र ..घर्र...घर्र....घर्र ( हसत ) गाडी तरी निघून जाते ! हे सकाळपर्यंत स्टेशनात ! ( दोघे तिच्याकडे टवकारून बघत राहतात.... ती थंडपणे एका मोढ्यावर बसते आणि एखादी बातमी सांगावी, तशी सांगते ) आज गाडी दोन तास लेट होती...

रामराव : ( दचकून ) म्हणजे तू आत्ता स्टेशनवर जाऊन आलीस ?

सीता : असले यांचे प्रश्न ! काय कोर्टात वकिली करतात, परमेश्वर जाणे ! मी जरा बसले होते... इथं बकुळीच्या पारावर...मेलचा आवाज नाही ऐकू येत ?

रामराव : ( दचकून ) एवढ्या रात्री ?... आता तीन वाजले...

सीता : मी एक वाजल्यापासनं बसलेय् पारावर....मी बसले पारावर आणि गाडी सुटली...

विनू : ( अण्णांना ) मी सांगतो, अण्णा, तुम्ही....

रामराव : अरे, पण...मी माझ्या घोरण्यावर काय करणार ? जुनी सवय आहे ती...

विनू : ( वैतागून ) मी तुमच्या घोरण्याचं नाही म्हणत...

रामराव : ( वैतागून ) मग कशाबद्दल ?

विनू : आईला झोप येत नाही...

रामराव : ( चिडून ) अरे, पण त्यासाठी चालू आहे ना औषध डॉ. मुळ्याचं !

सीता : मिरी आणि तूप ! प्रत्येक वेळेला मिरी आणि तूप खा, म्हणतात ! ( हसत ) मी तूप खाते....मुळ्यांच्या नरड्यात मिरी घाला...

विनू : पण डॉ. मुळे म्हणतात काय ?

रामराव : ते म्हणतात, पित्तामुळं झोप येत नाही....

विनू : पण पित्त कशामुळं ?

सीता : झोप येत नाही, म्हणून .. ( आपणच हसते. दोघे गंभीर. विनू रागाने तिच्याकडे बघतो. ) तू झोप जा !... ( हसत ) नाही तर तुझं पित्त उठेल...

विनू : ( चिडून ) काय वाट्टेल ते करा.... ( जात ) मी झोपतो...

[ आत जातो आणि आपल्या खोलीचे दार आवाज करून बंद करतो. कडी लावतो. ]

रामराव : आता झोप आत येऊन....( हात वर ताणून मोट्ठी जांभई देतात. )
सीता : ( शांतपणे ) बसा....
रामराव : बसा काय ? झोप जरा आत जाऊन तासभर ...
सीता : ( शांतपणे ) बसा.. ( आरामखुर्चीकडे हात दाखवते. रामराव नाइलाजाने आरामखुर्चीत बसतात. ती मोढ्यावरून उठते आणि त्यांच्या पायांशी बसते. त्यांचे पाय आवळू लागते.) हल्ली कोर्टात तुमची वकिली चालत नाही ?
रामराव : का ?
सीता : कोर्टात उभं राहून राहून पाय वळले, की आवळायला सांगत होता... हल्ली सांगत नाही...
रामराव : काय सांगणार ? तुझीच आधी तब्येत नाही धड ! कुठं पित्त उठलंय् कुठं झोप येत नाही...

[ आगगाडीची कर्कश शिट्टी होते. ]

सीता : ( एकदम वैतागते ) या अशा शिट्ट्या रात्रभर वाजत असतात... आणि त्या दोन शिट्यांमध्ये तुमचं घोरणं...झोप लागेल कशी ? रात्रभर मी जागी... ( थांबून ) बनी स्वप्नात आली...
रामराव : कधी ?
सीता : रात्री...
रामराव : रात्रभर जागी होतीस, तर बनी स्वप्नात आली कशी ?
सीता : ती स्वप्नात येण्यापुरती झोप लागली असेल...आली आणि म्हणाली, ताई, मला कुशीत घे ! कुशीत शिरली आणि मला करकचून मिठी मारून झोपली !
रामराव : ती झोपली आणि तू जागी झालीस ? ( हसतात. )
सीता : हसू नका ! मला सारखं वाटतं, तिला कुशीत घ्यावी...पोटाशी धरून आवळावी...एवढीशी होती, तेव्हापासनं मी वाढवलीय् तिला....त्या स्पर्शाचं सुख मला आता हवंहवंसं वाटतंय्....
रामराव : मग आणू या का तिला इथं ? मी जाऊन घेऊन येतो...
सीता : ( लटकेपणाने ) काही नको...मग मला सोडून मेहुणीच्याच मागे नाचत बसाल ! माझ्यापेक्षा तरुण....आणि दिसायलाही माझ्यापेक्षा बरी...
रामराव : ( कपाळाला हात लावीत ) अशी तू आहेस...दोन्ही बाजूंनी बोलणार !
सीता : ( हसते ) जरा गंमत केली ! पण ती नाही यायची...तिला या सगळ्या प्रकाराची लाज झालीय्...नाहीतर पूर्वी किती वेळा ती इथं येऊन राहायची.... नेहमी त्या पारावर बसायची...वर तोंड करून...वरनं बकुळीची फुलं तोंडावर

पडली, म्हणजे आनंदानं ओरडायची...मी सुद्धा आत्ता बराच वेळ तशी बसले होते...डोळे मिटून...वरनं दोन-दोन...चार...चार फुलं पडत होती...ओठांवर...नाकावर...पापण्यांवर... (वर बघत डोळे मिटते.) सुगंधी फुलं...बनी म्हणायची, बकुळीच्या फुलांना पापण्या असतात....(वास घेतल्यासारखे करीत...) खरंच...पापण्यांचा स्पर्श झाल्यासारखा वाटतो!.... जाऊन बसू या?

रामराव : कुठं?

सीता : बाहेर...पारावर?...बघा, फुलं बकुळीची कशी अंगावर पडतात, ती.... (ती रामरावांकडे अपेक्षेने बघते.) तुम्ही पारावरची गणपतीची मूर्ती पाहिलीत? सोंडीचा कपचा गेलाय्...

रामराव : (तिच्याकडे बघत) त्याचा काय इथं संबंध? तुझं, सीता, हल्ली काय बिघडलंय्? सांग तरी

सीता : कुठं काय?

रामराव : काहीतरी तुझ्या डोक्यात चालू असतं...महिन्यापूर्वी पंढरपूरच्या वारीला जाऊ या, म्हणून मागं लागलीस...

सीता : वाटतंय्...जिथं.. ज्या पायांवर ज्ञानेश्वर-तुकोबांनी डोकी ठेवली....तिथं एकदा आपण डोकं ठेवावं...तो स्पर्श...त्या स्पर्शानं फुलून जावं.

रामराव : मध्ये एकदा पालीच्या शेतावर जाऊन राहू या, म्हणालीस...आता बकुळीचा पार! दोन दिवसांपूर्वी मध्यरात्री माडीवर गेलीस...

सीता : विन्यानं सांगितलं, वाटतं? विन्याच्या तोंडात तीळ भिजायचा नाही!

रामराव : पण मी म्हणतो, का जावं आपण त्या माडीवर?

सीता : का जाऊ नये? मला नाही भीती वाटत...अप्पा दिसतील, म्हणून...

रामराव : अप्पांनी माडीवर गळफास लावून प्राण सोडला, तेव्हापास्नं तिथं कुणी जात नाही...तुला ठाऊक आहे! आता अठ्ठावीस वर्षं झाली....

सीता : अप्पांनी का गळफास लावला असेल? (ती उत्तरासाठी त्यांच्या तोंडाकडे पाहते.)

रामराव : (क्षणभर तिच्याकडे नवलाने पाहत) सीता, तुला ठाऊक आहे....अप्पांनी गळफास का लावला, याचं कारण कुणालाही माहीत नाही! इतकी वर्षं झाली! आणि आता एवढ्या अपरात्री तू मला कारण विचारते आहेस तुला झालंय् तरी काय?

सीता : हल्ली हल्ली मला सारखं वाटत राहतं...एकसारखं माझ्या मनात येतं....सगळं सोन्यासारखं असताना कुणाला काही न सांगता, न सवरता एकाएकी त्यांनी ....अप्पांनी, हो...आपल्या आयुष्याचा असा शेवट का केला?

रामराव : ( चिडून ) का केला, हे आता कळलं, तरी त्याचा काही उपयोग आहे का ? ( ती त्यांच्या तोंडाकडे बघत राहते. ) त्यापेक्षा तू दुसऱ्या गोष्टींत, सीता, तुझं मन रमव ! चित्रं काढ ! हल्ली तू ब्रश हातात घेतलेला नाहीस ! ( दाखवीत ) ही तुझी जुनी पेंटिंग्ज !...त्यानंतर तू काही नवीन काढलं आहेस ? तुझ्या बाबांनी दिलेली ती पेटी...तशीच धूळ खात पडलीय्...ती वाजव...( उठते आणि पेटीकडे जाऊ लागते. ) काय करते आहेस ?

सीता : पेटी वाजवते...

रमराव : आत्ता ? या वेळी ? वाजले किती ? सगळ्यांना उठवायला ? माझ्या झोपेचं खोबरं होतंय्, तेवढं पुरे !

सीता : पेटीवर बोटं फिरताहेत कुठं ?

[ पेटी उघडून हळूच बोटे फिरवते आणि चार सूर काढते....तेवढ्यात आतल्या खोलीत विनूची मुलगी झोपेत मोठ्याने ओरडते. ]

रामराव : ती उठली, बघ...

सीता : धाकटी नीता ती ! ती रोज रात्री झोपेत ओरडतेच ! रोज रात्री एका राक्षसाला ठार मारते...( स्वतःशीच हसते. )

रामराव : ( किंचित ओरडून ) पण तू आत्ता नको वाजवूस ! अख्खा दिवस पडलाय्... पेटी वाजव...चित्रं रंगव !

सीता : ( पेटी बंद करून येत ) पत्ते खेळू या ?

रामराव : ( चक्रावतात ) आत्ता ?

सीता : मग काय करू या ?

रामराव : झोप आत जाऊन जरा स्वस्थशी...

सीता : ( आरामखुर्चीला टेकून त्याच्या पायांशी बसते. ) मला खूप बेचैन वाटतंय्.... अस्वस्थ...( त्यांचा हात हातात घेते. )

रामराव : ( तिचा हात कुरवाळीत...तिची बोटं पाहत ) किती सुंदर बोटं आहेत तुझी, सीता ! कलावंताची बोटं....लांब...नितळ...निमुळती...

सीता : ( ती एकदम मोहरून जाते. ) किती बरं वाटलं मला ! ..लग्न झाल्यानंतर आपण पालीच्या शेतावर गेलो होतो...आठवतं ?....तेव्हा प्रथमच तुम्ही माझे हात हातांत घेतले, पहिलावहिला स्पर्श केला ! आणि बोटांवर तुमची बोटं फिरवीत तुम्ही हेच म्हणाला....किती सुंदर बोटं आहेत तुझी ? कलावंताची बोटं...लांब...नितळ . निमुळती....( सुखात बुडते... त्याचा हात आपल्या गालावर फिरवते. ) अंग, बघा, कसं मोहरून गेलंय्...त्या आठवणीनं....

(ते तिच्या केसांतून हात फिरवतात.) तुम्ही त्या वेताच्या खुर्चीत बसला होता...मी अशी तुमच्या पायांशी ..आठवतं? (ते डोके टेकून शांत बसतात.) बनीला असं वाटत नसेल ? बबनरावांनी तिचा हात हातात घ्यावा... केसांतून हात फिरवावा....स्पर्शाचं सुख व्हावं...स्पर्शाला पालवी फुटावी.... (हळू हळू प्रकाश मंद होत जातो...काळोख होता होता आगगाडीच्या एक-दोन शिट्ट्या होतात. त्यातच सीताबाईंचे पुढील बोलणे चालू आहे.) बनीच्या नशिबी सुख नाही ! मला अपराधी वाटतं....म्हणजे मी तिचं बबनरावांशी लग्न जमवून दिलं...चांगले शिकले-सवरलेले डॉक्टर...बनी दिसायला देखणी... पण बबनरावांचं पाऊल असं पडेल, असं वाटलं नव्हतं...

[ प्रकाश येता येता घड्याळाचे सहा टोके पडतात. आरामखुर्चीत रामराव गाढ झोपलेले आहेत आणि सवयीनुसार घोरताहेत. बाजूला त्यांच्या मांडीवर डोके टेकून बसल्या बसल्या सीताबाईही झोपली आहे. क्षण, दोन क्षण जातात आणि एकदम दोन कर्कश शिट्ट्या वाजतात. ती दचकून जागी होते. गोठ्यात गाय हंबरते. पुन्हा एकदा हंबरते. ती रामरावांना हलवून जागे करते...]

सीता : मी दूध काढायला जाते....

रामराव : (करवादून) ते सांगण्यासाठी मला जागं करायची काय गरज होती ?

सीता : मी इथं बोलतेय्...आणि तुम्ही घोरताय् ! (उठते आणि आतून चरवी घेऊन येते) तुमचं हल्ली फार होतंय्...पूर्वी झोपलात, म्हणजे घोरत होता... आता खुर्चीत बसलात, तरी घोरताय्....अशानं तुम्हांला कोर्टात जज्ज कोण करील ? खटला चालू असताना खुर्चीत बसून घोरणार !

[ आपणच हसते आणि गोठ्याकडे जाते.
काही क्षण रामराव विचार करीत तसेच बसून राहतात. तेवढ्यात मुख्य दरवाज्यातून विनू टॉवेलाने तोंड पुसत आणि टॉवेलला टूथब्रश पुसत येतो. ]

विनू : झोपलीय् ?

रामराव : (कंटाळून) छे ! दूध काढायला गेलीय्...रात्रभर बडबड बडबड बडबड ! मला मिनिटभर झोपू दिलं नाही. तरी आज कोर्टात जायचं नाही, म्हणून बरं आहे !

विनू : हल्ली हल्ली तिला झोपच येत नाही. त्यामुळं तिचे डोळे कसे दिसतात, बघा–

रामराव : (वैतागून) झोप न यायला झालंय् काय ! म्हणे, बनी स्वप्नात आली...

आणि तिनं हिला मिठी मारली. बनीला नाही उद्योग!

विनू : बनीमावशीचं तिनं फार मनाला लावून घेतलंय्!

रामराव : ( चिडून ) बबनराव शेण खातात, त्याला आपण काय करणार? हिनं कशाला तो विचार करायचा? आणि बबनरावांचं हे लफडं काय काल-परवाचं आहे? चार–पाच वर्षं झाली, तेव्हा वरी ही झोपत होती...आत्ता झोप उडायला काय झालंय्? काही तरी आपलं डोक्यात घेऊन बसायचं...( थांबून ) रात्री मला विचारते, अप्पांनी माडीवर गळफास लावून का घेतला? काय मला सांगून त्यांनी गळफास लावला?...उगाच एक...एक...

विनू : दोन दिवसांपूर्वी...मध्यरात्री, हो....बारा वाजून गेले होते...माडीवर कसला तरी आवाज झाला, म्हणून मला जाग आली....इथं मी आलो...कान देऊन ऐकलं....( कान देऊन ऐकल्यासारखं करतो. ) तर वर बडबडल्याचा... कुणीतरी बोलल्याचा आवाज....असा दरदरून घाम सुटला अंगातून माझ्या... मला वाटलं, अप्पांचंच भूत... ( एकदम ओरडतो. ) कोण वरं.... माडीवर?...असं मी एकदम ओरडलो...आणि मागच्या मागे पळणार, तोच...ही जिन्यावरनं उतरत होती....मी एकदम दचकलो...म्हटलं, आई तू?...तर म्हणाली, एक वेताची आरामखुर्ची होती...कुठं गेली, ते बघत होते...

रामराव : ( चमकून ) वेताची आरामखुर्ची?

विनू : पालीच्या बंगल्यात होती, म्हणाली...कधी?.. तुमचं लग्न झालं, तेव्हा...

[ रामराव विचारात मग्न होऊन विनूच्या तोंडाकडे बघत राहतात आणि मग काही न बोलता उठतात आणि तोंड धुण्यासाठी मुख्य दारातून बाहेर जातात. ते तसे जाता–जाताच स्वैपाकघराच्या दारातून विनूची बायको–रेखा–येते. पंचवीस–सव्वीस वर्षांची, तिच्या मागोमाग विनूची बहीण–वीणा येते. ही वीस–एकवीस वर्षांची आहे. रात्रीचे प्रकरण थोडेसे कानांवर आल्यामुळे त्या दोघींच्याही मुद्रेवर किंचित चिंता आणि कुतूहल आहे. ]

रेखा : कुठं गेल्या?

विनू : रेखा, हळू...दूध काढायला गेलीय्.

रेखा : यांनी कशाला दूध काढायला पाहिजे? भैयाराम नेहमी काढतो.

वीणा : नाहीतर काय! दिवसभर बोटं आखडतात, म्हणून ओरडत असते...
( कुतूहलाने....विनूला ) आई रात्री एकटीच पारावर बसली होती?

विनू : अग, वीणा, एक वाजल्यापासून तीन वाजेपर्यंत! आणि आम्हांला सांगते...

रात्रीची मेल दोन तास लेट होती, म्हणून...!

[ सर्वजण हसतात.
तेवढ्यात अंगणातून सीताबाई येताना दिसते. त्यासरशी शू: शू: करीत आणि डोळ्यांच्या खुणा करीत सर्वजण बोलणे थांबवतात.
चरवी घेऊन सीताबाई दरवाज्यातून आत येते. विनू आणि त्या दोघीजणी तिच्याकडे एखाद्या अनोळखी बाईकडे पाहावे, तशा पाहत राहतात.]

वीणा : आई, तुझी बोटं आखडतात, मग दूध कशाला काढलंस तू?

सीता : मग काय बसून राहू, तुमची तोंडं बघत? (विनूला) तू आज लवकरसा उठलास?

विनू : शहापूरला जायचंय्...

सीता : तुझी शहापूरची कामं संपतच नाहीत, वाटतं?

विनू : अग, मालाच्या पेट्या पाठवल्या, तर तावडतोब पैसेच पाठवीत नाहीत.... करणार काय?...फॅक्टरी तर घालून बसलोय्...

[ रामराव पेपर घेऊन येतात आणि वाचत बसतात.]

सीता : मोटार घेऊन जाणार?

विनू : ही आपली मोटार? (हसतो) आणि शहापूरला? अग, ती कोर्टापर्यंत कशीबशी जाते आणि सुखरूप परत येते, हेच खूप झालं!

[ रामराव पेपर वाचता वाचता वर बघतात. आपली चेष्टा चालली आहे, हे त्यांच्या लक्षात येते. वीणा रामरावांकडे चोरून बघत हसते.]

सीता : (मुद्दाम) विन्या, तू फारच करतोस हं! इतकी काही ती मोटार बेकार नाही. मुळ्यांच्या दवाखान्यापर्यंत सुद्धा जाते आणि परत येते....मिरी आणि तूप खाल्ल्याशिवाय....(हसते...रामराव अस्वस्थ होतात.) एक मात्र बरं आहे... त्या मोटारीचं...(विनू 'काय' या अर्थी पाहतो.) चोरीला जायची भीती नाही! (हसते.)

रामराव : (तिच्याकडे चिडून बघतात) शेवर्लेट मॉडेल आहे ते...म्हणे, चोरीला जायची भीती नाही...

सीता : त्यासाठी नाही म्हणत. पाण्याची टाकी रस्ताभर मुतत असते—नागडं पोर

मुतावं, तशी. त्यामुळं मोटार कुठनं कुठं गेली, ते पोलिसांना कळणार...

[ सर्वजण हसतात.]

रामराव : ( चिडून ) एवढं असेल, तर गिऱ्हाईक आणा आणि ती गाडी विकून टाका...
विनू : पण, अण्णा, अप्पांची आठवण म्हणून ती गाडी ठेवायची म्हणताय् ना ?
रामराव : पण एवढी थट्टामस्करी करून ती गाडी ठेवलीच पाहिजे, असं नाही ! ( पेपर वाचू लागतात. ते रागारागाने पेपरची पाने उलटतात. )
सीता : त्या गाडीची चेष्टा केली, म्हणून एवढं काही चिडायला नको !
रामराव : ( चिडून ) कोणीही चिडलेला नाही.
सीता : पेपर उलटा धरलाय्, बघा.

[ पेपर उलटा धरलेला नसतो. तरीही रामराव एका झटक्यात सुलटा करण्यासाठी उलटा धरतात. सीताबाई हसते. वीणाही हसते आणि उठून रामरावांच्या हातातला पेपर सुलटा करते आणि पळत आत जाते. तेवढ्यात अंगणाकडे ' भैयाराम ' अशी हाक ऐकू येते आणि पाठोपाठ नाटेकर दिसतात. ]

सीता : नाटेकर आले, वाटतं...
विनू : अण्णा, मी आत्ता शहापूरला जातोय्

[ ते ऐकतात, की नाही, ते पाहण्यासाठी सीताबाई वळून त्यांच्या तोंडाकडे पाहते. ]

रामराव : येणार कधी ?
विनू : उद्या किंवा परवा येईन...( आत जायला निघतो. )
सीता : कुठं चाललास ?
विनू : कपडे करतो....तासाभरात गाडी आहे.
सीता : आधी आंघोळ कर...
विनू : अग, केली मी आंघोळ...
सीता : एक मुस्कटात देईन ! मुकाट्यानं जा आणि आंघोळ कर...एवढासा असल्यापासून बघतेय्....तुझ्या जिवाला आंघोळ नको ! ( टॉवेल आणून त्याच्या खांद्यावर ठेवते ) आंघोळ केलीस, मग टॉवेल सुका कसा ? ( तो जाणार, तोच )
सीता : हो ! पण थांब जरा !

[ तेवढ्यात बाहेरून 'भैयाराम....भैयाराम' अशा हाका मारीत नाटेकर येतात. पन्नास-बावन्न वर्षांचे, जरा स्थूल, बुटके, काळे. सोसून सोसून निर्विकार झालेला चेहरा, तेलकट, डोकीवर मेणचटलेली टोपी, मळकट धोतर, मळकट लांब बाह्यांचा शर्ट, शर्टाला दोन खिसे, शर्टाची बटणे गळ्यापर्यंत लावलेली. शर्टावर घामाचे डाग आहेत. हे वरचे कारभारी आहेत. ]

सीता : भैयाराम कशाला पाहिजे ?

नाटेकर : ( त्यांना मुठी मांड्यांना चिकटवून ताठ उभे राहण्याची सवय आहे. ) भैयाराम नको आहे....

सीता : हाका मारताय्, भैयाराम....भैयाराम....

रामराव : ती नाटेकरांची सवय आहे.

नाटेकर : ( गंभीरपणे ) त्यामुळं मी आलोय्......आणि माझं लक्ष आहे, हे त्याला कळतं...भैयाराम जरा कामचुकार आहे.

सीता : तुमच्या बायकोचं कसं आहे ?

नाटेकर : बरं आहे ! खूप बरं आहे !

विनू : आणि थोडं लवकर येत चला...

नाटेकर : ( अदबीने ) तिची पेज शिजवून...अंग पुसून, सगळं करून होईपर्यंत थोडा उशीर झाला...उद्या लवकर येईन...( गोंधळून उभे राहतात. )

रामराम : नाटेकर, तुम्ही उभे का ?

नाटेकर : ( अदबीने ) सैब, बाहेर दोन अशिलं बसलीत.

रामराव : ( पेपर बाजूला ठेवीत ) कोण आहेत ?

नाटेकर : कोणी नवीन आहेत, सैब !...त्यांची बायको कोणी तरी...

सीता : पळवून नेली असणार ! ( हसते. )

नाटेकर : ( गोंधळून, वळून—सीताबाईंना— ) हो, तुम्हांला कसं कळलं ?

सीता : यांची सगळी अशिलं असलीच ! कुणाची बायको पळाली...कुणाचा नवरा पळाला...( हसते. )

रामराव : ( उठत ) त्यांना बसायला सांगा ! आलो मी

[ नाटेकर संथ चालीने बाहेर जातात.
तेवढ्यात स्वैपाकघरातून वीणा येते आणि वर्दी देते. ]

वीणा : विनू, अण्णा, आई...चला ! ब्रेकफास्ट रेडी—( आत जाते. )

सीता : ( रामरावांना अडवीत ) ऐकलंत ? ( ते थांबतात—ती त्यांना दोन बोटे

दाखवते. )

रामराव : ती बोटं सुजलीत, बघ...

सीता : ( दुर्लक्ष करून ) मला दोनशे रुपये हवेत.

रामराम : ( जरा वैतागून ) कशासाठी ?

सीता : विष खायला !

रामराव : ( जरा चिडून ) मला माहीत आहे, कशासाठी, ते ! ( ती रागाने बघत राहते. ) बनीला पाठवायचे असतील ! सारखी सारखी तिची भर कर !

सीता : ( चिडते. ) ठेवून द्या तुमचे पैसे ! काही नकोत मला ! तुम्हांला श्रीमंतीची घमेंडच खूप ! माझ्या पायगुणानं वकिली चालली, एवढं लक्षात ठेवा; नाही तर लग्नाआधी काळा कोट शिवण्याइतकी सुद्धा वकिली नव्हती...

रामराव : ( वैतागून–बाहेर जात ) बरं देतो...दोनशे रुपये !

सीता : मला तुमची दमडी सुद्धा नको ! हात सुद्धा लावणार नाही तुमच्या पैशाला... शपथ घेऊन सांगते....( हे चालू असताना ते बाहेर जातात. )

विनू : काही अण्णांचं चुकलं नाही ! बनीमावशीची भर आम्ही तरी किती करायची ?

सीता : ( एकदम चिडते ) मुस्कटात देईन ! तुला कोणी विचारलंय् ? ज्याच्या त्याच्यात तोंड घालतोस, ते ? तुझी फॅक्टरी धड चालत नाहीये, ती चालवून दाखव !

विनू : ( वैतागून ) काय वाट्टेल ते करा ! मी ब्रेकफास्टला जातो. ( वळतो. )

सीता : हे बघ...( एकदम बाबापुता करून त्याला गोंजारू लागते. ) माझा बाबा तो...

विनू : ( दूर होत ) मला माहीत आहे, तू का मस्का लावते आहेस, ती...मावशीला भेटून ये, म्हणून सांगणार...

सीता : जरा, बाबा....त्या बनीला भेटून ये...शहापूरपासून अर्ध्या तासावर आहे... माझा बाबा तो...

विनू : अर्ध्या तासावर ?....दोन तास लागतात....

सीता : जरा घाईघाईनं जा ! बाबा तो माझा–( दोन्ही हातांनी त्याचे तोंड गोंजारते. )

विनू : ( तिच्या हाताची बोटं बघत ) आज तुझी बोटं अधिक सुजलीत, बघ....आई...

सीता ( गयावया करीत ) असू देत ! हे बघ....बनीला म्हणावं...आठ दिवसांसाठी इथं राहायला ये....तिला म्हणावं...माझी तब्येत बरी नाही....बघायला ये... ( थांबून, दोन उसासे टाकीत ).नाहीच यायची ती ! तिला बाहेर तोंड दाखवायची लाज झालीय्...जाशील ना ?

विनू : जाईन...

सीता : बाबा तो माझा सोन्या ! जाताना दोन माझी जुनी लुगडी देते, ती ने तिला... ( चिडून ) तो मेला बबन्या...काळतोंड्या....नर्सच्या मागं लागलाय्...बनीच्या

काळजीनं माझं हे दुखणं वाढतंय्....तिच्या काळजीनं मला झोप नाही

[ तेवढ्यात नाटेकर येतात. मांड्यांना हातांच्या मुटी चिकटवून उभे राहतात. ]

विनू : मी जातो...माझी गाडी चुकेल...

सीता : जरा थांब ! (नाटेकरांना) तुम्ही, नाटेकर, विठोबासारखे उभे का ?

नाटेकर : साहेबांनी दोनशे रुपये दिलेत. (दोनशे रुपये पुढे करतात.)

सीता : (पैसे न घेता—दरवाज्यापर्यंत जाऊन मोठ्याने ओरडते.) मला नकोत ते पैसे ! ठेवा, म्हणावं, जपून आपल्या तिजोरीत ! पैशाची मोठी मिजास आलीय्, ती ! (ते खरे वाटून नाटेकर, बाहेर जाऊ लागतात. खालच्या आवाजात) नाटेकर, तुम्ही कुठं निघालात ?

नाटेकर : (मख्खपणे) पैसे नकोत ना ?

सीता : आणा ते ! (पैसे घेते. नाटेकर क्षणभर गोंधळून उभे राहतात.) तुम्ही उभे का ? चहा-पोहे घ्या, जा...(ते जाऊ लागतात. सीताबाई नोटा विनूच्या हातात कोंबते.) हे पैसे हळूच बनीला दे. खर्चाला बबन्या, मेला, बनी-कडून स्वैपाक करून घेतो...आणि तिला खर्चाला दमडी सुद्धा देत नाही... त्याच्यामुळंच मला हे दुखणं लागलंय्....आता तर माझ्या अंगाला खाज खाज सुटते. (काहीतरी आठवून नाटेकर मागे येतात आणि बावळटासारखे उभे राहतात. सीताबाई थंडपणे वेगळ्याच आवाजात विचारतात) नाटेकर, तुम्ही असे उभे का ?

नाटेकर : एक गोष्ट विसरलो...

सीता : कुठली ?

नाटेकर : (खिशातून पुड्या काढीत) मुळे डॉक्टरांनी या पुड्या दिल्यात. मिरी आणि तूप खाऊन झाल्यावर एक पुडी मधातून चाटायची.

सीता : (पुड्या घेत) बरं !

नाटेकर : आणि त्यांनी सांगितलंय्...तेलकट-तुपकट काही खायचं नाही.

सीता : तूप खायचं....पण तुपकट खायचं नाही ! (हसते.)

विनू : आई, आता जरा माझं ऐक....आता मुळ्यांचं औषध बंद ! मी बापट डॉक्टरांना फोन करतो....डॉ. बापट—हे फॉरेन रिटर्न्ड डॉक्टर आहेत...नाटेकर, संध्या-काळी आईला बापट डॉक्टरांकडे...!

नाटेकर : (अनाहूतपणे) भैयाराम....

विनू : (चिडून) भैयाराम नको ! तुम्ही स्वतः तिला बापट डॉक्टरांकडे घेऊन जा ! मोटार कोर्टातून आलेली नसली, तर रिक्षानं जा.

नाटेकर : (अदबीनं) होय, सैब !

[ ते आणि विनू बाहेर जाता जाता छोटी पाच वर्षांची नीता 'आजी...आजी' अशी हाका मारीत धावत येते आणि सीताबाईला बिलगते. ]

सीता : (तिला कुरवाळीत) आमची नीताराणी उठली का ? (तिला पोटाशी धरते-मुके घेते.) आणि रात्री झोपेत केवढ्यानं ओरडत होतीस ?

नीता : अग, आजी, माझ्या स्वप्नात केवढा मोठा राक्षस आला होता...आपलं बकुळीचं झाड आहे ना ? त्यापेक्षा उंच....धिप्पाड...हातभर मिशा...

सीता : हो का ? मग मारायचं त्याला....

नीता : मारला मी त्याला....माडीवर गेले...तिथला धनुष्यबाण घेतला आणि धनुष्य मारला...

सीता : (हसत) अग, बाण मारलास, की धनुष्य ?

नीता : (हसत) बाण मारला, ग...बाण छातीत गेल्याबरोबर राक्षस आडवा पडला.... आणि मोठ्यामोठ्यानं ओरडत मेला...

सीता : मग झोपेत तू कशाला ओरडत होतीस ?

नीता : भ्याले, ग, मी ! केवढी पळ पळ पळाले...अजून मला दम लागतोय्...... (दमून श्वास टाकल्यासारखी करते.)

सीता : (हसत–चापटी मारते) चल्, भित्री भागुबाई ! बाण मारणार...

नीता : माडीवर आहे का, ग, बाण आपल्या ?

सीता : (हरवल्यासारखी होत) त्या माडीवर आपल्या काय काय आहे ! पण काही सापडेल, तेव्हा....

नीता : आपण वर जाऊन बघू या...

सीता : मग जाऊ ! पण तू तोंड धुतलंस का ?

नीता : कध्धीच !

सीता : खरं...? माझी शपथ ?

नीता : (तिच्या गळ्याला चिमूट लावीत) शप्पथ ! इमानदारीनं...

सीता : तुझा, बाई, नेम नाही !...तुला तोंड धुवायला नको....(बापटांना फोन करून विनू मुख्य दरवाज्यात येतो.) आणि तुझ्या बापाला आंघोळ करायला नको !

विनू : (आपल्या खोलीत जाताना) मी आत्ता डॉक्टर बापटांना फोन केलाय्...आज संध्याकाळी पाच वाजता जा मात्र...नाटेकरांना घे बरोबर !

[ तो घाईघाईनं आपल्या खोलीत जातो. सीताबाई गंभीर होते. तिच्या

काळजीनं माझं हे दुखणं वाढतंय्....तिच्या काळजीनं मला झोप नाही

[ तेवढ्यात नाटेकर येतात. मांड्यांना हातांच्या मुठी चिकटवून उभे राहतात. ]

विनू : मी जातो...माझी गाडी चुकेल...

सीता : जरा थांब ! (नाटेकरांना) तुम्ही, नाटेकर, विठोबासारखे उभे का ?

नाटेकर : साहेबांनी दोनशे रुपये दिलेत. (दोनशे रुपये पुढे करतात.)

सीता : (पैसे न घेता–दरवाज्यापर्यंत जाऊन मोठ्याने ओरडते.) मला नकोत ते पैसे ! ठेवा, म्हणावं, जपून आपल्या तिजोरीत ! पैशाची मोठी मिजास आहेय्, ती ! (ते खरे वाटून नाटेकर, बाहेर जाऊ लागतात. खालच्या आवाजात) नाटेकर, तुम्ही कुठं निघालात ?

नाटेकर : (मख्खपणे) पैसे नकोत ना ?

सीता : आणा ते ! (पैसे घेते. नाटेकर क्षणभर गोंधळून उभे राहतात.) तुम्ही उभे का ? चहा–पोहे घ्या, जा...(ते जाऊ लागतात. सीताबाई नोटा विनूच्या हातात कोंबते.) हे पैसे हळूच बनीला दे. खर्चाला बबन्या, मेला, बनी-कडून खैराक करून घेतो...आणि तिला खर्चाला दमडी सुद्धा देत नाही... त्याच्यामुळंच मला हे दुखणं लागलंय्....आता तर माझ्या अंगाला खाज खाज सुटते. (काहीतरी आठवून नाटेकर मागे येतात आणि बावळटासारखे उभे राहतात. सीताबाई थंडपणे वेगळ्याच आवाजात विचारतात) नाटेकर, तुम्ही असे उभे का ?

नाटेकर : एक गोष्ट विसरलो...

सीता : कुठली ?

नाटेकर : (खिशातून पुड्या काढीत) मुळे डॉक्टरांनी या पुड्या दिल्यात. मिरी आणि तूप खाऊन झाल्यावर एक पुडी मधातून चाटायची.

सीता : (पुड्या घेत) बरं !

नाटेकर : आणि त्यांनी सांगितलंय्...तेलकट–तुपकट काही खायचं नाही.

सीता : तूप खायचं....पण तुपकट खायचं नाही ! (हसते.)

विनू : आई, आता जरा माझं ऐक ...आता मुळ्यांचं औषध बंद ! मी बापट डॉक्टरांना फोन करतो....डॉ. बापट–हे फॉरेन रिटर्न्ड डॉक्टर आहेत...नाटेकर, संध्या-काळी आईला बापट डॉक्टरांकडे...!

नाटेकर : (अनाहूतपणे) भैयाराम....

विनू : (चिडून) भैयाराम नको ! तुम्ही स्वतः तिला बापट डॉक्टरांकडे घेऊन जा ! मोटार कोर्टातून आलेली नसली, तर रिक्षानं जा.

नाटेकर : ( अदबीनं ) होय, सैब !

[ ते आणि विनू बाहेर जाता जाता छोटी पाच वर्षांची नीता 'आजी...आजी' अशी हाका मारीत धावत येते आणि सीताबाईला बिलगते. ]

सीता : ( तिला कुरवाळीत ) आमची नीताराणी उठली का ? ( तिला पोटाशी धरते-मुके घेते.) आणि रात्री झोपेत केवढ्यानं ओरडत होतीस ?

नीता : अग, आजी, माझ्या स्वप्नात केवढा मोठ्ठा राक्षस आला होता...आपलं बकुळीचं झाड आहे ना ? त्यापेक्षा उंच....धिप्पाड...हातभर मिशा...

सीता : हो का ? मग मारायचं त्याला....

नीता : मारला मी त्याला....माडीवर गेले...तिथला धनुष्यबाण घेतला आणि धनुष्य मारला...

सीता : (हसत) अग, बाण मारलास, की धनुष्य ?

नीता : ( हसत ) बाण मारला, ग...बाण छातीत गेल्याबरोबर राक्षस आडवा पडला.... आणि मोठ्ठ्यामोठ्ठ्यानं ओरडत मेला...

सीता : मग झोपेत तू कशाला ओरडत होतीस ?

नीता : भ्याले, ग, मी ! केवढी पळ पळ पळाले...अजून मला दम लागतोय्...... (दमून श्वास टाकल्यासारखी करते.)

सीता : ( हसत–चापटी मारते ) चल्, भित्री भागुबाई ! बाण मारणार...

नीता : माडीवर आहे का, ग, बाण आपल्या ?

सीता : ( हरवल्यासारखी होत ) त्या माडीवर आपल्या काय काय आहे ! पण काही सापडेल, तेव्हा....

नीता : आपण वर जाऊन बघू या...

सीता : मग जाऊ ! पण तू तोंड धुतलंस का ?

नीता : कध्धीच !

सीता : खरं...? माझी शपथ ?

नीता : ( तिच्या गळ्याला चिमूट लावीत) शप्पथ ! इमानदारीनं...

सीता : तुझा, बाई, नेम नाही !....तुला तोंड धुवायला नको....( बापटांना फोन करून विनू मुख्य दरवाज्यात येतो. ) आणि तुझ्या बापाला आंघोळ करायला नको !

विनू : ( आपल्या खोलीत जाताना ) मी आत्ता डॉक्टर बापटांना फोन केलाय्...आज संध्याकाळी पाच वाजता जा मात्र...नाटेकरांना घे बरोबर !

[ तो घाईघाईनं आपल्या खोलीत जातो. सीताबाई गंभीर होते. तिच्या

हातांच्या बोटांवर प्रकाश पडतो. तो थोडी चिंताग्रस्त होऊन बोटे बघत असताना नीता तिला बिलगून उभी आहे आणि "आजी, चल ना चहा प्यायला, पोह्यांचा कसा वास सुटलाय्, बघ....चल ना!" असे म्हणते आहे.... तरी सुद्धा सीताबाई आपले भान हरवून आपली बोटे निरखण्यात मग्न आहे,

तेवढ्यात दुरून सुधीर देशपांडे येताना दिसतो. हा चोवीस वर्षांचा तरुण आहे. देखणा, तरतरीत आणि आकर्षक! सीताबाईचे लक्ष नसते. पण नीताचे लक्ष जाते. ती एकदम हर्षभराने ओरडते–]

नीता : आजी, आजी, सुधीरकाका आले...

सीता : (एकदम भानावर येते.) कोण...कोण, ग?

नीता : अग, सुधीरकाका....वीणाआत्याचे!

सीता : (आनंदित होऊन) सांग जा लवकर, वीणाआत्याला....

[नीता 'वीणाआत्या...वीणाआत्या' अशा हाका मारीत धावत आत जाते. तेवढ्यात सुधीर आत आलेलाच असतो. त्याच्या हातात पिशवी आहे. तो आल्याबरोबर सीताबाईला वाकून नमस्कार करतो. तेवढ्यात वीणाही बाहेर येते. सुधीर नमस्कार करून उठता उठता सीताबाई त्याला जवळ घेते आणि त्याच्या केसांवरून हात फिरवते. तो हसतो. वीणाही हसते.]

सीता : (वीणाला) तू का अशी हसते आहेस?

वीणा : अग, तू त्याला प्रत्येक वेळी अशी जवळ घेऊन कुरवाळतेस.......मग तो लाजतो... (हसते.)

सीता : (हसत–कौतुकाने) जावई होईपर्यंत, ग! लाजायचं काय त्यात? माझ्या विनूसारखा हा....

सुधीर : (हसत) उगाच, हो हिचं! मी कुठं लाजतोय्?....तुमचा आईसारखा स्पर्श उलट–(तरीही तो लाजल्यासारखाच बोलतो.)

वीणा : (थट्टेने हसत) हवाहवासा वाटतो! (थट्टा करीत) आईच्या हाताचा पवित्र स्पर्श...

सीता : (वैतागून हसत) पुरे, ग, तुझं! म्हणून तो लाजतो! (तिच्या पाटीवर चापटी मारते.)

वीणा : (थट्टेने हसत) अजून लाजतोय् बघ, किती तो...

सीता : नाही, ग, लाजत. लाजेल कशाला? आता डॉक्टर झालाय् तो...(एकदम लक्षात येऊन) तू सुधीर, असा उभा?...बस तरी... .. आणि आज किती

दिवसांनी येतोहेस...

सुधीर : ( बसत ) हल्ली वेळच होत नाही. हॉस्पिटलमध्ये जावं लागतं. दिवसा...... रात्री....( थांबून ) आई, तुमची तब्येत कशी आहे ?

सीता : ( बसत ) माझ्या, रे, तब्येतीला काय धाड भरलीय् ? तुम्ही दोघं तुमच्या लग्नाचा दिवस ठरवा ! कशी कंबर बांधून कामाला लागते, बघ...( तिच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करीत सुधीर पिशवीतून कोकम तेलाचे मुठले काढून तिला देतो ) हे काय ?

सुधीर : हे कोकमतेलाचं मुठलं आहे....आयुर्वेदिक औषध आहे.

सीता : ( कौतुकाने हसत ) हे कशाला ?

सुधीर : अंगावर पित्त उठतं, त्याला हे फार उत्तम ! इथं मिळत नाही हे ! माझ्या मित्राला पत्र लिहून मी ते मुद्दाम आणवलंय् मुंबईहून.

सीता : ( ते ऐकून आनंदित होते ) बघ, ग, वीणा, माझा जावई माझी किती काळजी घेतोय्, ते ! नाही तर आपला विन्या...

वीणा : ( हसत ) विन्या आपल्या सासूची काळजी घेतोय्....( हसते. )

सुधीर : ( हसत ) माझी आई सुद्धा हेच म्हणाली !

सीता : काय ?

सुधीर : सासूची काळजी घेतोस, तेवढी माझी कधी घेतली होतीस ? ( सर्वजण हसतात. )

सीता : शामराव सध्या इथं आहेत, की दौऱ्यावर ?

सुधीर : कालच बाबा आलेत दौऱ्यावरनं...

सीता : आता असतील ना इथं चार–आठ दिवस ?

सुधीर : असणार !...का ?

सीता : मी यांना म्हटलंय्...एकदा जाऊन भेटून या...

सुधीर : कशासाठी ?

सीता : अरे, कशासाठी म्हणजे काय ? लग्नाचा दिवस ठरवायला नको ? एकदा काय ते उरकून घ्या !

सुधीर : वीणाची बी.ए.ची परीक्षा तरी होऊ द्या...तोपर्यंत मी मुंबईला प्रॅक्टिस सुरू करीन .

सीता : परीक्षा...प्रॅक्टिस...सगळं नंतर होईल...आधी लग्न उरकून घ्या....लवकर झालेलं बरं...माझी तब्येत ही अशी. मलाच आता माझा भरोसा वाटेनासा झालाय् !

सुधीर : ( हसत ) आत्ताच तर म्हणालात, कंबर कसून कामाला लागेन, म्हणून.

(तिच्याकडे बघत तो हसतो. पण ती हसत नाही. एकदम गंभीर होते. नजर गेल्यासारखी ती एकवार सुधीरकडे आणि एकवार वीणाकडे बघते आणि काही न बोलता उठून आपल्या खोलीत निघून जाते. दोघेही चपापतात. तिला पाठमोरी बघत राहतात. ती आपल्या खोलीत गेल्यावर...गोंधळून) काय झालं ?

वीणा : कोण जाणे ! हल्ली हल्ली तिचं काय बिघडलंय्, कोण जाणे...रात्र रात्र जागी असते...काल मध्यरात्री उठली आणि बाहेर बकुळीच्या पारावर एकटीच बसून राहिली.

सुधीर : पण निश्चित झालंय् काय त्यांना ?

वीणा : डॉ. मुळे म्हणतात, पित्ताचा विकार....पण आज डॉ. बापटांच्याकडे जाणार आहे.

सुधीर : डॉ. बापट उत्तम डॉक्टर आहेत. ते मला प्रोफेसर होते. ते बरोबर ट्रीटमेंट देतील....पण आई भ्यालेल्या दिसतात. आपण सर्वांनी त्यांना खूप जपलं पाहिजे....काही झालं, तरी त्यांचा आत्मविश्वास ढळता नये...

वीणा : खरं म्हणजे ती तशी भिणारी नाही. पण खचल्यासारखी झालीय्, हे खरं... म्हणूनच ती लग्नाची घाई करतेय्.

सुधीर : तेवढ्यानं त्यांना बरं वाटणार असेल, तर आपण करू लवकर लग्न...आई-बाबा नको म्हणणार नाहीत...वर्ष...सहा महिन्यांनी काय फरक पडणार ?.... आपण उरकून घेऊ त्यांच्या समाधानासाठी...

वीणा : बघू. आधी अण्णांना जाऊन येऊ दे तुमच्या घरी....

[तेवढ्यात नीता आतून उड्या मारीत ओरडत बाहेर येते....“ वीणाआत्या, वीणाआत्या, सुधीरकाकांना घेऊन आत चल...आई चहाला बोलावतेय्....” ती दोघे उठता उठता काळोख होतो.]

का ळो ख

प्र का श

[रामरावांचा दिवाणखाना. दोन दिवसांनंतर. संध्याकाळचे सहा वाजले असतील. दरवाज्यातून रामराव आत येतात. ते कोर्टातून आलेले आहेत. पांढरी पॅण्ट, काळा कोट, हातात वकिलाची ब्रीफची दोन पुडकी. ते पुडकी टेबलावर ठेवतात. कोट काढतात. कोट मांडीवर घेऊन आरामखुर्चीत बसतात.

ते दमलेले आहेत. क्षण, दोन क्षण तसेच बसून आहेत. तेवढ्यात वीणा एका बशीतून पाण्याचा ग्लास घेऊन येते. रामराव गटागटा पाणी पितात आणि ग्लास परत देतात. ]

रामराव : नाटेकर कुठं गेले ?

वीणा : बाजारात जाऊन येतो, म्हणाले....

रामराव : आले, म्हणजे त्यांना मला भेटायला सांग. (ती 'हो' म्हणून वळणार, तोच) तुझी आई कुठं आहे ?

वीणा : झोपलीय् माझ्या खोलीत...

रामराव : (उत्कंठेने) तिला झोप लागलीय् ?

वीणा : छे. नुसती पडली आहे...डोळे सताड उघडे टाकून...कसला विचार करते, देव जाणे. (जाते...पण परत वळून) अण्णा, तिच्या तोंडाकडे.... हाताकडे आपण परत परत रोखून पाहता नये...

रामराव : का ?

वीणा : मग तिला उगाचच संशय येतो...मग ती गडबडते...बेचैन होते....माझ्या तोंडाकडे अशा का बघता, असं मग ती विचारीत राहते.

रामराव : कोण बघत राहतो तिच्याकडे ?

वीणा : दुपारी आज रेखाची आई आली होती...ती, मला वाटतं, विचित्र नजरेनं बघायला लागली...मग ही मध्येच उठून माझ्या खोलीत येऊन पडली कॉटवर... म्हटलं, दमलीस, ग !...तर म्हणाली, रेखाची आई चमत्कारिक पाहते म्हणून आले... (थांबून) सुधीरची आई म्हणाली, अंगावर कोकमसोलं चोळा.

[ तेवढ्यात अंगणाकडे 'भैयाराम, भैयाराम' अशा नाटेकरांच्या हाका ऐकू येतात. ]

रामराव : आज माडीवर गेली होती ?

वीणा : जायला बघत होती, पण रेखानं जाऊ दिलं नाही....माडीवर धनुष्यबाण आहे का, बघायचंय्, म्हणाली

रामराव : (एकदम चकावतात) धनुष्यबाण ? माडीवर धनुष्यबाण ? तिला काय वेडबिड लागलंय्, की काय ?...अप्पांची काय, नाटक कंपनी होती काय ?

वीणा : विजूच्या वेळी गरोदर होती...तेव्हा तिला मिळिणीची वाडी भरली होती....

रामराव : (चिडून) तेव्हाचं धनुष्यबाण माडीवर ! आणि चाल्ली कुठं आता शिकारीला !

काहीतरी आपलं डोकं फिरवून घ्यायचं...नसती कटकट एक एक...

वीणा : नीताला हवंय्, म्हणे . धनुष्य आणि बाण...

रामराव : ते नाटेकरांना सांगून बाजारातनं आणा, म्हणावं...

वीणा : धनुष्यबाणाचं निमित्त. ती कुठली तरी जुनी वेताची आरामखुर्ची शोधतेय् माडी-वर, अण्णा. एवढ्या खुर्च्या खाली सगळीकडे पडल्यात. पण आईला तीच पाहिजे.

[ती जायला वळते. तेवढ्यात नाटेकरांच्या 'भैयाराम....भैयाराम' अशा हाका ऐकू येतात.]

रामराव : नाटेकरांना पाठव. ('हो' असे म्हणून ती बाहेर जाते, आणि नाटेकरांना निरोप देते, नाटेकर येतात आणि अदबाने उभे राहतात.) नाटेकर....

नाटेकर : होय, सैब....

रामराव : नाटेकर, तुम्ही उद्या पालीला जा, आणि जोंधळ्याची किती पोती भरलीत, ते बघा...

नाटेकर : होय, सैब ..

रामराव : तुम्ही उभे का ?

नाटेकर : जातो, सैब ..(जाऊ लागतात, तेवढ्यात)

रामराव : नाटेकर....

नाटेकर : आलो, सैब....(येऊन तसेच उभे राहतात.)

रामराव : (विचार करीत) नाटेकर...पालीच्या शेतात आपलं घर आहे ना....

नाटेकर : या वर्षी नवीन नळे टाकून शाकारणी करायला पाहिजे, सैब ! मंगलोरी कौलं टाकली, तर अधिक उत्तम...

[हे नको ते ऐकताना रामराव वैतागून जातात.]

रामराव : (कंटाळून) ते राहू दे ! पालीच्या घरात एक वेताची आरामखुर्ची होती, माहीत आहे ?

नाटेकर : होय, सैब ! जुनी खुर्ची अप्पांनी तयार करून घेतली होती ! सोळा रुपये पडले होते....

रामराव : ते असू दे ! ती आहे कुठं ?

नाटेकर : वर माडीवर मागे पडली असणार, सैब...

रामराव : उद्या-परवा कधीतरी भैयाराममला सांगून ती खुर्ची खाली काढून घ्या...

नाटेकर : होय, सैब...

[ तेवढ्यात सीताबाई वीणाच्या खोलीतून येताना दिसते. ती थोडीशी उदास आहे. ]

सीता : दुपारी पालीहून माणूस आला होता...मंगारामनं पाठवला होता...
रामराव : तो भेटला मला कोर्टात...
नाटेकर : उद्या मी जातोच आहे पालीला, आईसैब !
सीता : उद्या कधी ?
नाटेकर : आठाची एस्टी आहे सकाळी, आईसैब !
सीता : ( रामरावांना ) मी जाऊ का पालीला नाटेकरांबरोबर ?
रामराव : कशाला ? तिथं आहे काय ?
नाटेकर : छप्पर दुरुस्त करून घेतल्याशिवाय तिथं जाण्यात अर्थ नाही, सैब.
सीता : पण, नाटेकर, तिथं ती आमची जुनी खुर्ची...
रामराव : नाटेकरांना सांगितलंय् मी...
नाटेकर : ती वरच असणार...पालीला नाही ती, आईसैब !
सीता : पण बघा, ती माडीवर आहे का....
नाटेकर : उद्या काढतो, सैब ! ( जायला निघतात. )
सीता : नाटेकर, केशर संपलंय्......हे केशर घातल्याशिवाय दूध घेत नाहीत... झोपताना...
नाटेकर : आत्ता आणून दिलं केशर....वीणाताईकडे ( जायला वळतात, तोच )
सीता : आणि गॅस...
नाटेकर : मागवून घेतो...भैयाराम...भैयाराम....

[ हाका मारीत बाहेर जातात.
सीता रामरावांच्या मांडीवरचा काळा कोट घेऊन हँगरवर लावते आणि खाली बसून रामरावांच्या पायांतले बूट काढते. बाजूला ठेवते. पाय आवळते, तेवढ्यात आगगाडीच्या कर्णकर्कश शिट्ट्या होतात. ती एकदम कानठळ्या बसल्यासारखी अंग काढते. ]

सीता : या कर्कश शिट्ट्यांनी माझं डोकं उठतं...जरा डोळ्याला डोळा लागत नाही...
रामराव : साठ वर्षं झाली या बंगल्याला. साठ वर्षं हा बंगला इथं आहे...आणि साठ वर्षं ते स्टेशन तिथं आहे. तू लग्न होऊन इथं आल्यापासून तीस वर्षं त्या शिट्ट्या होतात...आत्ताच काय बिघडलं तुझं ?

सीता : ते मला माहीत नाही. असले वकिली प्रश्न तुम्ही कोर्टात विचारा......मला विचारू नका...मला आता इथं राहायची इच्छा नाही.

रामराव : (तिच्या केसांवरून हात फिरवतात) मग तुला कुठं जाऊन राहायची इच्छा आहे? (ती दीनपणे त्यांच्याकडे पाहते.) पंढरपूरला? पंढरपूरला जायची इच्छा होती ना?

सीता : (नकारार्थी मान हालवते) आसपास चार माणसं नाहीत, अशा ठिकाणी न्या मला. पालीच्या शेतात जाऊन राहते...

रामराव : आणि मी वकिली सोडू?

सीता : तुम्ही शनिवारी–रविवारी या....मला पाहावंसं वाटलं, म्हणजे....

रामराव : आणि तिथं जेवणाखाण्याचं काय करणार?

सीता : मी साळूबाईला घेऊन जाईन...आणि तिथं म्हणून वनी येईल माझी...... (एकदम आठवून) विन्या बनीकडे गेलाय्, की नाही, कोण जाणे! (विचार करीत) काय त्या बबनरावांना शेण खाण्याची दुर्बुद्धी झाली...

रामराव : (चिडून) तू त्या बनीचा आणि बबनरावाचा परत परत विचार करू नकोस! त्यामुळं तुझी झोप उडते...

सीता : पालीला मला शांतशी झोप लागेल....(कर्कश शिट्ट्या वाजतात. ती एकदम कानांवर हात घेते.)

रामराव : तुझा हट्टच असेल, तर तू जा...पण मी सांगतो, ते ऐक.... तिथं तुझा वेळ जाणार नाही. मी सकाळी गेलो, तर संध्याकाळी धावत येतो. इतका कंटाळा येतो तिथं!

सीता : असू देत. मी वेताच्या आरामखुर्चीत बसेन.... ... आणि बनीबरोबर गप्पागोष्टी करीन...लहानपणापासूनच्या सर्व आठवणी काढीन. मला आता या गजबजा-टाचा, लोकांचा वीट आलाय्......(ते ऐकता ऐकता रामराव डोळे मिटून घेतात. ती वळून पाहते.) तुम्ही झोपताय्, की काय?

रामराव : (एकदम डोळे उघडून) छे...पण हल्ली दिवसा सुद्धा झोप येते...

सीता : हल्ली म्हणजे काय? तुम्हांला झोप येत नव्हती कधी?

रामराव : खरं सांगतो, हल्ली रात्री मला सलग चार-पाच तास झोप मिळत नाही....... एकसारखा मी धसक्यानं जागा होतो...भीती वाटते.......तू उठून माडीवर गेलीस काय...बकुळीच्या पारावर बसलीस काय...

सीता : पारावरची गणपतीची मूर्ती किती जुनी आहे?

रामराव : का? ती खूप जुनी आहे. आधीपासूनची आहे ती...

[थोडा वेळ शांतता.]

सीता : बोटं झडलीत...कान तुटलेत...
रामराव : ( एकदम दचकून ) कुणाचे ?
सीता : गणपतीचे म्हणतेय्...
रामराव : ( एकदम श्वास सोडून ) खूप जुनी मूर्ती आहे ती....

[ काही क्षण दोघेही गप्प, मग आतून वीणा येते. ]

वीणा : अण्णा, चहा घ्यायला येताय् ना ?
सीता : खायला काय केलंय् ?
वीणा : साळूबाई थालीपीठ करतेय्...
सीता : साळूबाई का ?...रेखा कुठं गेलीय् ?
वीणा : रेखा आईबरोबर गेलीय्...
सीता : आणि नीता ?
वीणा : नीताला शाळेतनं घेऊन ती आईबरोबर गेली...येईल एवढ्यात...( आत जात ) येताय् ना, अण्णा ?
रामराव : मी फक्त चहा घेणार आहे...खायला काही नको...
सीता : का ? खा एखादं थालपीठ...
रामराव : भूकच नाहीये ! ( उठून आत जायला वळतात. )
सीता : आणि एकदा देशपांड्यांच्या घरी जाऊन या...
रामराव : ( वळून ) देशपांडे कोण ?
सीता : देशपांडे कोण, म्हणजे काय ?...सुधीरचे वडील. हिनं आणि त्यानं ठरवलंय् लग्न...एकदा त्याच्या वडिलांना भेटायला नको ?....तुम्ही आपले जज्जाच्या खुर्चीवर बसल्यासारखे तोंड मिटून बसणार...लवकर काय ते उरका...मी धड असेपर्यंत....
रामराव : ( जाता जाता ) तुला काय झालंय् ? उगाच जगाच्या चिंता करीत बसायचं आणि तब्येत बिघडून घ्यायची. ( ते आत जातात. )

[ सीताबाई दोन क्षण तशीच विचार करीत शान्तशी बसते. मग ती आपल्या दोन्ही हातांची बोटे निरखून पाहण्यात मग्न होते. तेवढ्यात 'भैयाराम... भैयाराम' अशा हाका मारीत नाटेकर उंबरठ्यापर्यंत येतात आणि घोटाळतात. त्यांना बघून–]

सीता : नाटेकर....( हाताने खूण करून बोलावते. नाटेकर येऊन समोर उभे राहतात. )

तुम्हांला भैयाराम कशाला पाहिजे ?

नाटेकर : मला भैयाराम नको आहे....

सीता : मग तुम्ही हाका का मारताय् ?

नाटेकर : मी अद्याप घरी गेलेलो नाही, हे साहेबांना कळावं, म्हणून...

सीता : ( स्वतःशीच हसत ) तुमचं अवीन सवीन काही तरी चालूच असतं. ते जाऊ द्या. तुम्ही उद्या पालीला जाताय् ?

नाटेकर : हो.

सीता : मग जातानाच माडीवरची वेताची आरामखुर्ची घेऊन का जात नाही ?

नाटेकर : जोंधळा आणायला प्रतापसिंगाचे ट्रक जाणार...त्यात खुर्ची टाकू...एस्टीवर ती टपावर टाकायची...कुठं आपटली....मोडली...

सीता : नको...नको. ट्रकमध्येच घाला. ( थांबून ) आणि घराचं छप्पर दुरुस्त करून घ्यायला किती दिवस लागणार ?

नाटेकर : साहेबांनी हुकूम दिला, की चार–आठ दिवसांचा प्रश्न, आईसैब.

सीता : मी सांगेन त्यांना.

नाटेकर : तसं छप्पर अगदीच मोडकळीस आलेलं नाही...तुम्ही आठ–पंधरा दिवस राहणार, तर....

सीता : आठ-पंधरा दिवस ?...मी दोन–तीन वर्षे राहीन...कदाचित कायमसुद्धा.

नाटेकर : छे...आपलं हे वडिलोपार्जित घर आहे...( वर बघत ) हे अप्पासाहेबांचं छत्र आहे, ते सोडून....

सीता : तुम्ही येणार कधी परत ? पालीहून ?

नाटेकर : उद्या संध्याकाळी. मला यायलाच पाहिजे. बायकोचं सगळं करावं लागतं ना.

सीता : ती उठतच नाही ?

नाटेकर : छे. आता जाऊन अंगाखालचं मेणकापड बदलणं...चादरी, फडकी धुणं इथपासून सगळं मला करायला पाहिजे...शिवाय जेवण.

सीता : तुम्ही तिलाही पालीला का ठेवीत नाही ?

नाटेकर : ( हात जोडून ) आईसाहेब, तुम्ही एवढं उदार अंतःकरणानं म्हटलंत, आम्हांला सर्व मिळालं. देव तुमचं कल्याण करो.

सीता : मी तुम्हांला रोज तिच्या प्रकृतीचं विचारते, तेव्हा ती बरी आहे, असं तुम्ही सांगता.

नाटेकर : ती आमच्या स्वामींची दीक्षा. स्वामी सांगतात. बरं, ते चघळावं...वाईट ते थुंकावं...म्हणून बरी आहे, म्हणतो....( खिशातून पुडी काढून देतात. )

सीता : ( पुडी घेत ) हे काय ?

नाटेकर : आमच्या स्वामींनी दिलेली उदी आहे. ती रोज कपाळाला....हाताच्या बोटांना

लावा....अकरा दिवसांत गुण. ठरलेला.

सीता : लावते. तुम्ही पालीच्या घराच्या छपराचं काय ते लवकर बघा.

नाटेकर : होय. आईसैब....( जाऊ लागतात, तोच )

सीता : आणि, नाटेकर, तुम्ही रोज एवढे बाजारात जाता...पण भरताची वांगी आणायचं लक्षात राहत नाही तुमच्या....साहेबांना भरीत आवडतं. माहीत आहे ना तुम्हांला ?

नाटेकर : मी आठवणीनं बघतो, आईसैब, स्टेशनसमोर नाहीत. बाजारात नाहीत. एस्टी स्टॅण्डवर नाहीत....यंदा वांग्यावर काय रोग आलाय् , कळत नाही... उद्या पालीला बघतो....( जाऊ लागतात. )

सीता : आणि भैयारामला दूध काढायला सांगा...आज माझ्याच्यानं होणार नाही. ( हाताची बोटे न्याहाळते. )

नाटेकर : सांगतो मी. आईसैब. ( जातात. )

[ हे चालू असतानाच बाहेर रेखा आणि नीता आल्या आहेत. त्यामुळे त्यांची –विशेषतः नीताची गडबड ऐकू येते. नीता शाळेच्या पोशाखात आहे. दप्तर, पाण्याची बाटली. तेवढ्यात स्वैपाकघराच्या दारातून रामराव येतात. याच गड-बडीत 'भैयाराम . भैयाराम' अशा हाका मारीत नाटेकर बाहेर जातात. आधी नीता धावत आत येते आणि आजीला मिठी मारते. आजी तिच्या गालाचा दीर्घसा मुका घेते. ]

नीता : आजी, मी तुला एक कोडं घालू ?...( हट्टाने ) आधी तू मला एक कोडं घाल....

सीता : मी नाही घालत...माझं कोडं तुला सुटायचं नाही....( रामराव तिच्याकडे वळून बघतात, ती सहज बोलली आहे....आणि नीताचे स्पर्शसुख घेत ती तिला कौतुकाने कुरवाळते आहे. ) तूच घाल काय ते तुझं कोडं...पण मुंग्यांचं नको.

नीता : नाही. मुंग्यांचं घालणार.

सीता : हिची आपली सगळी कोडी मुंग्यांची ! त्यामुळं घरभर मुंग्या...

नीता : एक मुंगी चालली होती....तिच्या मागे आणखी पाच मुंग्या होत्या. तिला विचारलं, मुंगे–मुंगे, तुझ्या मागे किती मुंग्या आहेत ? तिनं वळून पाहिलं आणि ती म्हणाली...पाच मुंग्या. दुसरीला विचारलं, मुंगे–मुंगे, तुझ्या मागे मुंग्या किती आहेत ? तिनं वळून पाहिलं आणि ती म्हणाली, चार मुंग्या. तिसरीला विचारलं, मुंगे–मुंगे, तुझ्या मागं किती मुंग्या आहेत ? तिनं वळून

पाहिलं आणि ती म्हणाली...माझ्यामागे शंभर मुंग्या आहेत... हे कसं ?

सीता : तेवढ्यात आल्या असतील आणखी सत्याण्णव मुंग्या.

नीता : नाही. तीनच मुंग्या तिच्यामागे होत्या...मग ती शंभर का म्हणाली ?

सीता : का ?

नीता : अग, तिला खोटं बोलण्याची सवय होती.

सीता : ( तिच्या गालावर चापटी मारीत ) तुझी वहीण, तू कशी सकाळी तोंड धुतलं, म्हणून खोटं खोटं सांगतेस ?

नीता : ( हसत ) मी आणखी एक कोडं मुंग्यांचं घालू ?

सीता : नको, ग, बाई...माझ्या पायांत आल्या मुंग्या...

नीता : पुढं कर...मी दाबते तुझे पाय....( पाय दाबता दाबता पायांकडे बघते... आणि ) आजी, तुझ्या पायांना मुंग्या चावल्यात ?

[ सीता पायांवर हात फिरवीत पाय निरखून बघते, रामराव बसल्या बसल्या पायांकडे वळून बघतात आणि उठतात. ]

रामराव : नीता, नाटेकरांना म्हणावं....गाडी बाहेर काढायला सांगा...( ती धावत जाते. )

सीता : कुठं जाताय् आता ?

रामराव : डॉक्टर बापटांकडे जाऊन येतो. तुझे सगळे रिपोर्टस् मिळणार. ( कोट चढवू लागतात. तेवढ्यात रेखा आतून येते. )

रेखा : आज एक्स्प्रेस दीड तास लेट आहे. मी विचारून आले येताना...

सीता : मला वाटलंच. नाही तर कधीच यायचा विनू. ( थांबून ) विमलाबाई जाताना सांगून नाही गेल्या ?

[ गोठ्यातून गाय हंबरते. ]

रेखा : आई जाताना आली होती सांगायला तुमच्या खोलीत...

सीता : मी जरा पडले होते वीणाच्या खोलीत....

रेखा : आई वीणाच्या खोलीतच गेली होती, येते, म्हणून सांगायला....पण तुम्ही गाढ झोपला होता, म्हणाली...( पुन्हा गाय हंबरते. )

सीता : ती कावेरी हंभरतेय् , बघ....भैयारामला सांग...दूध काढायला....मला नाही आज होणार....( रेखा 'हो' म्हणते आणि 'भैयाराम' अशी हाक मारीत बाहेर जाते. सीताबाई रामरावांना ) ऐकलंत ना ? म्हणे, मी गाढ झोपले होते.

किती खोटं ! मिनिटाची मला झोप नाही....पण ही....हिची आई...आलीच नाही सांगायला. ही विमलाबाई आणि ते नानासाहेब...मोठी कावेबाज माणसं आहेत...आमच्या विन्याला बरा मुठीत धरलाय् त्यांनी. त्याला वकिली सोडायला लावली आणि फॅक्टरी घालायला लावली....ती धड चालत नाहीए...

रामराव : ( जाता जाता ) आपण सगळ्यांच्यांत लक्ष घालू नये... मी जाऊन येतो.... ( जातात. )

सीता : उशीर...नका करू....( रेखाला हाक मारते ) रेखा...अग, रेखा... ( रेखा येते. ) वीणा कुठं ?

रेखा : ती अभ्यास करतेय्...

सीता : आज सुधीर नाही आला ?

रेखा : कुठं आलाय् दोन दिवस ! ( सीता उदीची पुडी देते ) हे काय ?

सीता : ही चुलीत घाल...नाटेकरांनी त्यांच्या स्वामीची उदी दिलीय्... म्हणे, अकरा दिवसांत हटकून गुण....याची बायको चार वर्षे बिछान्याला खिळलीय्...

[ रेखा जायला वळते, तोच दारात विनू दिसतो. हातात छोटी बॅग. खांद्यावर स्वेटर. ]

विनू : अग, एक्सप्रेस दोन तास लेट.

रेखा : स्टेशन मास्तर म्हणाले होते...दीड तास लेट.

विनू : ते अर्ध्या तासापूर्वी म्हणाले असतील.

सीता : तू बैस...असा जवळ बैस.... ( विनू एका मोढ्यावर जवळच बसतो. रेखाला ) चहा आणून दे, ग, त्याला.

विनू : फक्त चहा...खायला काही नको.

रेखा : एक थालीपीठ खा. ( जाते. )

विनू : नको. मी लवकर जेवीन...अण्णा कुठं गेले ?

सीता : बापटांकडे.

विनू : अग, मी शहापूरला मालाच्या ऐंशी पेट्या पाठवल्या...

सीता : ते तुझं राहू दे. तू बनीला भेटून आलास ?

विनू : हो. उशिरा पोचलो. त्यामुळं रात्री तिथंच राहिलो...

सीता : कशी आहे ? ( विनू खांदे उडवतो ) लुगडी दिलीस ? आणि दोनशे रुपये ?

विनू : सगळं दिलं...मावशी खूप रडली....( सीताबाई डोळ्यांना पदर लावते.)

सीता : काय म्हणत होती ?

विनू : काय म्हणणार ?

[रेखा चहा आणून देते आणि बाजूला एका मोढ्यावर बसते.]

सीता : जेवण काय केलं होतं ?

विनू : साधंच होतं. पण घोसाळ्याची भजी केली होती.

सीता : (थोडी आनंदित होते) बनीनं अगदी लक्षात ठेवलंय्, विनूला घोसाळ्याची भजी आवडतात, ते... तिलासुद्धा तीच भजी आवडतात....मागं एकदा आली होती इथं...(रेखाला सांगते) विनू लहान होता...नाटेकर बाजारात हिंड हिंड हिंडले...आणि एवढं....केळ्याएवढं एकच घोसाळं घेऊन आले. केवढी ?....आठ–दहा भजी झाली...तर ती सगळी या विन्यानं आवडली, म्हणून खाऊन टाकली....दोन ठेव, म्हणून मी त्याच्या मांडीला चिमटासुद्धा काढला...

विनू : (हसत) तो डाग अजून मांडीवर आहे. (सगळे हसतात) पण एवढ्या वर्षा-नंतर काल रात्री पुन्हा परिस्थिती तीच. माझ्या आणि मावशीच्या वाट्याला दोन–दोनच भजी. बाकीची सगळी ताटभर भजी बबनरावांनी आणि तिनं फस्त केली.

सीता : तीही जेवायला होती ?

विनू : ती तिथंच राहते आता...मावशीच सर्वांचं जेवण करते.

सीता : (चिडून) म्हणजे बनी स्वैपाकीण की काय ?...अन्नात विष कालवून घाल, म्हणावं...

विनू : ती पक्की आहे....ती आधी मावशीला जेवायला लावते...

सीता : काय, कधी कोणाच्या नशिबी येईल....आणि....

विनू : गेल्या आठवड्यात भांडण झालं...मावशीच्या गळ्यातली बोरमाळ तिनं मागि-तली, म्हणून....बबनरावांनी माळ जबरदस्तीनं मावशीच्या गळ्यातून काढली.

सीता : बोरमाळ ? अरे, कर्मा ! मी घातली होती तिला लग्नात. चांगली बारा तोळ्यांची माळ...तिनं द्यावी का ?

विनू : जबरदस्ती केल्यावर ती तरी काय करील ?

सीता : काय करील, म्हणजे काय ? तिनं त्या बबन्याला एकदा साफ साफ सांगायला हवं.

विनू : सांगितलं तिनं...म्हणाली, मी फार सहन केलंय्. आता या घरात मी तरी राहीन, नाहीतर ती तरी राहील...

सीता : अस्सं तोंड उघडून तिनं बोलायला हवं !

विनू : पण बबनराव म्हणाले, उगाच मिजास करू नकोस...तू किंवा ती, यांतलं उत्तर काय, ते तुला माहीत आहे...मुकाट्यानं आत जा आणि कामाला लाग...

सीता : (रागाने) काही नाही....तिनं तिथं मुळीच राहता नये. आता हे खूप झालं...

विनू : मी येताना ती खूप रडली. म्हणाली, तुझा रोग आपल्याला लागला, तर किती बरं झालं असतं...

सीता : (एकदम विनूच्या तोंडाकडे बघत राहते) माझा रोग? कसला रोग म्हणून तिला सांगितलंस?

विनू : (किंचित गडबडून) रोग नव्हे, ग. तुझा विकार...झोप नाही....पित्ताची दादडं उठतात....

[तरीही सीताबाई विनूकडे संशयाने थोडा वेळ बघत राहते.]

सीता : (कुठेतरी बघत स्वतःशीच बोलल्यासारखी) मी पालीला गेले....की बनील तिथं घेऊन जाईन...का म्हणून तिनं स्वैपाकीण म्हणून दुसऱ्यासाठी राबायचं ..? मी जाऊन तिला घेऊन येते...आम्ही पालीला राहू.

विनू : पालीला जाते आहेस?

सीता : हो.

विनू : कधी?

रेखा : त्यापेक्षा त्यांना इथं आणा, आई, तुम्ही.

सीता : इथं नाही यायची ती, आणि मलाही इथं त्रास होतो.

रेखा : कसला त्रास?

सीता : या गाडीच्या कर्कश शिट्या... आणि येणाऱ्या–जाणाऱ्यांची वर्दळ. मला थोडे दिवस शांतपणा हवा आहे. मी आणि बनी राहू पालीला....

विनू : आणि आम्ही?

सीता : तुम्ही या अधनं मधनं...

विनू : कधी चाललीस? (हसतो.)

सीता : तुला हसायला काय झालं?...(तो परत हसतो.) बघ, मी पालीला जाते, की नाही, ते. मला इथला...या गडबड–गोंधळाचा अगदी कंटाळाच आलाय्!

विनू : तिथं हार्मोनियम घेऊन जा...

[ती हार्मोनियमच्या पेटीकडे एका वेगळ्याच हुरहुरल्यासारख्या नजरेने बघत राहते.]

सीता : हार्मोनियम. (बघत राहते) जादूची पेटी आहे ती. या पेटीवर आमच्या बाबांची बोटं नाचायला लागली, म्हणजे त्या पेटीतनं स्वर्ग....स्वर्ग निर्माण

व्हायचा....किती माणसं त्यांच्या हाताखाली शिकून गेली . पण बनी शिकली नाही. मी शिकले....(एका वेगळयाच वातावरणात ती हरवून जाते.) बनीनं पेटी शिकावी, म्हणून बाबांनी किती प्रयत्न केले...पण नाही...नाही, म्हणजे नाही....बनी एवढीशी....माझ्या कुशीत झोपायची...अगदी भिंतीला पाल चिकटावी, तशी मला चिकटायची...बाबा तिला सारखे हाका मारायचे... बनी...बन्या...बने....ये, ग...पेटी शिकवतो तुला...ये. सा रे ग म प–पण नाही, म्हणजे नाही...बनी मला अधिकच चिकटायची...झोपेचं फार तिला...(एकदम जागी झाल्यासारखी इकडे तिकडे पाहते. रेखा आणि विनू तिलाच एकटक नजरेने आणि नवलाईने पाहिल्यासारखे पाहत आहेत...ती किंचित गडबडते.) काय सांगत होते मी ? (रेखाला) बाहेर गणपतीपुढं निरांजन लावलं ?

रेखा : लावते. (उठते.)

सीता : लाव जा. नेमानं लावीत जा. (रेखा जाते) अप्पांची श्रद्धा होती त्या गणपतीवर....(विनूला) त्या गणपतीची बोटं....कान कसे झडलेत, पाहिलेत...?

विनू : वाऱ्या-पावसानं ते....

सीता : वाऱ्यापावसानंच...आणखी कशानं ? (इकडे तिकडे बघत) वीणा कुठं गेली ?

विनू : असणार आत...(रेखा निरांजन घेऊन बाहेर जाते.)

सीता : (हाक मारते) वीणा...एऽऽवीणा...(किंचित भ्रमिष्टपणे) ही बनी अशी माझ्या पोटाला मिठी मारून झोपायची... त्या स्पर्शाची आठवण झाली, तरी मन हुरहुरतं माझं...(वीणा येते.) वीणा, आज मी तुझ्या खोलीत झोपणार....

वीणा : का ?...

सीता : बनी माझ्या पोटाला बिलगून झोपायची....तशी तू झोप ...अगदी चिकटून... तिच्या त्या स्पर्शातली ऊब इतक्या वर्षांत मी विसरले आहे......बनी...... (वीणाला पोटाशी धरून कुरवाळते.) माझी बनी...मीच लग्न ठरवलं तिचं आणि तिच्या आयुष्याचं नुकसान केलं...(रडू लागते.)

विनू : तू काही नुकसान केलेलं नाहीस तिचं...तू आई, वाईट वाटून घेऊ नकोस. लग्न झाल्यानंतर पंधरा वर्षांनी बबनराव असे वागू लागले, तर त्यात तुझा काय अपराध ?

सीता : अपराध कुणाचाही असो. बनीला भोग भोगावे लागताहेत....

वीणा : नशिबात असेल, तर तसं होणार. (रेखा परत आत येते. नेहमीच्या प्रथेप्रमाणे सीताबाईला, वीणाला कुंकू लावते, त्या तिला कुंकू लावतात.)

सीता : ते खरं, ग, बाई. (कपाळावर दोन बोटं ओढून) इथं जे असेल, तसं होणार.

[ हाताची बोटे बघत....पायांना हाताचे स्पर्श करीत ती शान्तपणे दिवाणावर बसून राहते.
क्षणभर कुणीच काही बोलत नाही. काही क्षण तसेच जातात. ]

विनू : ( चुळबुळत ) अण्णांना उशीर होणार का ?

सीता : डॉक्टर बापटांकडे जातो, म्हणून सांगून गेले...आणखी कुठं गेले, की काय, कोण जाणे.

विनू : मला ज्याम भूक लागलीय्...

रेखा : तुम्हांला वाढू का ?

वीणा : तू जेवून घे. किती वेळ वाट पाहायची ?

सीता : ( क्षणभर बघत राहते आणि ) येतील, रे, आत्ता... थांब थोडा वेळ...

विनू : मला भूक लागलीय् ..

सीता : ( हसत ) अशा वेळी भुकेकडे लक्ष द्यायचं नाही...आई आमची म्हणायची... भुकेकडं लक्ष दिलं नाही, की भूक लागत नाही. भुकेकडं लक्ष दिलं, म्हणजे भूक जास्त लागते ..त्यांच्या बरोबर आपण जेवावं...

विनू : पण अण्णा नेहमी म्हणतात ना, मला यायला उशीर झाला, तर तुम्ही जेवून घ्या, म्हणून ?

सीता : ( उठून त्याचे केस घुसळते ) विन्या, तू तुझ्या अण्णांना ओळखत नाहीस. त्यांच्या मनात एक असणार...बाहेर ते दुसरंच बोलणार....मनात काय वाटतं, ते बाहेर दाखवणार नाहीत...माझी वाट पाहू नका....तुम्ही जेवून घ्या, असं ते सांगतील...पण त्यांच्या आधी तुम्ही जेवलात, तर ते त्यांना आवडणार नाही. मग दोन दिवस गालाच्या पुऱ्या फुगवतील. ( थांबून ) आणि तुम्ही रोज पाहता ना ? ते जेवताना मी त्यांच्या पाठीमागे उभी असते.......त्यांच्या पाठीमागे सदैव वाघ लागलेला...घाईघाईनं जेवणार...आणि ठसका लावून घेणार...रोजचं आहे...मग त्यांच्या पाठीवर हात फिरवून, 'वर बघा...वर बघा सासू तुमची कांदे खातेय् !' असं म्हणायला पाहिजे. ( हसते ) प्रत्यक्षात त्यांची सासू कांदेच खात नव्हती. माझ्या आईच्या डोळ्यांसमोर कांदा नको...लसूण नको. ( हसते....आणि पुन्हा दिवाणावर बसते...... सगळ्यांच्या तोंडाकडे टकटक बघते....मग रेखाला ) साळूआई गेली ?

रेखा : नाही. झोपलीय् पडवीत.

सीता : सारखी, मेली, झोपत असते... तिची थोडी झोप जरी मला येती... ( स्वतःशीच ) नाटेकर गेले, वाटतं....भैयाराम भैयाराम हाका नाही ऐकू आल्या....एकदम आठवून ) हे बघ, रेखा, उद्यापासनं एका डब्यातनं एवढीशी

पेज आणि लोणचं त्यांना देत जा.

रेखा : कुणाला ?

सीता : नाटेकरांना, ग...त्यांची बायको बिछान्यातनं उठत नाही...सगळं यांनाच करावं लागतं...(वीणाला) उद्या मीच घेऊन जाईन पेज....तू ये, ग, वीणा, माझ्याबरोबर...कारण नाटेकर उद्या सकाळीच पालीला जाणार आहेत... (इकडे तिकडे बघते. सगळेजण तिच्याच तोंडाकडे बघत राहतात. ते टाळण्यासाठी...) बनी आणखी काय म्हणत होती?

विनू : बाबांची पेटी तू वाजवतेस का, विचारीत होती...

सीता : बाबांची पेटी. आता आठवण म्हणून ठेवायची....दरवर्षी बाबा पंढरीची वारी करायचे...ही पेटी कित्येक वर्षं पंढरीला जाऊन आली आहे...

विनू : मावशी या पेटीच्या किती तरी आठवणी सांगत होती...बाबांच्या बोटांसारखीच तुझीही जादूची बोटं आहेत, म्हणून सांगत होती....

सीता : (विषण्ण होत) जादूची बोटं...एकदा पंढरीला जायची इच्छा होती...ही बोटं बरी असताना...

वीणा : खरंच. पूर्वी किती छान पेटी वाजवायची आई! बोटं नुसती झरझर नाचायची.

रेखा : तुम्ही पेटी वाजवणं थांबवलंत, म्हणून सुद्धा तुमची बोटं आखडत असतील....

विनू : बघ ना, ग, आई, जरा पेटी वाजवून, थोडा वेळ वाजव...

सीता : नको, रे, बाबा. त्यात आता माझं मनच लागत नाही.

वीणा : प्रयत्न तर कर....विनू, तिला पेटी आणून दे....दे...दे...

सीता : नको....नको...नको, रे, विनू....

विनू : (उठून पेटी देत) तू पेटी वाजव...तरच माझी भूक थांबेल...नाहीतर हा चाललो मी जेवायला.

[ती पेटी उघडते...अंतराळात दृष्टी ठेवते . आणि पेटीवर बोटे फिरवते.... काही चांगले सूर निघताच सर्वजण टाळ्या मारतात आणि तिला कौतुकाने बिलगतात. ती सुखावते. वीणा एका गाण्याची फर्माईश करते .. आणि सीताबाई आढेवेढे न घेता ते गाणे पेटीवर वाजवण्यात तल्लीन होते...आणि संपता संपता सर्वजण आनंदाने टाळ्या वाजवतात आणि खूश होतात. सीताबाईही खूश होते.]

रेखा : पाहिलंत ना! आज छान फिरली.

वीणा : अगदी पूर्वीची आठवण आली मला.

विनू : आणखी एक वाजव ना अण्णा येईपर्यंत...

सीता : (हसत) तुझे अण्णा येऊन बाहेर पारावर बसलेले सुद्धा असतील... त्यांना असं चोरून ऐकायला आवडतं... (वीणा धावत जाते आणि दरवाज्यातून पाराकडे बघते. टाळ्या वाजवीत मोठमोठ्याने हसते.)

वीणा : खरंच. अण्णा पारावर येऊन बसलेत!

[रेखा आणि विनूही दरवाज्यात जातात. तिघेही हसत टाळ्या मारतात. वीणा पुढे जाऊन अण्णांना घेऊन येते. तोपर्यंत सीताबाई स्वतःशीच तृप्तपणे स्मित करीत पेटीवर बोटे फिरवीत राहते... सूर ऐकत बसते. वीणा अण्णांना ओढत आत आणते.]

सीता : किती वेळ बाहेर बसला होता?

रामराव : कसं कळणार?

सीता : वाः! केवढी दाद दिली...आता जेवायला चला...आणि आता सावकाशीनं... बत्तीस वेळा चावत जेवायला शिका...प्रत्येक वेळी वर सासू दाखवायला मी नसणार....(ते तिच्याकडे एकदम संतापाने चमकून पाहतात. तिचे लक्ष नाही.) मी आता पालीला जाणार....त्या घरात...(रामराव गंभीर होतात.)

रेखा : वाढायला घेऊ का?

रामराव : तुम्ही जेवून घ्या.

विनू : आम्ही तुमच्यासाठी थांबलोय्, अण्णा.

रामराव : (गंभीरपणे) मी जेवणार नाहीए.

सीता : का?

रामराव : मला भूक नाही....

सीता : दूध तरी घेणार नेहमीचं...? (रेखाला) आणलंय् ना, ग, केशर नाटे-करांनी?

रामराव : तुम्ही जेवून घ्या....विनू, तू जेवून घे...

[रामराव अस्वस्थ होतात. सर्वजण रामरावांच्या तोंडाकडे बघत राहतात.]

विनू : (गंभीर . अस्वस्थ होत) अण्णा, बापटांनी रिपोर्ट दिला?

रामराव : तू जेवून घे. आपण मग बोलू...आधी तुम्ही सर्वांनी जेवून घ्या. (थकून खाली बसतात.)

सीता : (शान्तपणे) तुम्ही जेवून घ्या. (एकदम सर्वजण दचकारून सीताबाईकडे बघतात) बापट डॉक्टरांनी काय सांगितलंय्, ते... (अण्णांना) तुम्ही सांगायला नको. मला माहीत आहे...(सर्वजण पुतळ्यासारखे निर्जीव होतात. मग क्षणभराने) आणि अप्पांनी माडीवर गळफास लावून का घेतला, हेही मला माहीत आहे...

[सर्वजण तिच्याकडे टक लावून विस्मयाने पाहतात.
पेटीच्या सुरांचे खिन्न, विषण्ण संगीत सुरू होते.
पेटीवर ठेवलेल्या हाताची बोटे ती निरखून पाहत असतानाच काळोख होतो....]

का ळो ख

प्र का श

[स्थळ तेच. रामरावांचा दिवाणखाना. वेळ रात्रीची. चार–सहा दिवसांनंतर. प्रकाश येता येता नाटेकर बाहेर 'भैयाराम–भैयाराम' अशा हाका मारीत आत येतात. रामराव मांडीवर एक उशी ठेवून दिवाणावर बसले आहेत. उशीवर पत्त्यांची पाने ठेवीत ते पेशन्स गेममध्ये आपले दुःख विसरण्याचा प्रयत्न करीत आहेत. तेवढ्यात नाटेकरांच्या हाका. नाटेकर आत येताच रामराव त्यांच्याकडे अनोळखी नजरेने पाहतात.]

रामराव : भैयाराम आलाय्?
नाटेकर : (ताठ उभे राहून) कुठं आलाय्? चार दिवस झाले, दारू पिऊन पडला असेल. तोही नाही ..आणि कालपासून साळूबाईही नाही...
रामराव : साळूबाई कुठं गेली?
नाटेकर : तिचे सांधे धरलेत...
रामराव : मुळ्यांकडनं औषध घे, म्हणावं...तात्पुरतं कामाला बघा कुणी तरी....
नाटेकर : उद्या बघतो...दोन दिवस दूध मीच काढतोय्...

[रामराव पत्त्यांची पाने टाकतात. क्षणभर मग त्यांच्या लक्षात येते, नाटेकर तिथे तसेच मांड्यांना मुठी चिकटवून उभे आहेत, रामराव मान वर करून 'काय?' या अर्थी बघत राहतात.]

नाटेकर : सैब, मी काल आईसैबांना म्हटलं, तुमची अमरावतीच्या आश्रमात जायची इच्छा नसेल, तर माझ्या घरी राहा....मी त्यांची सेवा करीन दिवसभर.

[ रामरावांच्या प्रतिक्रियेसाठी क्षणभर तसेच उभे राहतात. रामराव पत्ते लावतात. ]

रामराव : ( पत्ते लावीत...खालच्या मानेने ) नाटेकर, तुम्ही उभे का ?
नाटेकर : जातो, सैब....( वळतात आणि माडीचे दार उघडून वर जाऊ लागतात. )
रामराव : वर दिवा तरी आहे ?
नाटेकर : लावलाय्, सैब...( वर जातात. )

[ रामराव पत्त्यांत मग्न, तेवढ्यात छोटी नीता येते. ती घरातल्या वातावरणामुळे अस्वस्थ आहे. ती येते आणि एका कोपऱ्यात गरीब होऊन उभी राहते. आपल्या फ्रॉकशी चाळा करते...मग नखे खात इकडे तिकडे बघत हळूच ती सीताबाईच्या खोलीच्या दारातून वाकून आत बघते...आणि पटकन मागे सरते. दिवाणाच्या एका टोकाला बसते...फ्रॉकचे टोक चावत रामरावांकडे बघते. ]

नीता : आजोबा...
रामराव : तू जागी का अजून ?...झोप जा....( नीता गप्प. ) जेवलीस ?
नीता : आज कुणीच जेवलं नाही. ( थांबून ) आजोबा, तुम्हांला मुंगीचं कोडं घालू ?
रामराव : तू दूध पी...आणि झोप जा. रात्र झालीय्....नऊ वाजून गेले...( पत्ते टाकू लागतात )

[ नीता निराश होऊन उठते. हळूच ती सीताबाईच्या खोलीत वाकून बघते. तेवढ्यात रेखा तिलाच शोधत घाईघाईने येते. मनातून रागावले, रामरावांच्या लक्षात येणार नाही, अशा बेताने नीताच्या पाठीत धपाटा घालते आणि तिला ओढत, फरफटत आपल्या खोलीत नेते...रामराव पत्त्यांची पाने उशीवर टाकत आहेत.

दारात सुधीर दिसतो. रामराव शान्तपणे पत्ते टाकत आहेत. सुधीर येतो आणि शेजारी बसतो. क्षण, दोन क्षण रामरावांचे लक्ष जात नाही. त्यामुळे तो जरासा अवघडतो. किंचित हालचाल करून, खाकरून लक्ष वेधण्याचा प्रयत्न करतो. पण रामराव चिंताग्रस्त असल्यामुळे त्यांचे लक्ष जात नाही. मग सुधीर न

राहवल्यामुळे दबून प्रश्न विचारतो. ]

सुधीर : आईचं कसं आहे ?

[ रामराव एकदम दचकतात आणि वळून बघतात. समोर कोण बसलाय्, हे क्षणभर त्यांच्या लक्षात येत नाही. मग....]

रामराव : अरे, तू ? सुधीर ?...मला वाटलं, विन्याच बसलाय्.
सुधीर : आईचं कसं आहे ?
रामराव : ( दुर्लक्ष करीत ) एवढी रात्र करून कसा आलास ?
सुधीर : उद्या मुंबईला जातोय्...
रामराव : एकदम ? ( रामराव अवघडलेले आहेत. ) एकदम मुंबईला ?
सुधीर : दवाखान्याची एक जागा मिळतेय्...
रामराव : परत येणार कधी ? एकदा लग्नाचं काय , ते ठरवायला हवं.
सुधीर : आईचं कसं आहे ?
रामराव : तसं बरं आहे...पण हवेच्या ठिकाणी थोडे दिवस...( गडबडून ) वीणाला बोलावतो, हांऽऽ ! तिला सांग...तू उद्या जातोय्स, ते...( आत जाणार, तोच ! )
सुधीर : ( गडबडून ) थांबा... थांबा...मी विनूशीच बोलतो....
रामराव : ( हाक मारतात ) विनू... अरे विन्या...( सुधीरला ) विन्याची जरा गडबड चाललीय्...हवेसाठी तिला कुठं न्यावी...पालीला घर आहे आमचं... ( तेवढ्यात विनू बाहेरून येतो. ) अरे विनू, सुधीर आलाय्, बघ...( असं सांगत ते बाहेर आपल्या कचेरीकडे जातात. )
विनू : ( बसत ) तुझ्याच घरून आलो आत्ता मी...( तो चिंताग्रस्त आहे. )
सुधीर : मी हॉस्पिटलमधून आलो परस्पर....( दोघेही क्षणभर गप्प बसतात. एकमेकांकडे बघतात. नजरा टाळतात. मग अवघडलेली अवस्था जावी, म्हणून ) उद्या मी मुंबईला जातोय्...
विनू : अचानक ? तुझ्या घरी कुणी म्हणालं नाही मला...
सुधीर : घरी बाबा काय म्हणाले ?
विनू : हे लग्न जमायचं नाही, म्हणाले...देवीचा कौल झाला नाही, म्हणाले.

[ दोघे स्तब्ध होतात. तेवढ्यात पाठीमागे वीणा येऊन उभी राहते. ती खिन्न आणि गंभीर आहे. ती तेथे उभी आहे, हे त्यांच्या लक्षात आलेले नाही. ]

सुधीर : हे सगळंच क्लेशकारक आहे.

विनू : तुझ्या आई–वडिलांचं मला माहीत नाही...पण देवी...देवीचा कौल.. यावर तुझा विश्वास आहे.... ?

सुधीर : तुला खरं सांगू ? ते खोटं कारण आहे...

[ एकदम दोघांचेही लक्ष वीणाकडे जाते. दोघेही एकदम चमकून, तिच्याकडे क्षणभर अवाक् होऊन बघत राहतात. ]

विनू : ( वीणाला ) तू जरा आत जाशील का ?

वीणा : का ? सगळं माझ्या लक्षात आलंय्...बोला तुम्ही. मी नाहीच आहे, असं समजून.

[ ते दोघेही तिच्याकडे बघत क्षण, दोन क्षण गप्प, गंभीर होतात. ]

विनू : सुधीर, तुम्हांला वाटतंय्, तसलं काही नाहीए.

सुधीर : तसलं काही म्हणजे ? ( विनू गप्प होतो. क्षणभराने ) डॉ. बापट माझे प्रोफेसर होते.

विनू : मी म्हणतो, थोडं थांबा...आणि मग आपण निर्णय घेऊ.

सुधीर : तू काय निर्णय घेतला असतास ? लग्नाआधी हे असं तुझ्या सासूला झालंय्, असं कळलं असतं, तर ?

वीणा : ( पुढे येत ) सुधीर, तू डॉक्टर आहेस...कसंही बोलू नकोस. बापटांना पुनः विचार....हा रोग सांसर्गिक नाही, असं त्यांनी सांगितलंय्...तो साफ बरा होईल...प्राथमिक अवस्था आहे...साफ बरा होईल, असं त्यांनी सांगितलंय्... आणि हा रोग आनुवंशिक नसतो, हे तुला माहीत असणारच.

[ सुधीर खाली मान घालून गप्प बसतो. दोन क्षण कुणीच बोलत नाहीत. ]

वीणा : आपण आधी लग्न केलं असतं आणि आज हे कळलं असतं, तर तू मला आज टाकलं असतंस ? ( तो तसाच गप्प बसून राहतो. अशा अवघडलेल्या अवस्थेत काही क्षण जातात. मग ) ठीक आहे. ( मन घट्ट करून ) ठीक आहे. विनू, तू मनाला काही वाटून घेऊ नकोस. हे लग्न मोडतंय्, याचा मला आनंदच होतोय्. फक्त आईला... आणि आता अण्णांनाही कळू देऊ नकोस...( पुनः एकदम शान्तता. ती सुधीरकडे बघत तशीच उभी राहते.

सुधीर उठतो.)

सुधीर : वीणा, क्षमा कर मला. हे सगळं दुःखदायक आहे.

[ भावनावेगाने त्याला पुढे काही बोलता येत नाही. तो खाली मान घालून निघून जातो. तो गेल्यावर वीणा आणि विनू तिथेच उभे राहतात. तेवढ्यात रामराव आपल्या कचेरीतून येतात. ]

रामराव : तो मुंबईहून परत कधी येणार ?
वीणा : कोण ?
रामराव : सुधीर...
वीणा : आठ-पंधरा दिवसांनी.
रामराव : म्हणत काय होता ?
वीणा : आईचं कसं आहे, ते विचारीत होता.
रामराव : काय सांगितलंस त्याला ?

[ गळ्याशी कढ आल्यामुळे तिला बोलता येत नाही. आवेगाने एकदम निघून जाते.

विनू तिथेच उभा आहे. अस्वस्थपणे फेऱ्या मारतो.

दोन शिट्ट्या वाजतात. रामराव पत्ते घेऊन बसतात. उशीवर पत्ते टाकतात. गोठ्यातून गाय हंबरल्याचा आवाज येतो.

काही क्षण असेच जातात. तेवढ्यात माडीवर खडखडाट होतो. विनूचा चेहरा गंभीर आहे. कसली तरी पूर्ण तयारी करून तो आलेला आहे. तो अवघडून उभा राहतो. रामराव पाने टाकण्यात दंग आहेत. विनू उभा आहे, याची त्यांना जाणीव आहे. ते एकदा त्याच्याकडे वळून बघतात सुद्धा, पण बोलत नाहीत. पाने टाकत राहतात. त्यांनी विषय काढावा, असे विनूला वाटते.... तो क्षणभर वाट पाहतो....तेवढ्यात माडीवर खडखडाट होतो. ]

विनू : ( वैतागून वर बघत ) वर...माडीवर कोण ?
नाटेकर : ( माडीवरून ) मी आहे, सैब.
विनू : नाटेकर... ( गोठ्यात गाय हंबरल्याचा आवाज. )
नाटेकर : ( वरून ) आलो, सैब. ( नाटेकर खाली येतात. वर कामासाठी म्हणून खोचलेले धोतर सोडत ताठ उभे राहतात. )
विनू : ( वैतागून ) वर काय करताय् ?

नाटेकर : खुर्ची बघत होतो, सैब.

विनू : ती नंतर बघा...गोठ्यात वैरण टाकलीय् का, बघा...मैयाराम नाहीए....

नाटेकर : दारू पिऊन पडला असेल.

विनू : तो पडू दे...तुम्ही थोडा वेळ मागल्या बाजूलाच राहा...

नाटेकर : होय, सैब. ( बाहेर जातात. )

विनू : ( थोडा वेळ थांबून....अस्वस्थपणे. ) अण्णा, सगळी तयारी झालीय्... ( रामराव वळून वेगळ्याच भकास नजरेने त्याच्याकडे पाहतात. ) यातलं मी... तुम्ही...आणि विमलाबाई आणि नानासाहेब यांच्या व्यतिरिक्त कुणाला काही माहीत नाही.

रामराव : तिला सांगितलंस ?

विनू : कुणाला ?

रामराव : ( चिडून ) कुणाला काय ?...तुझ्या आईला...

विनू : ती कबूल होत नाही...होणारही नाही....( थांबून ) तिच्यावर थोडी जबरदस्तीच करावी लागणार आहे...( रामराव त्याच्याकडे रागाने बघत राहतात. ) म्हणून मी आजच मध्यरात्री निघतोय्...आईला घेऊन...

रामराव : ( चमकून ) आज ?...आत्ता ?

विनू : यात वेळ दवडला...तर फाटे फुटणार...आणि पुन्हा सर्वांच्याच मनांवरचा ताण वाढणार...एकदा फटक्यासरशी सगळं करून टाकलं, की.... पुढं सवयीनं सगळ्याच गोष्टी सगळ्यांच्या अंगवळणी पडतील.......आईला आश्रमाचा सराव होईल...आणि आम्हांलाही....

रामराव : आम्हांला काय ?

विनू : आई इथं नसेल, या गोष्टीचा आम्हांलाही सराव करून घ्यायला नको, अण्णा ?

रामराव : हे बघ...तू जरा धीरानं घे...ही तडकाफडकी करायची गोष्ट नव्हे. पुढल्या आठवड्यात नीताचा वाढदिवस आहे...वाढदिवस होऊ दे, म्हणतेय् ना ती ? ( गोठ्यात गाय हंबरते. )

विनू : पुढल्या आठवड्यात नीताचा वाढदिवस...मग पंधरवड्यानं वीणाचा वाढदिवस... मग श्रावण महिना . मग गणपती....एकेका प्रसंगासाठी आपण थांबलो, तर सगळं गावभर होणार...

रामराव : नाही गावभर होणार नाही. ती हल्ली जातेय् कुठं गावात ?....गेले काही महिने ती भगिनी मंडळात सुद्धा गेलेली नाही....काही कुणाला कळायचं नाही. तू... ते तुझे सासू-सासरे...विमलाबाई आणि नानासाहेब सल्ला देतात, म्हणून...अशी घिसाडघाई करू नकोस...

विनू : पण त्यांनी काही चुकीचा सल्ला दिलाय् का ?

रामराव : तुला राग येईल तुझ्या सासू-सासऱ्यांना मी काही बोललो, तर !.. ( बोलू, की नको, या विचारामुळे कचरतात....पण रागाने ) पण ती मूर्ख माणसं आहेत...तुझी सासू...ती विमलाबाई... हिला मुळीसुद्धा आवडत नाही... ( विनू बघत राहतो. ) आज संध्याकाळी ती दोघे भेटायला म्हणून आली... विमलाबाई आणि नानासाहेब...या विमलाबाईला कधी काय बोलावं, हे सुद्धा कळत नाही. हेडमास्तरीण आहे ना ती ? कळायला नको ? या रोगात बोटं झडतात....कान झडतात...नाक झडतं...हे सांगायची काय गरज होती ?

विनू : ( चमकून धक्का बसतो. ) हे तिनं आईला सांगितलं ?

रामराव : सुदैवानं ही झोपेचं सोंग घेऊन खोलीत पडली होती, म्हणून बरं. पण तिनं हे वीणाला तरी का सांगावं ?...वीणा आता तिच्या खोलीत रडरड रडते आहे....

विनू : असं विमलाबाईंनी बोलायला नको होतं.

रामराव : आणि, म्हणे, असल्या रोग्यांना साप सुद्धा चावत नाही....हे या हेडमास्तरणीचं जनरल नॉलेज....( थांबून ) हा रोग सांसर्गिक नाही, प्राथमिक आहे...बरा होणारा आहे, हे बापटांनी सांगितलंय्, हे त्यांना माहीत आहे... तरीही त्यांची ही अक्कल...कुठं काय बोलावं, एवढं तरी कळायला हवं...एखाद्या हेडमास्तरणीला...

विनू : मी सांगतो विमलाबाईंना...

रामराव : तू तिला काही सांगू नकोस. पुन्हा दिलगिरी वगैरे व्यक्त करण्याच्या फॉर-मॅलिटीज् नकोत. ( क्षणभर शांतता, मध्येच एक शिट्टी वाजते. ) एवढे भेटायला आले....म्हणून मी पारापर्यंत पोचवायला गेलो...ते जाताना... निरोप द्यायला, म्हणून...तर हे नानासाहेब पारावरच्या गणपतीकडे पाहत म्हणतात, यालाही तोच रोग झालेला दिसतो....यांचा देवधर्मावर नसेल विश्वास, म्हणून त्यांनी अशी थट्टा करावी आमची ?

विनू : तुम्ही, अण्णा, त्यांना बोलायला हवं होतं....अशा वेळी आपण स्पष्ट बोलावं. .

रामराव : बोलणार होतो...अगदी तोडून बोलणार होतो...पण त्यांच्या सुदैवानं.... रागाच्या भरात मला एकदम ठसका लागला....जोराचा ठसका लागला... आणि ‘ वर बघा....वर बघा... तुमची सासू कांदे खातेय् ’....असं हेड-मास्तरीण म्हणाली....आणि सगळं हसण्यावारी गेलं...तेही बरं झालं... उगाच वाकडेपणा मागे राहिला असता...( थांबून )......अशा माणसांचा सल्ला... तू घे...पण त्या सल्ल्यानंच वागायला पाहिजे, असं नाही.

[ ते एकदम सगळे काही विसरल्यासारखे करतात. आणि उशी मांडीवर घेऊन पुन्हा पत्त्यांची पाने मांडू लागतात, विनू अस्वस्थ होतो. जरा इकडून

तिकडे फिरतो...आणि ]

विनू : त्यांचा सल्ला सोडा....पण, अण्णा, आपणही एकूण सारासार विचार केला पाहिजे. ( रामराव पत्यांतच मग्न ) आई इथं राहिली, तर त्याचा आईला काहीच फायदा नाही....आपल्या सर्वांना मात्र त्याचा त्रास होणार आहे....

रामराव : ( चमकून ) कसला त्रास ?

विनू : हा एकच रोग, अण्णा, असा आहे, की या रोग्याकडे सगळेच लोक... सगळे म्हंजे आपण सगळे लोक...एका वेगळ्या नजरेनं पाहतो...( रामराव त्याच्याकडे बघत राहतात. ) इतकी वर्षं नेमानं येणारी साळूबाई का यायची बंद झाली ?

रामराव : ती आजारी आहे ना ?

विनू : ती निमित्त काहीतरी सांगणारच...भैयाराम का येत नाहीये ?

[ रामराव एकदम आत प्रकाश पडल्यासारखे अवाक् होतात. ]

रामराव : पण ती पालीला...पालीच्या शेतावर जाऊन राहायला तयार आहे ना ?

विनू : नुसतं पालीला जाऊन भागणार नाही......( ते बघत राहतात. ) मी माझ्या मनात एक गोष्ट दडपून दडपून कष्टी होतोय्...तुम्हांला सांगू, की नको... सांगू, की नको...असा विचार करतोय्...वाटतं, तुमच्या मनाला आणखी त्रास होणार...

रामराव : काय ? ( काळजीच्या सुरात ) वीणाचं ?

विनू : ( दचकून ) हो. तुम्हांला कसं कळलं ?

रामराव : काल आणि आज...दोनदा देशपांडे मला भेटले....पण पाहून, न पाहिल्यासारखं करीत निसटले...काय झालं ?

विनू : आई सारखी सारखी मागे लागली, म्हणून मी आज देशपांड्यांच्या घरी जाऊन आलो. त्यांनी नकार दिलाय्.

रामराव : ( तोंड एकदम उघडे पडते ) का ?

विनू : देवीचा कौल झाला नाही, म्हणाले. पण ते आईमुळंच....कारण नंतर ते एकसारखे आईला काय झालंय्, ते विचारीत होते......मी म्हटलं, तिला पित्तामुळं अंगावर दादडं उठतात... हृषीकेशला औषधी पाण्याची कुंडं आहेत...तिथं आंघोळ करण्यासाठी मी आज तिला नेणार आहे, एवढं सुद्धा मी त्यांना सांगितलं...पण ते विश्वासच ठेवायला तयार नाहीत...

रामराव : हे तू हिला सांगितलंस ?

विनू : नाही...तू बरी होऊन आल्यावर लग्न करू म्हणाले, असं मी तिला सांगितलंय्. म्हणून ती खूश झालीय्....

रामराव : सुधीर कशाला आला होता ?

विनू : तेवढ्यासाठीच.

रामराव : वीणाला कळलं ?

विनू : हो. तिला सुधीरनंच सांगितलं...पण तिनं ते सुदैवानं धीरानं घेतलंय्... ( थांबून ) आता नुसत्या संशयानं एवढं....उद्या तिच्या रोगाचं गावभर झालं, म्हणजे.... ?

[ तेवढ्यात सीताबाई शांतपणे आपल्या खोलीतून बाहेर येते. तिची चाहूल लागताच विनू एकदम आपला विषय बदलतो. रामराव पटकन पत्ते टाकू लागतात. ]

विनू : प्रतापसिंग म्हणालाय्, अण्णा, ही मोटर विकून देतो....नागपूरला गिऱ्हाईक आहे...विकायची ना ?

[ रामराव उत्तर देत नाहीत. विनू अस्वस्थपणे...ती जवळ येईल...स्पर्श करील, या भीतीनं तिच्याकडे पाहतो...ती संथ चालीनं रामरावांच्या जवळ येते....पण खूप जवळ येत नाही. रामराव खाली मान घालून पानं उलटी सुलटी करतात. ]

सीता : खेळू या का पत्ते ?...शेवटचे म्हणून... ? ( रामराव गप्प राहतात. ) पण नको...( ' का ' ? या अर्थी रामराव वर बघतात. ) काल आपण खेळायला बसलो....आणि लगेच उठलो.......कारण मी टाकलेलं पान तुम्ही उचललं नाही.... ( रामराव पत्ते जमवून बाजूला ठेवतात आणि आसनमांडी घालून बसतात. तीही बाजूला, पण दिवाणाला टेकून खाली बसते. क्षणभर आपलेच पाय चोळते....आणि किंचित हसत विचारते. ) मी सवयीनं पाय दाबीन, असं वाटलं, म्हणून आसनमांडी घालून बसलात ?....... लक्षात आहे माझ्या. ( काळजीने ) पाय दुखताहेत का ? मी नाही आवळणार...वीणाला सांगा... मेला तो भैयाराम आजारी झालाय् याच वेळेला...मी पालीला गेले, म्हणजे तुमचं कसं होणार ?

विनू : (पटकन) आई, ते पालीचं जमायचं नाही हं !

सीता : का ? नाटेकर म्हणालेत....दोन दिवसांत छप्पर होईल. एकेका खोलीचं

करायचं...दोन तर खोल्या आहेत...

विनू : नाटेकर मूर्ख आहेत. प्रश्न छप्पर दुरुस्त करण्याचा नाही... ('मग' या अर्थी ती बघते.) तुला कुणी ओळखत नाही, अशा ठिकाणी तुला जायला हवं. तू अमरावतीच्या आश्रमात जा.

सीता : अरे, पालीला मी आणि वनी राहू. तिथं आम्हांला ओळखायला आहे कोण ? साळूबाई कामाला येईल.

विनू : साळूबाई यायची बंद झालीय्...भैयारामही येत नाहीए...

सीता : का ? (विनू बघत राहतो.) आलं लक्षात ! (जमिनीकडे बघत राहते. ढोपरावर कोपर टेकवून दोन्ही हातांची बोटे केसांवर फिरवीत गप्प राहते.)

विनू : या रोगाचं या गावात, कुठंही कळता कामा नये... कळलं, तर उद्या वीणाचं लग्न जमणार नाही....

सीता : (पटकन) तिचं जमलंय् ना ?

विनू : जमलंय्...पण त्यांना हे कळलं, तर ते लग्न मोडतील. उद्या माझ्या नीताचं लग्न होणार नाही....(थांबून) म्हणून हे बाहेर पसरण्याआधी आपण इथनं दूर कुठंतरी गेलं पाहिजे...अमरावतीला जाऊ....

सीता : तिथं तरी कळेलच ना ?

विनू : तिथं नाव बदलून राहायचं. सीताबाई रामराव करंदीकर या नावानं जायचंच नाही...खोटं नाव घ्यायचं...

सीता : खोटं ? कुठलं ?

विनू : कुठलंही...रमाबाई आपटे किंवा रुक्मिणीबाई जोशी....

सीता : (भकास नजरेनं) आणि मधलं नाव ? नवऱ्याचं ? (तो थोडा वेळ गप्प राहतो. तिच्या डोळ्यांत टचकन पाणी येतं. उसासे टाकत ती पदराने डोळे, नाक पुसते... आणि खरखरीत आवाजात म्हणते) माझं लग्नाआधीचं घे.... आशालता साठे... (उठत) पत्ता मात्र मला विचारू नकोस. (जायला वळता वळता) आणि सौभाग्यवती सीताबाई रामराम करंदीकरांचं काय ?....ती कुठं असणार ? (ती विनूकडे बघत राहते...बघत राहते...विनू बोलत नाही... ती वळून रामरावांकडे पाहते...रामराव डोळे मिटून मान मागे टेकतात आणि दोन्ही डोळ्यांवर शर्टाच्या बाह्या ओढतात.) त्या सीताबाईचं काय ?

विनू : ती हयात नाही, अशी बतावणी करायला हवी .. हे कितीही क्लेशकारक असलं, तरी ..

सीता : चालेल. बतावणी...करा....(बाहेर जाऊ लागते.)

विनू : कुठं चाललीस ?

सीता : बाहेर गणपतीचं ध्यान बघत पारावर बसते थोडा वेळ... वरनं बकुळीची फुलं

पडतील, ती घेते अंगावर...ते सुख यापुढं मिळणार नाही...(वळून) निघायची वेळ झाली, म्हणजे सांग...( ती शांत, संथ चालीनं बाहेर जाते.)

[थोडा वेळ शांतता....करुण संगीत....गाडीच्या कर्कश शिट्या...]

रामराव : (थोड्या वेळाने गहिवरल्या आवाजात) विनू, तू हे तिला आत्ताच सांगायला नको होतंस....गेल्या चार दिवसांत ती किती... एकदम म्हातारी, थकलेली, दिसायला लागलीय्...पाहिलं आहेस ? (आवाज कातर होतो.)

विनू : पण हे तिला कधी ना कधी कळायलाच हवं ना ?... अमरावतीला नाव नोंदवताना याची चर्चा करणार का ? तिथं जायच्या आधी सगळं ठरायला नको ?

रामराव : तिचा पत्ता कुठला देणार ?

विनू : बनीचा पत्ता देणार.

[रामराव थोडा वेळ भुवया चोळत गप्प राहतात.
करुण संगीत सुरू होते. मध्येच एक-दोनदा गाय हंबरते.]

रामराव : तिच्या मनाचं काय होत असेल, याची मला कल्पनासुद्धा करवत नाही.

विनू : तरी मी तिला आणखी एक गोष्ट सांगितली नाही.

रामराव : कोणती ?

विनू : मी आईला घेऊन हृषीकेशला जाताना वाटेत अलाहाबादेस माझ्या मोटारीला अपघात झाला...त्यात आई जागच्या जागी ठार झाली...मी जखमी झालो... मोटर भंगार म्हणून मोडीत विकावी लागली, असं उठवावं लागेल...ते नानासाहेब आणि विमलाबाई करतील... आठ दिवसांनी मी येईन... बँडेज बांधून.... पट्ट्या लावून...लोक भेटायला येतील, तेव्हा तुम्ही तसं दाखवायला हवं....

रामराव : (एकदम हताश होतात....उठून आरामखुर्चीत बसून व्याकूळ होतात.) अरे विनू, काय परिस्थिती ओढवलीय् आपल्यावर....!

[ते दाबतात...तरीही एक-दोन हुंदके निसटतातच. विनूही हताश, विषण्ण होऊन बसून राहतो. आपल्या डोळ्यांवर बोटे ओढतो....
मन व्याकूळ करणारे संगीत सुरू होते... तेवढ्यात रेखा कॉफीचा कप घेऊन येते.]

रेखा : अण्णा, तुमचं दूध आत्ताच आणू का ?

रामराव : मला दूध नको आहे...

रेखा : अण्णा, जेवला नाहीत तुम्ही...दूध नको कसं ?

रामराव : (मान हलवीत) नको...नको.

रेखा : आईंना कॉफी देते....(कॉफीचा कप घेऊन सीताबाईच्या खोलीत जाते...तेथून परत येते) आई वीणाच्या खोलीत आहेत ?

विनू : ती बाहेर पारावर बसलीय् काळोखात...

[ तेवढ्यात वीणा खोलीतून बाहेर येते. ]

रेखा : वीणा, आईला हाक मार...कॉफी घ्या, म्हणावं....

[ वीणा ' आई....आई ' अशा हाका मारीत बाहेर जाते आणि धावरून आत येते. ]

वीणा : आई कुठं आहे पारावर ?

रेखा : नाटेकर....अहो नाटेकर...

[ सर्वजण गडबड करीत दरवाज्याकडे धावत असताना काळोख होतो. ]

का ळो ख

प्र का श

[ स्थळ तेच. रामरावांचा दिवाणखाना. वेळ साधारण दोन तासांनंतर. तीच रात्र. प्रकाश येता येता रेल्वेच्या दोन शिट्ट्या ऐकू येतात. त्यामागोमाग अंधारातच कसली तरी गडबड अंगणाच्या बाजूला ऐकू येते... आणि अंगणातून रेखा, वीणा येतात... मागोमाग सीताबाई येते, तिला नाटेकर धरून आत आणत आहेत. पाठीमागून रामराव आणि विनू. नाटेकर सोडून सर्वांनी तिचा स्पर्श टाळला आहे. सर्वजण आत येतात. सीताबाई दिवाणाला टेकून खाली बसते. रामराव, विनू, रेखा, वीणा उभी आहेत. ते सर्वजण विचित्र नजरेने रोखून तिला पाहतात. ती खूप थकलेली आणि थोडीशी भ्रमिष्टासारखी दिसते आहे. भ्रमिष्ट नजरेनेच ती क्रमाक्रमाने सर्वांची तोंडे न्याहाळते आणि एकेका-

कडे बोट दाखवून ओळख पटवावी, तसे करते...नावे घेते.]

सीता : हे कोण ? हे रामराव सदाशिव....हे विनायक रामराव...ही रेखा विनायक.... ही वीणा सुधीर देशपांडे...( नाटेकर आशेने बघतात. ) हे...हे कोण ?

नाटेकर : मी नाटेकर, आईसैब !

सीता : ( एकदम हसते. ) मी तुम्हांला विसरणार नाही, नाटेकर, कधीही विसरणार नाही. मी स्टेशनवरून आत्ता रिक्षानं आले.... माझी सगळी माणसं समोर उभी होती...पण रिक्षातून उतरताना पटकन पुढं होऊन हात तुम्ही दिला... हाताला धरून तुम्ही आत आणलं मला ... मी तुमचं नाव कशी विसरेन ?

[ नाटेकर तृप्त होऊन तसेच उभे राहतात....सीताबाई मंद हसत त्यांच्याकडे पाहते. ]

सीता : नाटेकर...तुम्ही असे उभे का ?

नाटेकर : जातो, आईसैब...

सीता : जाऊ नका. मला ती खुर्ची अमरावतीला न्यायचीय्.... (नाटेकर झटकन वळतात आणि माडीवर जातात. सीताबाई सर्वांकडे बघते.) तुम्ही उभे का ?... बसा...बसा....

[ सर्वजण वेगवेगळ्या जागी असतात. तिला एकटक बघत राहतात. ]

विनू : (किंचित चिडून) आई, ( ती वळून त्याच्याकडे बघते ) तू हे बरं केलं नाहीस.

सीता : काय ?

विनू : स्टेशनकडे जाऊन काळोखात रुळावर झोपलीस, हे !... तू आत्महत्येचा प्रयत्न केलास.

सीता : (किंचित विकट हसत) अरे, पण सीताबाई हयात नाही, म्हणतोस ना ?

विनू : गाडी अंगावरून गेली असती, म्हणजे...

सीता : सीताबाई सुटली असती ! जिवंत राहून मरण्यापेक्षा असं मरणं बरं नाही का ?

विनू : आणि आपल्या घराण्याची अब्रू गेली असती, म्हणजे ?

सीता : ( विषण्ण आवाजात ) चुकलं माझं....मला क्षमा करा....नुसती सुटायलाच नव्हे, तर तुम्हांलाही सोडवायला गेले...पण फसले...रुळांवर झोपले...पण जमलं नाही...रेल्वेचे लोक ओळखणारे....त्यांनी उचलली आणि रिक्षातनं इथं आणून सोडली....अप्पा शहाणे. ते शहाणपण मला जमलं नाही.

रामराव : ( खिन्न आवाजात ) ते पुरे आता, सीता...

सीता : ( डोळे विस्फारून आश्चर्य करीत ) सीता ? कोण सीता ? ती आता ह्यात कुठं आहे ?...मी आशालता साठे ! आशालता साठे...( एकदम थोडेसे हसते... आणि रेखा व वीणा यांना एखादी गोष्ट सांगितल्याप्रमाणे ) माझं लग्न झालं, तेव्हा मला सारखं वाटायचं. यांनी माझं आशालता हे नाव बदलू नये. माझ्या बाबांचं ते आवडीचं नाव...कध्धीसुद्धा ते मला आशा म्हणत नसत...नेहमी आशालता म्हणायचे....हे नाव करंदीकरांनी बदलू नये, म्हणून मी प्रार्थना करात होते देवाला...पण त्या वेळी देवानं ऐकलं नाही. अप्पांनी आपल्या आईचं नाव ठेवलं मला...सीता. जुनाट नाव...नको असलेलं...नाव–सीता. वनवासाला जाणारी. ( स्वतःशीच हसते. )

[ तेवढ्यात वरून नाटेकर वेताची आरामखुर्ची घेऊन येतात आणि त्यावर फडका मारून ती साफ करतात.

सीताबाई वळून खुर्चीकडे एक–दोन क्षण बघत राहते. तिचे डोळे स्वप्नमय होतात. ती जुन्या काळात जाते. किंचित डुलत ती खुर्चीकडे बघते, डाव्या गुडघ्यावर डावा हात ठेवून आणि दोन्ही हातांची बोटे एकमेकांत गुंतवून ती खुर्चीकडे बघत डुलत राहते...स्वतःशीच गोड हसते

रामराव सोडून सर्वजण तिच्याकडे बघत राहतात रामराव त्या खुर्चीकडेच पाहत आहेत...नाटेकर दक्षतेने खुर्चीकडे उभे आहेत. ]

सीता : ( रामरावांना सोडून सर्वांकडे बघत ) तुम्ही सर्वजण थोडा वेळ आत जाता का ? नाटेकर, तुम्ही सुद्धा. थोडा वेळ. मी बोलावने मग. ( ते सर्वजण आत जाता जाता ) विनायक, मी फार वेळ घेणार नाही. निघू आपण पाच मिनिटांत...( सर्वजण जातात. सीताबाई उठते. खुर्चीवर प्रकाशाचा झोत पडतो. इतरत्र क्षीण प्रकाश. रामराव आणि सीता क्षीण प्रकाशातच आहेत.... सीता काही तरी जुने आटवून सांगते आहे...) लग्न होऊन इथं आले, त्याला आता तीस वर्षं झाली...लग्नासाठी किती माणसं या घरात जमली होती केवढी गर्दी झाली होती. त्या गर्दीतून तुम्ही मला पालीच्या शेतावर घेऊन गेलात...आणि या वेताच्या आरामखुर्चीत बसून तुम्ही मला पहिला–वहिला स्पर्श केलात...तुम्ही असे बसला होता...( रामरावांना ) बसा ना.... ( रामराव आरामखुर्चीत बसतात. ) आणि मी इथं पायांशी बसले होते तुम्हांला चिकटून. ( खाली पायाशी....पण थोडी दूर बसत ) आता तेवढी चिकटून नाही बसणार ..तेव्हा तुम्ही माझे हात हातात घेतले आणि बोटांवर तुमची

बोटं फिरवीत म्हणालात...

रामराव : किती सुंदर बोटं आहेत तुझी! कलावंताची बोटं....लांब...नितळ... निमुळती...(ती सुखात बुडते...डोळे मिटून दोन्ही हात आपल्या गालांवर घेते....) सीता, तुझे हात हातांत दे माझ्या...असू दे...तुझ्या बोटांवरून, मला हात फिरवू दे...त्या स्पर्शानं...तो स्पर्श–तीस वर्षांपूर्वीचा. (गदगदतात.)

सीता : (उठत) नको. एवढं म्हटलंत, मी तृप्त झाले...तुम्ही आता स्पर्श केलात... आणि नकोशी झालेल्या बायकोला स्पर्श केल्यासारखा मला तो वाटला...बबन-रावानं बनीला स्पर्श केल्यासारखा...तर मला खूप दुःख होईल....तीस वर्षांपूर्वीच्या त्या स्पर्शाला डाग लागेल. (त्यांच्याकडे थोडा वेळ बघत राहते.... प्रकाश पूर्ववत.) तुम्ही उठा...आणि आत जाऊन पडा...(ती रडवेली होते.)

रामराव : (उठत) नको....थांबतो मी...

सीता : (दटावून) माझं ऐका...तुम्ही आत जाऊन पडा. प्रकृतीला जपा. मी नाही इथं...आणि रोज कोर्टात जा...नाहीतर बसून राहाल विचार करीत....जा... आत जाऊन पडा...(ते जाताना त्यांना बघत राहते.) आणि माझ्या बनीला विसरू नका...दरमहा दोनशे पाठवा...(ते आत जातात.) विन्या...रेखा... वीणा...नाटेकर...या...(सर्वजण येतात...नाटेकर कामाला लागतात. तिच्या खोलीतून होल्डॉल–बॅग बाहेर नेतात...मग वेताची आरामखुर्चीही बाहेर नेतात.) विन्या, निघू या आपण....(सर्वांची तोंडे न्याहाळते.) विन्या, एक गोष्ट मी यांना सांगायला विसरले...

विनू : कुठं गेले अण्णा ?

सीता : ते आत झोपलेत...पडलेत जरा....

विनू : बोलवू का ?

सीता : नको. मीच त्यांना आत पडून राहायला सांगितलंयू...ते खूप थकलेत... त्यांच्या मनावर भार आहे. ते मनातलं बाहेर दाखवणार नाहीत...म्हणून त्यांना जास्त त्रास होतो...त्यांना कधी उलट उत्तर देऊ नकोस....

विनू : अण्णांना सांगायला काय विसरलीस ?

सीता : हिच्या वीणाच्या लग्नाचं, रे. मी बरी होईपर्यंत थांबू नका....देशपांड्यांना भेटा आणि सुधीरशी लग्न करून टाका. नाही तरी मी आता हयात कुठं आहे ? (वीणा–रेखा रडत आहेत. रेल्वेच्या शिट्ट्या वाजतात.) विन्या, तू शहापूरला जाशील, तेव्हा थोडं पुढं जाऊन बनीला भेटत जा. आणि पत्र पाठवून तुमची, तिची खुशाली कळवीत जा...(वळून वीणाला) वीणा, प्रत्येक वेळेला विन्याबरोबर माझी दोन–दोन लुगडी दे पाठवून बनीला. (रेखाकडे

वळते.) गणपतीसमोर रोज निरांजन लावीत जा...आणि तुझ्या सासऱ्याल सांभाळ....काळजी घे त्यांची! गेली तीस वर्षे पणतीवर पदर धरावा, तसं जपलंय् मी त्यांना...झोपताना दूध दे...आणि संपायच्या आधी केशर मागवून घे....आपल्याकडे कालची वस्तू आज मिळत नाही...आणि जेवताना त्यांच्या मागं उभी राहा...त्यांना ठसका लागतो....(जराशी रेंगाळते) आणि अधनं–मधनं त्यांना चांगलं भरीत करून वाढ वांग्याचं. चांगलं मुरडून एकजीव कर ते. नाहीतर धुसफुसणार. जाताना दोन मिनिटं पारावर बसते.... आणि पसाभर फुलं नेते बकुळीची...बॅगेत ठेवायला... (इकडे तिकडे बघते) रेल्वेचा संप आहे का, रे, आज?

विनू : रेल्वेचा संप? छे. का?

सीता : संबंध दिवसात त्या कर्कश शिट्ट्या नाहीत ऐकल्या. (सगळे हसण्याचा प्रयत्न करतात. तेवढ्यात आतून नीता झोपेत ओरडल्याचा आवाज ऐकू येतो. सीताबाई स्वतःशीच हसते.) ही नीता...एक राक्षस मारला असणार तिनं. तिची पापी घ्यावी, अशी अनावर इच्छा होतेय्....स्पर्श करायचा नाही म्हटलं, की स्पर्शाची हाव सुटते. (एकदम विनूकडे तिचे लक्ष जाते. ती विनूकडे बघत राहते.)

विनू : (गोंधळून) काय?

सीता : रोज आंघोळ कर. (सर्वजण रडता रडता हसतात. तेवढ्यात गोठ्यातली गाय हंबरते.) तिला कळलंय्, मी जातेय्, ते....चला...तिच्या पाठीवरून हात फिरवते...तेवढाच मायेचा स्पर्श. (जाता जाता तिचे हार्मोनियमकडे लक्ष जाते. ती हार्मोनियमवर मायेने हात फिरवते.) नुसत्या पेटीवर नाही माझ्या बाबांच्या स्पर्शाला मी स्पर्श करतेय्...

विनू : वाजव ना दोन मिनिटं.

सीता : (विकटपणे हसत) नको. त्या दिवशी सहज जमलं, ते शेवटचं....(एकदम प्रकाशात बदल होतो. तिच्यावर आणि पेटीवर प्रकाश, ती आपल्या दोन्ही हातांची वाकडी बोटे पाहते ...पेटीवर फिरवल्यासारखी बोटे हालवते...आणि तिला पेटीतले सूर ऐकू येतात...क्षणभर...प्रकाश पूर्ववत होतो...ती मग एकदम भानावर येते जागी होते...वेगळ्या आवाजात) चल, रे, विनू...निघू...

[जाता जाता दरवाज्यात येते आणि मागे वळून सर्व दिवाणखान्यावर नजर फिरवते.]

विनू : काय बघते आहेस, आई ?

सीता : ( विषण्णपणे हसते. ) तीस वर्षांतली सुखदुःखं मागं ठेवून जातेय्...सोडलेलं घर सोडल्यानंतर कसं दिसतं, ते पाहतेय्....( पाहून झाल्यावर ) चल.

[ सर्वजण बाहेर पडणार, तोच बाहेरून गडबडीने नाटेकर आत येतात. ]

नाटेकर : आईसैब...( डोळे पुसतात. गहिवरल्या आवाजात ) पायांवर डोकं ठेवतो... ( खाली गुडघे टेकून पायांवर डोके ठेवतात. )

सीता : ( त्यांच्या डोक्यावरून, खांद्यावरून स्पर्श करीत ) नाटेकर...( बघत राहते. गहिवरामुळे तिला नीट बोलता येत नाही. ) नाटेकर, 'आई, तुम्ही माझ्या घरी राहा...मी तुमची सेवा करतो...' असं तुम्ही म्हणालात...मी ते विसरणार नाही. तुमचे ते शब्द बकुळीच्या फुलांसारखे मला सदैव सुवास देतील.

[ डोक्यावरून हात फिरवते...नाटेकर तिचा हात धरतात...सर्वजण वळून जाऊ लागतात... गाय हंबरते. पेटीचे विषण्ण सूर सुरू होतात आणि काळोख होतो. ]

**प ड दा**

# अंक दुसरा

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
प्र. क्र. 22292 नों. दि. 90.7.64.66
वि. ........ क्र. ..................

[ स्थळ : पहिल्या अंकाप्रमाणेच, रामराव करंदीकरांच्या घरातला दिवाणखाना. मध्यंतरी चार वर्षांचा काळ उलटला आहे. वेळ दुपारची आहे. चार, साडेचार वाजले असावेत. पडदा वर जातो. अनुरूप संगीत चालू आहे. रेल्वेच्या एक-दोन शिट्ट्या होतात. शंटिंगचा आवाज होतो. रामराव आपल्या आरामखुर्चीत बसले आहेत. त्यांच्या मांडीवर उशी आहे आणि उशीवर ते पत्ते टाकत शांतपणे बसले आहेत. गेल्या चार वर्षांत त्यांच्या चेहऱ्यावर आणि विशेषतः केसांवर उतार वयाच्या ठळक छटा दिसू लागल्या आहेत.

काही क्षण तसेच जातात. आणि अंगणातून 'भैयाराम...भैयाराम' अशा हाका ऐकू येतात. पाठोपाठ नाटेकर दरवाज्यातून आत येतात. त्यांचेही केस आता बरेचसे पांढुरके दिसू लागले आहेत. ते येतात आणि रामरावांच्या समोर उभे राहतात. ताठ, दोन्ही मांड्यांना हातांच्या मुठी चिकटवून. रामराव पत्त्यांत दंग असल्यामुळे त्यांचे लक्ष जात नाही. नाटेकर तसेच उभे राहतात, पण रामरावांचे लक्ष वेधण्यासाठी खोकतात. ]

रामराव : ( पत्ते....टाकत खालमानेनेच ) नाटेकर....

नाटेकर : होय, सैब ( रामराव गंभीरपणे मान वर करून नाटेकरांच्या तोंडाकडे बघतात. जरा बाहेर जाऊन येतोय्, सैब... घरात कोणी नाही आहेत. )

रामराव : भैयाराम कुठं गेलाय् ?

नाटेकर : त्याला फुगे आणायला पाठवलंय्...

रामराव : फुगे ? ( रेल्वेची एखादी दुसरी शिट्टी वाजते. )

नाटेकर : नीताबेबीचा वाढदिवस आज.

रामराव : ( एकदम लक्षात येऊन ) हो....हो...( थांबून ) रेखा कुठं गेलीय् ?

नाटेकर : आपल्या आईकडे....नीता वेन्नीला घेऊन गेल्यात...

रामराव : तुम्ही कुठं जाताय् ?

नाटेकर : जरा बाजारात जाऊन येतो...थोडी रताळी, साबुदाणा आणि शेंगदाणा हवाय् घरात. ( रामराव बघत राहतात. ) उद्यां उपासाला....

रामराव : ( एकदम लक्षात येऊन ) उद्या ?...हां...हां ...उद्या आषाढी एकादशी....

नाटेकर : होय, सैब. ( रेंगाळून ) आषाढी एकादशी म्हटली, की आईसैबांची आठवण येते...त्यांना पंढरपूरची वारी करायची होती... करतील, येतील...तेन्हा... म्हणता म्हणता चार वर्षे गेली. ( थोडे क्षण शांतता, ती शांतता जाणवताच–) जातो, सैब. ( वळून बाहेर जातात. )

[ नाटेकर बाहेर जाता जाता विनू बाहेरून येतो. त्याच्या हातात दैनिकाचा एक अंक आहे आणि फुगवलेल्या फुग्यांचे दोन मोठे झुबके. ]

विनू : ( आत येता येता ) नाटेकर, आटपा लवकर...आत्ता हळू हळू माणसं जमायला लागतील...

नाटेकर : होय, सैब. ( बाहेर जातात. )

[ विनू वर्तमानपत्राचा अंक रामरावांच्या हाती देतो आणि एक स्टूल घेऊन फुग्यांचा झुबका बांधण्यासाठी स्टुलावर चढतो. रामराव पेपराचे नाव बघत राहतात. ]

रामराव : कुठला पेपर हा ?

विनू : अकोल्याचा पेपर आहे तो...

रामराव : काय आलय् याच्यात ?

विनू : ती खाली उजवीकडे जाहिरात पाहा...पहिल्याच पानावर...

रामराव : ( चश्मा लावीत...जाहिरात पाहतात आणि दचकतात. ऐकू यईल, एवढ्या मोठ्याने वाचतात. ) ' कै. सौ. सीताबाई रामराव करंदीकर...मोटारीने हृषीकेशला जाताना तुझे अपघाती निधन झाले. त्याला आता चार वर्षे लोटली... आम्हांला सोडून तू भरल्या संसारातून उठून गेलीस... तरी आमच्या हृदयात तू अढळ आहेस ...रामराव, विनायक, रेखा आणि वीणा. ( ते हे वाचतात आणि दैनिकाची घडी करून ती संतापाने टेबलावर आपटतात. उठून हातवारे करीत ) विन्या, मला न विचारता हा शहाणपणा तुला कोणी करायला सांगि-

तला होता ?

विनू : ( समर्थन करीत ) अण्णा, यात शहाणपणा...

रामराव : ( त्याला बोलू न देता ) ही सुद्धा त्या नानासाहेबांची आणि विमलाबाईचीच अक्कल असली पाहिजे...!

विनू : अण्णा, त्यांचं नाव तुम्ही...( खाली उतरतो. )

रामराव : तुला ते सासू–सासरेही बरे मिळालेत. वकिली सोडून फॅक्टरी काढायला लावली...ती धड चालत नाही...माझी वकिली तुला मिळाली असती.... माझाही भार थोडा कमी झाला असता...तर फॅक्टरी काढून बसलास....

विनू : (जरा चिडून) त्यात काय मोटं चुकलं, अण्णा ?

रामराव : काहीही चुकलं नाही. ती फॅक्टरी चालवून दाखवा.

विनू : निश्चित चालेल. तुम्हांला त्याची काळजी नको.

रामराव : काळजी नको कशी ? बँकेच्या कर्जाला मुख्य जामीन मीच आहे. तुझा सासरा नाही...कर्जाचे हप्ते नीट भर. पाळीच्या शेतावर बोजा झालाय् तो.

विनू : ( समजुतीने घेत ) अण्णा, तुम्ही हल्ली हल्ली फार चिडता. चिडता आणि मग वडाची साल पिंपळाला लावता. ( ' कशी ? ' या अर्थी अण्णा बघत राहतात. ) त्या जाहिरातीचा आणि नानासाहेब किंवा विमलाबाई यांचा काही संबंध आहे का ?

रामराव : ( परत चिडून ) निश्चित. निश्चित ही कल्पना त्या विमलाबाईची असणार... आधीच कुठलीही सासू म्हटली, की ती शहाणीच...आणि तुझी सासू तर काय बघायलाच नको.

विनू : अण्णा, यात माझं काही चुकलं का ?

रामराव : निश्चित ! निश्चित चुकलं. चार वर्षांपूर्वी ती अमरावतीच्या आश्रमात गेल्या-नंतर तू इथल्या आसपासच्या पेपरांत ती बातमी छापलीस....हृषीकेशला जाताना वाटेत तिचं दुःखद निधन झालं वगैरे. तेव्हा मी गप्प बसलो. सुदैवानं ते पेपर अमरावतीला पोचले नाहीत. आणि तिनं ती बातमी वाचली नाही. आता परत ही जाहिरात छापायची काय गरज होती ?

विनू : ती फक्त अकोल्याच्या या एकाच पेपरात छापलीय्...

रामराव : अरे, पण अकोल्याचा पेपर अमरावतीला जाणार नाही ?...तिनं ही जाहिरात वाचली, म्हणजे ?

[ ओरडून, संतापून ते थकतात. पुन्हा खुर्चीवर बसतात. कपाळावर हात घेऊन विचारात बुडून जातात. मध्येच त्यांच्या डोक्यात कचकचल्यासारखे होते. म्हणून ते कराकरा केस खाजवतात...आणि कुठंतरी अधांतरी बघत...अस्वस्थ-

पणे बसून राहतात. विनूही काही बोलत नाही. गप्प राहून परत स्टुलावर चढतो आणि फुग्यांचा पहिलाच न लावलेला झुबका छपराला बांधतो. दुसरा झुबका–पंधरा-वीस लहान लहान फुग्यांचा त्याच्या हातात तसाच आहे. तो स्टुलावरून खाली उतरतो...आणि दुसरा झुबका आणखी कुठे लावावा, हे पाहण्यासाठी वर बघतो...तेवढ्यात रामरावांकडे वळून बघतो...रामराव आपल्या मिटलेल्या डोळ्यांवरून बोटे ओढत आहेत, हे त्याच्या लक्षात येते...मग तो थोडा पुढे जातो आणि रामरावांना सगळे समजावून सांगू लागतो. एखादी दुसरी शिट्टी किंवा शंटिंगचा आवाज येतो...]

विनू : अण्णा, ही जाहिरात मी फक्त अकोल्याच्याच एका...आणि तीही याच एका दैनिकात का छापून आणली असेन ? ( रामराव 'का ?' या अर्थी वळून बघतात ) हे दैनिक अकोल्याचे तात्यासाहेब जोग वाचतात....त्यांनी वीणाला पसंत केलीय्, हे तुम्हांला माहीत आहे...त्यांच्या मुलाला वीणा फार आवडलीय्.... देण्याघेण्यावरून आपण अडवणार नाही, असं सुद्धा त्या मुलानं मला सांगितलंय्...तरीसुद्धा तात्यासाहेब म्हणाले, अजून हे पक्कं समजू नका. दोन आठवड्यांत पक्कं करू...( थांबून ) म्हणजे ते चौकशी करीत असणार....त्यांना कुठं कुणकुण लागलीच, तर...संशय यायला नको. ही जाहिरात त्यांनी वाचली... ते वाचणारच....की त्यांना संशय येणार नाही.

रामराव : असल्या जाहिरातीवर आणि बातम्यांवर कोणी विश्वास ठेवीत नाहीत.

विनू : नाही कसं ? चार वर्षांपूर्वी ती बातमी छापली, तेव्हा....

रामराव : मला नाही वाटत सर्वांनी विश्वास ठेवला असेल, म्हणून...

विनू : का ? किती माणसं भेटून गेली...( गोठ्यातली गाय हंबरते. )

रामराव : आपण जेवढा खोटेपणा केला...तेवढाच त्यांनी केला, एवढंच.

[ विनू क्षणभर निरुत्तर होतो...आणि स्टूल ओढण्यासाठी वळतो, आणि एकदम अवाक् होतो. त्याचा क्षणभर त्याच्याच डोळ्यांवर विश्वास बसत नाही.... आपण स्वप्नात तर नाही ना, असे त्याला वाटू लागते....
कारण त्याला सीताबाई अंगणातून येताना दिसतं... ती तरतर चालीने एकदम मुख्य दरवाज्यात येते. तिच्या हातांत फक्त दोन पिशव्या आहेत...ती थोडी अधिक थकलेली आहे. तिच्या केसांचा पांढुरकेपणा थोडा अधिक वाढला आहे. विनू तिला बघता बघता थिजल्यासारखा होतो.]

विनू : ( आश्चर्याने ) आई !

सीता : विन्या...(रामराव एकदम दचकून उभे राहतात.) आंघोळ करतोस, की नाही, रोज ? (आपणच हसते.)

रामराव : सीता, तू आलीस ? (त्यांच्या चेहऱ्यावर आनंद, चिंता, अवघडलेपणा आहे.) तुझी तब्येत कशी आहे ?

सीता : कशी दिसते ? (लाडिकपणे विनूचे केस घुसळण्यासाठी पुढे येते...पण तो एकदम वाकून तिला चुकवतो. ते तिच्या लक्षात येते, की काय, कोण जाणे. ती विनूकडे दुर्लक्ष करून हातांतल्या पिशव्या बाजूला ठेवते. पिशव्या ठेवता ठेवता रामरावांना आनंदाने सांगते.) आज मी येताना काय आणलं असेल ?

रामराव : काय ?

सीता : तुम्ही ओळखा...(ते बघत राहतात.) वांगी... भरताची वांगी.... हे एवढं एक एक वांगं... खाल्लं होतं का हल्ली कधी भरीत ? .. गेल्या चार वर्षांत ? (ते बोलत नाहीत) मी आज करते भरीत आणि भाकऱ्या...खा पोटभर....

रामराव : पण तू....(थोडे अडखळत) अशी एकदम कशी काय आलीस....? अचानक... आधी न कळवता...?

[ तेवढ्यात वीणा बाहेरून येते. तिच्या हातात पेढ्यांची एक छोटी पुडी आहे. सीताबाईला बघताच ती एकदम क्षणभर थबकते. खरेच का ही आपली आई ? असा विचार तिच्या मनात आला असावा. दुसऱ्याच क्षणी ती वेगाने 'आई' असे ओरडत पुढे होते आणि आपल्या आईला कडकडून मिठी मारते. दोघीजणी क्षणभर भान विसरून एकमेकींच्या गालांचे पापे घेतात. दोघींच्याही डोळ्यांत पाणी येते. त्या गहिवरतात. त्यांचे गळे दाटून येतात. विनू फुग्यांचा झुबका घेऊन पुतळ्यासारखा उभा आहे. ]

सीता : तू कुठं जाऊन आलीस ? बाबी ती माझी. (तिला कुरवाळते.)

वीणा : (डोळे पुसत– हसत) शंकराच्या देवळात.

[ ती प्रसादाचा एक पेढा तिच्या तोंडात कोंबते. ]

रामराव : ती हल्ली तुझ्यासाठी सोमवार करते.... दर सोमवारी शंकराला जाते....

सीता : (बसत, गहिवरून) शंकरानं तुझी प्रार्थना ऐकलेली दिसते...शेवटी आले मी बरी होऊन.

वीणा : आई, तू आलीस....मला वाटतंय्...पंख लावून आपण उडत राहावं...

रामराव : उडायचं, तर ऊड...आधी जाऊन कॉफी कर तिच्यासाठी...

सीता : मला चहा-कॉफी काही एक नको. मी इथं आलेय्...माझ्या घरी....एवढ्यानंच माझं पोट भरलंय्... (आता नीताचा वाढदिवस होणे कठीण, या विचाराने विनू नख-टाचणी लावून एकेक फुगा क्रमाक्रमाने फोडत जातो. त्याचा फट फट आवाज येतो...पहिल्या दोन-तीन आवाजांकडे कुणाचे लक्ष जात नाही.) तू अशी जवळ बैस माझ्या... (तिच्या गळ्याभोवती हात टाकते आणि बसते. फट्कन एक फुगा फुटतो.)

वीणा : पण तू अशी एकदम अचानक कशी आलीस ? कळवायचं तरी....

रामराव : कुणी तरी आणायला नसतं का आलं ?

सीता : आणि आलंच नसतं कुणी आणायला, तर ? (गालांत हसत अपेक्षेने बघते.)

रामराव : (किंचित चिडून) काय बोलतेस तू हे ? हीच आमची किंमत ?

सीता : (हसते) नाही, हो ! मी गंमत केली !....मला एकदम सगळ्यांना आश्चर्यचकित करायचं होतं...अग, काल सकाळी मला डॉक्टर मिराशींनी बोलावलं आणि सांगितलं, साठेबाई, (खवचटपणे विनूला) 'साठेबाई' बरं का, रे... तुमच्या सर्व टेस्ट्स निगेटिव्ह् आल्यात... आता तुमच्या रक्तात ते जंतू नाहीत... तुम्ही रोगमुक्त झालात ... तुम्ही आता घरी जा....

वीणा : (तिला एकदम कडकडून मिठी मारते.) हे ऐकल्यावर तुला काय, ग, वाटलं, आई ? (गाडीची शिट्टी वाजते.)

सीता : ( हसत) आता तू म्हणालीस, तेच ! मला वाटलं, गरुडाचे पंख लावून उडत उडत इथं यावं.... (फटकन आणखी एक फुगा फुटतो.)

रामराव : कळवलं असतं, तर विनू किंवा मी आलो असतो मोटार घेऊन ...

सीता : ती तुमची मोटार...जाताना आठ ठिकाणी बिघडली...

रामराव : आता नवीन घेतलीय् ..(फटकन फुगा फुटतो.)

सीता : पण मला थांबायचंच नव्हतं...मी साफ बरी झाले, हे काल कळल्यावरोबर मी निघाले...कारण आज नीताचा वाढदिवस, हे माझ्या लक्षात होतं.... म्हटलं, तो चुकवायचा नाही ...(फुगा फुटतो) विन्या, ते फुगे फुटताहेत, की तू फोडतो आहेस ?...लाव ना ते फुगे कुठं तरी. या विन्यात काही सुधारणा नाही. (विनू काही न बोलता 'भैयाराम' अशी हाक मारीत बाहेर जातो.) भैयाराम येतो ना नियमित ?

वीणा : येतो...

सीता : दिसला नाही कुठं तो... ?

वीणा : रेखाबरोबर गेलाय् ...

सीता : (उत्कंठेने) रेखा कुठं गेलीय् ?... आईकडे असणार. रोज आईकडे जाऊन कुचूकुचू करणार...आणि नीता ?

वीणा : तीही आजीकडे गेलीय्....

सीता : का ? ती दोघं येणार नाहीत वाढदिवसाला ? विमलाबाई आणि...

वीणा : तिचा पाय मुरगळलाय्...विमलाबाईचा...

सीता : कुठं नाचायला गेली ? (हसते....थांबून...) पण अजून माणसं कशी नाही जमली वाढदिवसाला ?

वीणा : येतील. साळूबाईनं काही करून ठेवलंय्, की नाही, ते बघते...नाहीतर ती झोपून राहायची.

सीता : ती तरी येते का रोज ?

वीणा : (हसत) येते...आणि झोपून राहते. (ती स्वैपाकघरात जाते.)

सीता : ( हसत ) आणि नाटेकर कुठं दिसले नाहीत ते... ओरडले नाहीत 'भैयाराम...भैयाराम' करीत.

रामराम : बाजारात गेलेत नाटेकर...उद्याच्या उपासाचं सामान आणायला.

सीता : हो. उद्या आषाढी एकादशी. आमचं पंढरपूर राहिलं ... (थांबून....उठून रामरावांच्या शेजारी पायांशी बसते.) पाय आवळू ? खूप वर्षं तुमच्या पायांना स्पर्श नाही केला... आवळून देते...उभे राहता ना कोर्टात ? चालते ना वकिली ? (स्वतःशीच हसते. )

रामराव : नको, ग. (एकदम पाय बाजूला घेतात आणि खुर्चीत आसनमांडी घालतात.) तू बैस स्वस्थशी...प्रवासानं दमून आली आहेस....

सीता : प्रवासाचे मला जरासुद्धा श्रम झालेले नाहीत...इथं येण्याच्या आनंदात सगळा शीण नाहीसा झाला....तुमची तब्येत कशी आहे ?

रामराव : चाललंय्. मन स्वस्थ नसलं, म्हणजे तब्येत कसली असणार ?

सीता : आता मी आलेय्...आता तुमची तब्येत छान सुधारेल... माझ्या हातच्या जेवणाची सवय तुम्हांला...

[ बोलता बोलता ती रामरावांच्या उघड्या हातावरून नितळपणे हात फिरवण्यात तल्लीन होते. पण रामराव शर्टाची वर गुंडाळलेली त्या हाताची बाही हळू हळू खाली करतात आणि तिचा स्पर्श टाळतात. ते तिच्या लक्षात येताच ती आपला हात मागे घेते. तेवढ्यात वीणा आलेली असते.... ती बसता बसता.... ]

सीता : बसू नकोस, ग... हे बघ, साळूबाईला म्हणावं.... मी येते तिला भेटायला... पण जायच्या आधी शेगडीत थोडे कोळसे घालून पेटवून ठेव, म्हणावं....

वीणा : काय करणारेस आज ?

सीता : यांना माझ्या हातानं भरीत करून वाढणार आहे...येताना घाईघाईत दोन मोठी वांगी आणलीत...अग, गाडी सुटता सुटता मला दिसली.... त्या कातकरणीनं धावत दोन वांगी खिडकीतनं आत टाकली आणि पैशासाठी धावत राहिली.... घाईत मी नोट टाकली, ती पाचाची होती.... खरी आठ आठ आण्यांची वांगी... जाऊ दे. ( वीणा आत जाताना ) कांदा मी चिरीन, म्हणावं... साळूबाई म्हणजे अगदी जाड कांदा चिरणार....(वीणा आत जाते.)

रामराव : हे बघ...ते कांदा चिरणं ... भरीत करणं सगळं वीणा करील...

सीता : (थोड्या संशयानं) का ...का ? मी का नको ?

रामराव : (करवादून) तू नको, असं नाही. पण तू थोडी विश्रांती घे. तुला विश्रांतीची गरज आहे.

सीता : (किंचित विषादाने हसत) कसली विश्रांती ! मी आजारी होते, तेव्हा सुद्धा कधी विश्रांती घेतली नाही... आता तर मी आजारी सुद्धा नाही. (ती उठते आणि आपल्या पिशवीतली पर्स काढते. छोटीशी. त्या पर्समधून मेडिकल सर्टिफिकिटाचा कागद काढते. तेवढ्यात आतून वीणा येते.)

वीणा : काय, ग, ते ?

सीता : माझं मेडिकल सर्टिफिकेट. (सीता ते सर्टिफिकेट वीणाकडे देते.) वाच. (वीणा वाचत असताना) गेले नऊ महिने परत परत सगळ्या टेस्टस् निगेटिव्ह आल्यात. डॉक्टर म्हणाले, साठेबाई, डॉक्टरी शास्त्राप्रमाणे तुम्ही रोगमुक्त झालात...स्वच्छ बऱ्या झालात ! (तेवढ्यात बाहेरून विनू येतो आणि परक्यासारखा उभा राहतो. सीताबाईकडे परकी नजरेने बघत राहतो. वीणा तो कागद वाचून तिच्याकडे परत देऊ लागते.) तुझ्या अण्णांना दे. त्यांची खात्री होऊ दे. नाहीतर...(विनूकडे खवचट नजरेने बघत) कुणाला वाटेल, मी आश्रमातून पळून आलेय्... (वीणा तो कागद अण्णांकडे देते. अण्णा तो वाचत असताना) आणि आता तर हा आजार होऊ नये, म्हणून प्रतिबंधक लससुद्धा निघालीय्... ती टोचून घेतली, की....(रामराव कागद तिच्याकडे देऊ लागतात) त्याला बघू दे. (रामराव तो कागद विनूकडे देतात. विनू वाचतो. ) वाटलं, तर ते सर्टिफिकेट फ्रेम करून इथं कुठं तरी लावा. (तीक्ष्णपणे) फुकट फ्रेम हवी असल्यास माझं यांतलं एखादं पेंटिंग बाहेर काढलंस, तरी चालेल. ( हे सर्व बोलत असताना ती दिवाणखानाभर फिरते आहे.... आणि एकेका फ्रेमवर किती धुरळा बसलाय्, ते बघते. मध्येच एकदा कडवटपणे हसत) इथं सगळ्यांची डिग्ऱ्यांची सर्टिफिकेटं आहेत...माझंच एक सर्टिफिकेट कमी होतं. ते लावून टाका....(किंचित वैतागून)...तो भैयाराम काम करतो, की काय करतो ? गेल्या चार वर्षांत या सगळ्या फ्रेमवरचा धुरळा झटकलेला नाही... वीणा,

आण, ग, फडका एक....

वीणा : ( चिडून ) आई, ते सगळं मग करता येईल. ( तिला धरून, दाबून खाली बसवते. ) तू बस बघू शांतशी इथं....( विनू सर्टिफिकेटाची घडी करून सीता-बाईकडे देतो. ती घडी पोलक्यात ठेवते. )

सीता : ( हसत ) बसून करू काय ? ( ती बसते. तिला चिकटून वीणा बसते.)

वीणा : काही तरी बोल. चार वर्षांनी येते आहेस....

सीता : ( कुठेतरी अधांतरी बघते. ) चार वर्षांनी...तीनशेपासष्ट गुणिले चार... किती दिवस गेले ? काय काय घडलं त्या काळात ? माझ्या मनाला सगळ्यांत लागून राहिलं, ते तुझ्या लग्नाचं, ग, पोरी. माझ्यामुळं तुझं लग्न मोडलं. ते सुद्धा मला कळलं बनीकडून. ( तिच्या तोंडाकडे बघत ) देशपांड्यांचा सुधीर काय करतो आता ?

वीणा : हल्ली मुंबईला असतो. तिथं प्रॅक्टिस करतो...त्यानं केलं लग्न...

सीता : केलं ? कुणाशी ?

वीणा : ( बेफिकिरीने ) कोण जाणे, कुणाशी ?

सीता : ( तिच्या गालांवरून हात फिरवीत ) त्यानं नाही म्हटलं, तेव्हा तुला वाईट वाटलं ना ?

वीणा : काही वाटलं नाही...मी त्याच वेळी त्याला विचारलं, आपलं लग्न झाल्या-नंतर आईला हा आजार झाला असता, तर तू मला टाकलं असतंस ? ( सीताला तिचे मोठे कौतुक वाटते.)

सीता : मग तो काय म्हणाला ?

वीणा : तो काही बोलला नाही...मी विचारलं, आईचा आजार सांसर्गिक नाही, हे तुला माहीत आहे ना ?....आणि हा आजार कधीच आनुवंशिक नसतो, हेही तुला ठाऊक आहे ना ?

सीता : ( अपेक्षेने ) उत्तम केलंस...काय म्हणाला ?

वीणा : काही बोललाच नाही...तेव्हा मीच त्याला म्हटलं, आपलं लग्न मोडतंय्, याचा मला आनंदच होतोय्.

विनू : तो मूर्खच होता, ग... !

सीता : ( विनूकडे बघत ) खूप जण असतात...मूर्ख. ( तिचे सांत्वन केल्याप्रमाणे तिच्या केसांवरून हात फिरवीत ) असू दे. आता मी आलेय् ना ? मी खंबीर आहे. या मोसमात तुझा बार उडवून देते....

[ वीणा खाली मान घालून लाजते. ]

विनू : काही नको. आम्ही सुद्धा खंबीर आहोत. ( सीताबाई त्याच्याकडे बघत राहते. ) आम्ही ठरवलंय् तिचं लग्न.

सीता : ( एकदम आनंदित होते ) कुणाशी ? कोण हा नशीबवान पोरगा ?

विनू : अकोल्याचा आहे...प्रमोद जोग.

सीता : करतो काय ?

विनू : त्याच्या तेलाच्या तीन गिरण्या आहेत. अकोल्याला...आणि तुपाचा घाऊक व्यापार आहे...हा मुलगाही धंदाच बघतो...

सीता : त्यांनी पसंती दिलीय् ?

विनू : मुलाला तर आपली वीणा खूपच आवडलीय्...

सीता : अरे, ती कुणालाही आवडेल...तो सुधीर फुटक्या कपाळाचा म्हणून गेला... देण्या-घेण्याचं काय ठरलं ?

विनू : अजून सगळं पक्कं व्हायचंय्. दोन आठवड्यांत होईल. लग्न मात्र ते लवकर करणारेत ..

सीता : या आषाढ–श्रावणात लग्न कुठलं ?

विनू : ते करतील...ती सुधारक फॅमिली आहे.

सीता : ते लाख करतील. पण मला सांडगे–पापड घालायला नकोत ? या पावसात वाळवू कुठं ?

रामराव : ( एकदम कावादतात ) हे बघ....तुझ्या सांडग्या-पापडांसाठी कोणी जेवायचं थांबणार नाही आहे. तू उगाच गडबड करू नकोस.

विनू : हल्ली कॉन्ट्रॅक्ट दिलं, की सगळं भागतं...( सीताबाई आत जाण्यासाठी उठू लागते. )

वीणा : ( तिला खाली बसवीत ) तू आता कुठं चाललीस ?

विनू : ( हसत ) लग्नाचा शालू नेसायला निघाली, वाटतं ? ( सर्वजण हसतात.)

सीता : ( हसत ) कसला शालू नेसते ?...पण जरा दागिने नजरेखालून घालते....हिला काय काय द्यायचं, ते बघते....

वीणा : ( तिला दाबून, ओढून खाली बसवते. ) त्याला खूप अवकाश आहे अजून–तू आश्रमातल्या गोष्टी सांग आम्हांला. तू आश्रमात पाय ठेवताना तुला खूप दुःख झालं का, ग ?

सीता : नाही, ग ! तुम्हां सर्वांना सोडून जाताना दुःख झालं, तेवढंच !...आश्रमात इतरांची मोठी दुःखं पाहिली आणि मग मी माझं दुःख विसरूनच गेले... तुला एक सांगते, वीणा...तुलाही, विनू . आणि ( रामरावांना–ते डोळे मिटून आरामखुर्चीत पडले आहेत.) तुम्हांलाही...जागे आहात ना ? की झोपलात ? ( ते पटकन डोळे उघडतात.) एक सांगते...अनुभवाचं म्हणून....आयुष्यात

थोडं सुखी व्हायचं असेल, तर दुसऱ्यांची दुःखं बघायला शिकलं पाहिजे.... आश्रमात मी इतर रोग्यांच्या सेवेला लागले, सकाळपासून संध्याकाळपर्यंत कामाला लागले, की मग मलाच माझा विसर पडायचा...आम्ही खूप जणी एकत्र बसून भाज्या चिरत होतो...स्वैपाक करीत होतो....वाढत होतो... आश्रमात दोन अडीच हजार लोक. ज्यांचा विकार आमच्यापेक्षा खूप बळावला होता, त्यांची सेवा करीत होतो....संध्याकाळ झाली, की आम्ही फाटकापाशी दगडावर बसत होतो....विशेषतः मी आणि प्रेमाताई...इथनं अमरावतीला पोचणारी गाडी संध्याकाळी पाचला यायची स्टेशनवर...मी फाटकापाशी बसून वाट बघायची....आश्रमाकडे येणाऱ्या टांग्याची...टांग्यातून तुम्ही कोणी याल भेटायला, म्हणून....

वीणा : (जरा रडवेल्या आवाजात) मला खूपदा वाटायचं, ग...एकदा जाऊन यावं, म्हणून...पण...

सीता : विन्या नको म्हणाला असेल...

विनू : (जरा चिडून) मी काय, तुझ्याशी दुष्टावा होता, म्हणून नको म्हणत नव्हतो...सगळ्यांच्या हितासाठीच नको म्हणत होतो...देशपांड्यांनी काय केलं, ते पाहिलंस ना?

रामराव : (डोळे मिटूनच) आणि आश्रमात तुझ्या मनाची चार वर्षं जी अवस्था होती, तीच इथं आमच्या सर्वांच्या मनाची होती...इथं कुणाला अन्न गोड वाटत होतं! (थांबून) कुणी आलं नाही, त्याला कारणं होती...तेवढ्यासाठी तुला एवढं वाटायला नको.

सीता : (थोड्या विषादाने) मला कुठं काय वाटतंय्? आणि वाटून उपयोग तरी काय! प्रेमाताई मला पुनः पुनः सांगायच्या, आशाताई, आपण वाट बघू नये. कुणी भेटायला येत नाही ...आलं, तर दुःख येतं भेटायला...(पदराने नाक पुसते...मग थोडी थांबून) तुमची ही चूक नव्हती...कारण आश्रमातसुद्धा सौभाग्यवती सीताबाई करंदीकर होतीच कुठं? अधनं मधनं नाटेकर यायचे तेवढे. माझी बना मात्र दर महिन्याला न चुकता यायची. आशालता साठेला भेटायला...यायची आणि मिठी मारायची ..माझे पापे घे घे घ्यायची... माझे पाय आवळायची...म्हणायची....डोळ्यात पाणी आणून...ताई, तुझा आजार मला दे तू तुझ्या भरल्या संसारात जा...(थांबून स्वप्नमय दृष्टीने) गेल्या वर्षी तिने आणले पस्तीस हजार रुपयांचे दागिने माझ्याकडे आणून दिले....लपवून ठेवले होते...म्हणाली या कामासाठी वापर...

विनू : ते आहेत कुठं?

सीता : (एकदम वळून) का? तुझ्या फॅक्टरीसाठी हवेत?

विनू : फॅक्टरीसाठी नकोत...पण ठेवलेस कुठं, तेवढं विचारलं.

सीता : आश्रमात आहेत...माझं सगळंच तिथं राहिलंय्...होल्डॉल....बॅग... माझी वेताची आरामखुर्ची...( स्वप्निल होत ) त्या आरामखुर्चीनं मला खूप सुख दिलं···कातरवेळ झाली, की तुमच्या...घरच्या आठवणींनी माझं मन काता-वून जायचं...वाटायचं, आश्रमातून पळून जावं....मग...मग त्या खुर्चीत बसून मी रोज रात्री पुस्तकं वाचायची....प्रेमाताईंनी माझ्यावर मोठे उपकार केले...त्यांनी मला वाचनाची गोडी लावली...एखादं छान पुस्तक हातात आलं, की वेळ कसा गेला, ते कळतसुद्धा नव्हतं...प्रेमाताई लायब्ररीचं काम बघायच्या...त्या आपण वाचायच्या आणि मग मला वाचायला सांगायच्या... ( रामरावांना...ते एकदम जागे होतात. ) तुम्हांला आठवतं ?...दोन वर्षांपूर्वी एका पत्रात मी एक सुंदर कविता लिहिली होती...

वीणा : ( आश्चर्याने ) तू आई, कविता केलीस ?

सीता : मी नाही, ग. मी कुसुमाग्रजांची कविता वाचली....आणि मला वाटलं...त्यांनी ती माझ्याच परिस्थितीवर लिहिलीय्... ( रामरावांना ) आठवतं ना तुम्हांला ? मी एका पत्रात ती लिहिली होती, बघा...

रामराव : ( गडबडून ) कविता ?...मला नाही आठवत...

सीता : ( किंचित हसत ) नाही आटवत ?

रामराव : कुठली ? मला नाही आठवत.

वीणा : तू सांग ना, तुला आठवते, तर...म्हण तरी...

सीता : ( क्षणभर विचार करते....आठवते आणि म्हणू लागते.. शांतपणे )

**‘ असे हजारांसंगे आहे**
**जडलेले माझे नाते**
**असेच आहे आणि तरीही**
**अनोळखी मी सदाच राही**

**दूर हजारांपासुनि आहे**
**विजनामधि माझे घरटे**
**मीपण भरले जगात माझे**
**जे आहे माझ्यापुरते ... ’**

[ ती एकदम तार तुटल्यासारखी गप्प राहते. वीणा एकदम तिला मिठी मारते. ]

वीणा : किती, ग, सुंदर आहे कविता !

सीता : पण यांना आठवत नाही....कसली वकिली करतात, परमेश्वर जाणे.

रामराव : आता आठवली मला...तू एका पत्रात लिहिली होतीस...

सीता : नशीब माझं ! ( थांबून ) संध्याकाळी आम्ही फाटकापाशी बसलो, की प्रेमाताई वडाघडा एकेक कविता म्हणायच्या...ही कविता तर इतकी छान म्हणायच्या, की त्या कातर-काळोखात ऐकता ऐकता माझा जीव कासावीस व्हायचा.

वीणा : प्रेमाताईही आपल्या घरी गेल्या ? ( ती खिन्नपणे मानेने नाही म्हणते. ) का ? त्यांचा विकार अद्याप बरा झालेला नाही ?

सीता : बरा होऊन चार वर्षे झाली. अवघ्या अठ्ठावीस वर्षांच्या आहेत त्या. एमे. आहेत. कॉलेजात शिकवीत होत्या...दोन वर्षांतच त्या रोगमुक्त झाल्या, म्हणून आनंदानं घरी गेल्या....( थांबून खिन्नपणे. ) आणि त्याच वेळेला तिच्या घरी....तिचा नवरा दुसरं लग्न करण्यासाठी मुलगी पाहत होता...ती मुलगी...तिची आई, तिचे वडील घरी आले होते...मुलीला पाहण्याचा कार्यक्रम चालू होता....हिला पाहताक्षणी ' कोण ही आली दळभद्री ? ' असे तो म्हणाला, कोणी तरी पलिकडल्या आळीतली चुकून आली असावी, असं त्या मंडळींना त्यानं सांगितलं. आणि गड्यांना सांगून तिला परस्पर एस्टी स्टँडवर पोचवली...( ऐकता ऐकता सर्वजण विषण्ण होतात....मग थांबून ) बिचाऱ्या प्रेमाताई दुःखभरानं परत आश्रमात आल्या...

वीणा : किती वाईट, नाही ?

सीता : ( खरखरीत आवाजात ) बाई, ग, एक वेळ रोग परवडतो...रोगट मन परवडत नाही. ( थोडा वेळ विषण्ण शांतता. ) खरं म्हणशील, तर ही एक मोठी शोकांतिका आहे... ' शोकांतिका ' हा प्रेमाताईचा आवडता शब्द... साफ बरं झाल्यावर आपण आपल्या घरी जाणार, या आशेवर रोगी जगत असतात. रोग साफ बरा झालेल्या लोकांवर जर त्यांच्या घरात घेतलं गेलं नाही, रोगमुक्त होऊन बाहेर गेलेली माणसं दुःखी चेहऱ्यानं परत आश्रमात आली, तर...तर आश्रमातल्या रोग्यांवर त्याचा फार वाईट परिणाम होतो... रोगी निराश होतो...खरं म्हणजे मानसिक प्रसन्नता आणि आशावाद ही त्याची दोन मोठी औषधं ! पण रोगी निराश झाला....बरं होऊन उपयोग काय, असं त्याला वाटू लागलं, की मग संपलंच...! ( थांबून थोड्या वेळाने ) लोकांनी डॉक्टरांचं म्हणणं मानलं नाही...आपल्याच खुळ्या समजुती चालू ठेवल्या, तर डॉक्टरी शास्त्राला तरी काय अर्थ उरणार ?

वीणा : प्रेमाबाई आता कायम आश्रमात राहणार ?

सीता : नाही. त्या प्रचाराचं कार्य करणार, म्हणतात... आश्रमातून बाहेर जाऊन... जे रोगमुक्त झालेत, त्यांना घरी घेतलं जावं, म्हणून त्या प्रचार करणार आहेत.

वनीचे पस्तीस हजार रुपयाचे दागिने मी त्यांना देणार आहे...आणि माझे सुद्धा ( रामराव पटकन वळून बघतात. ) मला माहेरनं मिळालेले. ( एकदम रामराव सरळ बघतात. एकदम दोन-तीनदा गाय हंबरते. ) ती पाहा हंबरतेय्...मी आल्याचं कळलंय् तिला....( उठत, अर्थपूर्ण आवाजात ) खरं म्हणजे मी घरात येण्याच्या आधी गोठ्यात जायला हवं होतं. ( परत हंबरण्याचा आवाज ) येतेय्, ग, कावेरी, थांब ! ( जाता जाता विनूकडे बघत ) जनावरं किती शहाणी असतात, नाही ?

[ ती वळून बाहेर जाऊ लागते...तोच दरवाज्यात रेखा येते. सीताबाईला पाहताच रेखा एकदम भूत पाहिल्यासारखा चेहरा करते आणि झडप घालून नीताला ओढते. ]

नीता : आजी आजी आली....आजी आली. ( आनंदित होते. तिला सुटायचे आहे....पण रेखा तिला गच्च धरते. )

रेखा : आई, तुम्ही ?

सीता : हो....भ्यालीस, की काय ?

रेखा : तुम्ही कधी आलात ?....आणि अशा अचानक ?

सीता : या पोरीचा वाढदिवस, म्हणून घाईनं आले.. ( नीताला बोलावीत तिला घेण्यासाठी हात पुढे करीत ) अग्गबाई, केवढी मोट्टी झाली ही आमची चिमुरडी. अग्ग लबाडे. ये ... ये... मला पापी दे ... मला मुंगीचं कोडं घाल...ये कित्ती वर्षं तुझा गालगुच्चा घेतला नाही...ये....तुला काय आणलंय्, बघ, मी.. ( पिशवीतून एक फ्रॉक काढून दाखवते. )

नीता : ( पुढे जाण्याचा प्रयत्न करीत ) सोड ना मला, आई. मला आजीकडे जाऊ दे. ( मोठ्याने ओरडत ) चिमटा काय काढतेस ?

सीता : ( एकदम गंभीर होते ) असू दे. मग घे हा फ्रॉक. ( बाजूला ठेवते. ) गोठ्यात कावेरीला भेटून येते...ती सारखी हंबरतेय् माझ्यासाठी...( बाहेर जाते. )

[ ती बाहेर जाताच सगळे वातावरण एकदम बदलते. तप्त होते. विनू एकदम टवकारून रामरावांकडे बघतो रामराव आणि वीणा विनूकडे बघतात. मग सर्वजण त्रस्त नजरेने एकमेकांकडे पाहतात. रेखा अधिक संतप्त झाली आहे ]

नीता : ( घाबऱ्या घुबऱ्या नजरेने आईला ) मी तो घेऊ फ्रॉक....आजीनं आणलेला ?

रेखा : हात मोडीन, हात लावशील, तर...! तू आत जा, बघू... चल.... ( तिला घालवते....ती जाते.)

विनू : अण्णा, या बाबतीत तुम्ही निश्चितपणे काही तरी बोलायला पाहिजे...

रामराव : अरे, मी काय बोलू ? की मीच इथनं तोंड घेऊन जाऊ ?

विनू : अण्णा, तुम्ही तिला तोंड उघडून सांगायला पाहिजे....

[ अण्णा त्रस्त होऊन बघतात. ]

रामराव : काय ?

विनू : की तू इथनं परत आश्रमात जा, म्हणून .... तिचं निधन झालंय् अपघातात, असं आपण उठवलंय्... ( गाय हंबरते. )

रामराव : ( उडवून लावीत ) ते तू सोड....त्यावर कोणी विश्वास ठेवीत नाही.

रेखा : त्या इथं राहिल्या, तर आम्हांला इथं राहणं कठीण होईल.

विनू : हो. मग आम्हांला कुठं तरी वेगळं बिऱ्हाड करावं लागेल.

रामराव : ( चिडून उठतात. ) अरे, पण तुम्ही सगळे असं का बोलताय् ? आश्रमातून अशी एकाएकी निघून ये, असं मी का तिला सांगितलं होतं ?

विनू : नसेल. पण तू परत आश्रमात जा, असं तुम्ही तिला निक्षून सांगायला पाहिजे.

वीणा : विनू, तू काय बोलतो आहेस हे ? तुला तरी कळतंय् का, तू काय बोलतो आहेस, ते ?

विनू : काय बोललो ?

वीणा : आईला परत जा, म्हणून सांगायचं ?

विनू : ( चिडून ओरडतो ) नको सांगायला ? अग, त्या रोगाची तुला काही कल्पना आहे का ?

वीणा : पण तिनं डॉक्टरांचं सर्टिफिकेट दाखवलं ना ? तिच्या रक्तात तो जंतू आता नाही...ती स्वच्छ बरी झालीय्....शिवाय आता प्रतिबंधक लस येतेय्....

विनू : तरी सुद्धा त्या विचारानं....ती तिची वाकडी बोटं पाहून आम्हांला वीट येईल...

वीणा : समज, हा रोग तुला किंवा....

रेखा : ( चिडून ) काही नाही ते अमंगल बोलू नकोस या वेळेला...

वीणा : किंवा मला हा रोग झाला असता, तर मी काय केलं असतं ?

विनू : मला झाला असता, तर मी निश्चित आश्रमात गेलो असतो.

वीणा : रोग साफ बरा झाल्यानंतर सुद्धा ?....काय सांगतोस ?

विनू : हो...हो. निश्चित. आपणहून गेलो असतो...ती आपली सामाजिक जबाबदारी

आहे.

वीणा : ( तिरकसपणे ) हो. प्रत्येकाला दुसऱ्याची सामाजिक जबाबदारी अधिक लवकर कळते.

विनू : फार बोलते आहेस तू, वीणा.

रेखा : स्पष्ट विचारते मी....त्यांनी केलेलं जेवण तुम्ही जेवाल ?...आम्ही जेवणार नाही.

[ रामराव काही न बोलता अस्वस्थपणे फेऱ्या मारीत राहतात. ]

वीणा : ( निक्षून ) मी जेवीन...मी जेवीन...

विनू : आम्हाला चालायचं नाही ते ! ( वळून ) अण्णा, तिच्या हातचं जेवण तुम्ही जेवाल ?

रामराव : ( एकदम गडबडतात ) अरे, आपण तिला 'तू जेवण करू नकोस,' असं सांगू. आपण वरची माडी साफ करून घेऊ...ती माडीवर विश्रांती घेत बसेल. पण ती आलीच, तर तिला हाकलून कशी देणार ? विचार कर तू, विनू....

विनू : ( रागाने ओरडतो ) तुम्ही काय वाटेल ते करा. मी....रेखा आणि नीता इथं राहणार नाही...

रामराव : ( रागाने तडकतात ) इथं राहणार नाहीस, म्हणजे काय ?...तू वेगळा झालास, तर गावात त्याची अधिक चर्चा होईल.

विनू : होऊ दे. मला आमची...नीताची अधिक काळजी घेतली पाहिजे...

रामराव : ( थोड्याश्या अजीजीने ) अरे, मग तिला आपण पालीच्या घरात राहायला सांगू. मागं ती तिथं राहायला तयार होती....वनीला सांगू तिथं येऊन राहायला

विनू : ( वैतागून ) तुम्हांला, अण्णा, कळत कसं नाही ? आई रोगी आहे.

वीणा : 'आहे' नाही. होती.

विनू : हो....हो. होती...पण ती रोगी होती, एवढ्यासाठी सुद्धा तुझं ठरलेलं लग्न मोडलं. आणि पुढं होणार नाही.

वीणा : चालेल मला. माझं लग्न कधीच झालं नाही, तरी चालेल ! मी अशीच राहीन...पण आईला इथनं घालवायची नाही.

रेखा : ( विनूला ) मला तुम्ही रिक्षा आणून द्या....मी नीताला आईकडे ठेवून येते.

रामराव : ( चिडतात ) या सगळ्या गोष्टी आत्ताच तडकाफडकी करायला का पाहिजेत ? उद्या-परवा शान्तपणानं विचार नाही करता येत ?

वीणा : आज नीताचा वाढदिवस आहे... या वाढदिवसासाठी ती घाईघाईनं

आलीय्...आजचा दिवस तरी गप्प बसा. एकदा नीताचा वाढदिवस होऊ दे. आता चार माणसं येतील...चार–चौघांसमोर आईला अशी वाळीत टाकू नका...तिच्या मनाचा काही विचार करा...

विनू : वाढदिवस मी आधीच रद्द केलाय्...

[ रामराव चमकून बघतात. ]

वीणा : का ?

विनू : आई इथं आहे, म्हणून...

वीणा : आणि माणसं येतील, ती ?....नीताच्या मैत्रिणी...त्यांच्या आया...

विनू : त्यांनाच आईची वाकडी बोटं दिसायला नकोत...भैयारामला फाटकाबाहेर उभा केलाय्....तो सर्वांना परतवतोय्.

वीणा : कारण काय सांगितलं ?

विनू : नीताला एकदम ताप आलाय् , म्हणून...

[ तेवढ्यात शांतपणे सीताबाई आत येते. तिला बघताच विनू एकदम विषय बदलतो. ]

विनू : आईला कावेरीनं ओळखलं, की नाही ?

सीता : का नाही ओळखणार ? मुकं जनावर ते. किती वेळा खुळी प्रेमानं माझी बोटं चाटत होती...( विनूकडे बघत ) बोटं थोडी वाकडी असली, तरी...

रेखा : मी जाऊन येते.

सीता : थांब जरा...( पोलक्यात ठेवलेले सर्टिफिकेट काढून रेखाच्या हाती देते. )

रेखा : ( गोंधळून ) हे काय ? ( वाचू लागते. )

सीता : ते डॉक्टरांचं मेडिकल सर्टिफिकेट आहे... कुंडलीच माझी ! तूच तेवढं ते वाचलेलं नव्हतंस...वाच. ( रेखा कागद वाचून परत देते. तो कागद ती पुन्हा पोलक्यात ठेवते. ) पडतोय् का काही प्रकाश ?

विनू : ( विषय बदलण्यासाठी ) आई, तू थोडा वेळ पेटी वाजवणार का ? खूप वर्षं ऐकलेली नाही.

सीता : ( किंचित हसत ) वाढदिवसाला जमलेल्या मंडळींसमोर वाजवायची का ?... वाकड्या बोटांतली जादू दाखवायची ? ( विषादाने हसते. )

विनू : आज कुणी येणार नाहीये...

सीता : का ?

विनू : वाढदिवस पुढं ढकललाय्....

सीता : माझी वाकडी बोटं दिसतील, म्हणून ?

विनू : नाही, ग. तुला प्रवासाची दगदग झालीय्...सगळी पोरं जमणार....त्यांच्या आया....आरडाओरडा करणार...गर्दी करणार...

सीता : गर्दीचं, विनू, मला काय सांगतोस ? चार वर्षं राहिले आश्रमात....आश्रमात अडीच हजार माणसं होती, माणसं रोगी होती...पण त्यांची मनं रोगट नव्हती...

विनू : तू असं तिरकस काही बोलू नकोस....तू काही तरी गैरसमज करून घेतल आहेस, आई.

सीता : नाही, रे. एक चूक केली मी. कुणाचं काही चोरून ऐकू नये...पण गोठ्यातनं येताना एकदम या दरवाज्याच्या बाजूला थांबण्याची दुर्बुद्धी झाली मला...

विनू : (गडबडून जातो) तू काही मनावर घेऊ नकोस...आपण सगळी चर्चा उद्या–परवा करू....तू आता पेटी वाजव....(पेटी आणायला जातो...तो पेटी घेऊन पुढ्यात ठेवीपर्यंत.)

सीता : अरे विन्या, देवी येतात....देवीचे व्रण तोंडावर राहतात, ते बुजवता येत नाहीत. पक्षाघात होतो....एखादा हात लुळा पडतो...तोंड वाकडं होतं... ते नीट होत नाही. तशीच ही वाकडी बोटं...या वाकड्या बोटांनी मी सगळं काही करते...फक्त कुणाच्या नावानं बोटं मोडत नाही...बाकी भाज्या चिरते, पोळ्या लाटते...भाकऱ्या करते....जेवण करते...पेटीसुद्धा वाजवू शकते... बघ....

[पेटी पुढ्यात ओढते आणि आपली वाकडी झालेली बोटे पेटीवरून सराईत-पणे फिरवते. मन वेधून घेणारे गोड सूर निघतात....मग कुठेतरी बघत ती तल्लीन होते. आणि करुण रसाला पोषक असे एक नाट्यगीत किंवा अन्य एखादे गीत वाजवू लागते. सर्वजण भान हरवून ऐकण्यात दंग होतात. गाणे पुरे होता होता रेखा विनूला खुणेने मी निघते, असे सांगते आणि दरवाज्या-पर्यंत जाते...ती दरवाज्यातून बाहेर बघते आणि दचकून एकदम ओरडते.]

रेखा : (दबलेल्या आवाजात ओरडत) अहो, अकोल्याचे जोग येताहेत !

रामराव : कोण...कोण येताहेत ?

विनू : तात्यासाहेब जोग...

सीता : मुलगा पण आलाय् का ?

विनू : ( गडबडीने, सीताबाईला ) तू लप जा कुठं तरी.
सीता : का ? लपायचं कशासाठी ?
विनू : ते मग सांगतो...आधी पळ. माडीवर पळ...

[ विनू आणि रामराव तिला स्पर्श न करता माडीवर पळायला लावतात आणि माडीचे दार बंद करतात. तात्यासाहेब जोग दरवाज्यात येतात. पंचावन्न, साठ वर्षांचे गृहस्थ. दिसण्यात शांत, प्रसन्न. रामराव त्यांचे स्वागत करतात. ]

रामराव : या...या ना, तात्यासाहेब...आपण आधी कल्पना दिली असती, तर आमचा विनू आला असता स्टेशनवर.
तात्या : मी आगगाडीनं आलो नाही...मोटार घेऊन आलोय्.... कसं काय, विनायकराव ?

[ विनू नमस्कार करतो. ]

रामराव : बसा...बसा आराम. ( वीणा आत जाते. )
तात्या : हार्मोनियम कोण वाजवीत होतं ? ( एकदम रामराव आणि विनू गडबडतात. )
विनू : सहज आपलं....हं. हं. हं...( ओशाळून गडबडून हसतो. )
तात्या : मन बेभान करणारे सूर होते...व्यत्यय नको, म्हणून मी थोडा वेळ पारावर बसलो होतो....वीणा वाजवीत होती का ?
विनू : छे....छे. वीणा शिकणार आहे.
तात्या : ( रेखाकडे बघत हसत....) अस्सं....अस्सं...रेखाताई वाजवीत होत्या, तर.... ( सर्वजण ओशाळून गडबडतात ) वाः! बोटांत जादू आहे तुमच्या, रेखाताई, सुरेख....सुरेख. फार पूर्वी आमच्या अकोल्याला श्रावणात प्रख्यात कीर्तनकारांची कीर्तनं असायची. कधी कधी दीक्षितबुवांच्या साथीला पंडित गंगाधरबुवा साठे यायचे पेटीवर...त्यांची पेटी ऐकायला आख्खं अकोला जमायचं. त्या काळात... त्या सुरांची आज आठवण झाली. तुमच्या बोटांत जादू आहे. रेखाताई, दैवी देणगी असते ही...!
विनू : ( ते पेटी वाजवायला सांगतील, या भीतीने गडबडून ) रेखा, तू आत जाऊन लवकर चहा घेऊन ये, जा! ( तिलाही स्वतःची सुटका हवीच होती. ती पळत आत जाते. )
तात्या : रामराव, तुम्ही उभे का ? बसा ना. ( वीणा ट्रेमधून पाण्याचा ग्लास घेऊन येते. तात्यासाहेब पाणी पिऊन ग्लास ठेवतात. आणि वीणाशी हसतात. ती वाकून

नमस्कार करते. ) आयुष्मान भव.

रामराव : किती वाजता निघालात अकोल्यातून ?

तात्या : तसा मी निघालो खूप लवकर....पण वाटेत बऱ्याच दिंड्या भेटल्या. उद्या आषाढी एकादशी ना ? . चिखलीकडे जातात. तिथं मोटं विठ्ठल मंदिर आहे.

रामराव : हो....हो. ( थांबून ) तुम्ही आम्हांला कळवलं असतं, तर आम्ही आलो असतो अकोल्याला.

विनू : आणि देण्याघेण्यासंबंधी जे आहे, त्या बाबतीत काही बोलायलाही नको. कारण तुम्ही म्हणाल, तसं होणार आहे.

तात्या : ( मंदपणे हसत ) आपण त्या बाबतीत शांतपणे बोलू... ( वीणाकडे बघत मंदपणे हसतात आणि.... ) वीणा, बाळ, तू आत जातेस का ? ( वीणा आत जाते. ) चहा घेऊ आणि मग बोलू... फक्त चहा.

विनू : ( घाईघाईने ) वीणा, चहा जरा लवकर आणा, म्हणावं.

तात्या : फक्त चहा बरं का. आणखी नाही नको.

रामराव : का बरं ? काही घ्या.... शिरा किंवा पोहे...

तात्या : छे... छे छे... तूप... तेल वर्ज्य. हाय कोलेस्टरॉल... ( हसत ) आमचा तेलाचा आणि तुपाचा व्यापार.... आम्ही दुसऱ्यांना तेल... तूप विकतो... पण आम्हांला तेल, तूप वर्ज्य ! ( हसतात )...बाकी हे पेटीचे सूर चालू राहते, तर बाहेरच्या पारावर मी किती वेळ बसून राहिलो असतो, ते परमेश्वर जाणे. ( रामराव आणि विनू कृत्रिम हसतात ).... त्या पारावरची गणपतीची मूर्ती फार जुनी आहे का ?

रामराव : हो.... हो म्हणजे हा बंगला बांधण्याच्या आधीपासूनची आहे... अप्पांनी... म्हणजे माझ्या वडिलांनी हा सिमेंटचा पार बांधून काढला...

तात्या : देवस्थान जागृत असावं...

रामराव : असावं.... याची आई या गणपतीला...

विनू : ( एकदम मध्येच तोडून ) आई हयात होती, तेव्हा ती या गणपतीला फार भजायची.

[ तात्या मंदपणे हसत, डोळे मिटून मान हलवतात. तेवढयात रेखा चहाचा ट्रे घेऊन येते.... चहा... एक–दोन खाद्यपदार्थ... ]

तात्या : ( रेखाला ) तुम्ही पेटी वाजवताना गाता, की नाही ?... तुमच्या बोटां-प्रमाणे...बघू...बघू...तुमची बोटं.. ( रेखा गडबडून बोटे दाखवते. ) वा: !

प्रश्नच नाही. कलावंताची बोटं आहेत.... तुमचा गळासुद्धा गोड असला पाहिजे.... (रेखा लाजून, अवघडून अक्षरशः पळ काढते. तात्या मंदपणे हसतात. विनू सर्वांना चहा देतो... चहा घेत) तुम्हांला मुलं किती विनायकराव ?

विनू : एक मुलगी...

तात्या : (चहा पीत) काय सांगत होतो.... ?

विनू : गळा गोड....

तात्या : चहा गोड आहे. (घोट घेत) त्या गणपतीचं सांगत होतो. ती मूर्ती तुम्ही उघड्यावर टाकलीय्, ते बरोबर नाही. त्यामुळं मूर्तीची सोंड....कानांच्या पाळ्या... बोटं झिजून गेलीत, बघा....

रामराव : (एकदम) वाऱ्यापावसामुळं ती... पावसाचा मारा फार होतो ना ?

तात्या : तुम्ही, रामराव, एक छोटंसं मंदिर बांधून घ्या... मूर्तीभोवती...

रामराव : अप्पा बांधणार होते... पण बांधायचं ठरलं आणि तेच आजारी पडले.... मग ते राहिलं, ते राहिलंच.

विनू : मग... मंदिर बांधायचा विचार केला, की आजार येतो घरात, असा समज झाला.

तात्या : (कप खाली ठेवीत) मग काही इलाज नाही. (श्वास टाकत) हां. आता आपण थोडक्यात मुद्द्याचं बोलू. म्हणजे मी तसं पत्र टाकलंच आहे. पण त्यानंतर पेपर वाचला. म्हणून म्हटलं, इथं आलोच होतो दुसऱ्या कामाला, तर खुलासा करावा. रामराव.... (डोळे मिटत, शांतपणे) तर हे जुळण्यासारखं नाही.

रामराव : (एकदम दचकतात.) पण तुम्हांला मुलगी पसंत होती.

विनू : प्रमोदराव तर म्हणाले होते, की मी याच मुलीशी लग्न करणार...

तात्या : (शांत व समजूतदार आवाजात) ते अगदी खरं आहे. मुलगी आम्हां सर्वांना खूपच आवडली होती. तुमची वीणा कुणालाही आवडेल, अशीच आहे. म्हणूनच आम्हांला सुद्धा खूप वाईट वाटतंय्... असली चांगली मुलगी हातातून जातेय्, याचं....

विनू : मग कारण काय नकाराचं ?

तात्या : (शांतपणे... डोळे मिटून) ते पत्रात लिहिलंच आहे मी... कदाचित ते उद्या मिळेल. लग्न म्हणजे केवळ दोन व्यक्तींचाच नव्हे, तर दोन कुटुंबांचा संयोग असतो, रामराव. (रामराव आणि विनू दचकतात)....तुम्ही, विनायक-राव, तुमची कौटुंबिक माहिती आम्हांला दिलीत, ती बरोबर नाही. (मंद स्मित करतात.)

विनू : ( गडबडून ) कोणती माहिती, तात्यासाहेब ?

तात्या : मुलीच्या आईसंबंधी. ( रामराव एकदम अस्वस्थ होतात. ) तुमच्या आईसंबंधी दिलेली माहिती बरोबर नाही.

विनू : कशावरून ? असं कसं म्हणता, तात्यासाहेब ?

तात्या : चार वर्षांपूर्वी मोटार अपघातात तिचं निधन झालं, असं सांगितलंत तुम्ही.

विनू : ते अगदी खरं आहे, तात्यासाहेब. ( रामराव उठतात आणि बेचैन होऊन होऊन जागच्या जागी फिरतात. ) तुम्हांला मी शपथेवर सांगतो... असं खोटं सांगून...

तात्या : ( शांतपणे ) तुमच्या घरी बसून...विनायकराव, आणि तुमचा चहा पिऊन मी तुमचा खरेखोटेपणा करणं हे बरं दिसत नाही...

विनू : चार वर्षांपूर्वी मी आणि आई हृषीकेशला निघालो होतो... वाटेत अलाहाबादला आमच्या मोटारीवर ट्रक आदळला...आई जागच्या जागी ठार झाली... मी गंभीर जखमी झालो होतो. दोन महिने मी हॉस्पिटलमध्ये होतो.. ( टेबलावरची दैनिकाची घडी उघडून दाखवतो. ) हे वाचा...हे वाचा.

तात्या : ( पेपराकडे न बघता ) वाचलंय् आम्ही ते. तेवढ्यासाठीच तर आलो इथं प्रत्यक्ष.

विनू : आता हेही खोटंच, असं तुम्हांला म्हणायचंय् ?

[ रामराव हळूच मागे जातात आणि माडीचा दरवाजा मिटून घेतात. ]

तात्या : ( मंदपणे हसत ) मी सांगितलं ना तुम्हांला ? तुमच्या घरी बसून मी तुमचा खोटेपणा सिद्ध करणार नाही. एवढंच सांगतो, की हे जमायचं नाही. जुळून यायचं नाही.

विनू : ती तुमची मर्जी. पण आईचं अपघाती निधन झालं, यात खोटेपणा नाही.

[ रामराव बेचैन होऊन आरामखुर्चीत बसतात. बोटे मोडू लागतात. ]

तात्या : आता मी सांगू का तुम्हांला खरी माहिती ? ती सांगण्यात मला आनंद होतोय् , अशातली गोष्ट नाही...तरीही सांगतो...तुमची आई अमरावतीच्या आश्रमात आहे... ( उठू लागतात ) मला वाटतं, रामराव.... विनायकराव, आता मी उठावं, हे बरं. मला क्षमा करा. ( जाणार, तोच माडीचे दार पटकन लोटून सीताबाई बाहेर येते. )

सीता : थांबा...

[ ती पुढे येते. रामराव आणि विनू गर्भगळित होतात. ती एक एक पाऊल पुढे येते... तात्यासाहेब दचकून गोंधळतात. ]

तात्या : आपण कोण ?

सीता : मी सीताबाई, यांची ( रामरावांची ) पत्नी...याची ( विनूची ) आणि वीणाची आई.

तात्या : नमस्कार... ( गडबडून भुताकडे पाहावे, तसे पाहत उभे राहतात. )

सीता : जरा बसता का ? ( तात्यासाहेब अवघडून बसतात. ) मला तुमच्याशी थोडं बोलायचं आहे. ( ती पटकन पेटी पुढे ओढते आणि झरझर बोटे फिरवून एक गोड सुरावट निर्माण करते. )

तात्या : ( एकदम खूश होऊन दाद देतात... ) वाहव्वा ! वाः ! वाः ! सुरेख... सुरेख.

सीता : तुम्ही येण्याआधी पेटी वाजवत होते, ती मी !... मी पंडित गंगाधरबुवा साठ्यांची थोरली मुलगी...

तात्या : अरे, वाः वाः ! तुमच्या बोटांत ती जादू असली, तर नवल नाही...

सीता : तुम्ही रेखाची बोटं बघत होता... तुम्हांला पारख असणार, ही बोटं पाहा.... ( दोन्ही हातांची वाकडी बोटे पुढ्यात धरते. ) पूर्वी लांब, नितळ... निमुळती होती...आता दुर्दैवानं वाकडी झालीत...तरी सुद्धा ती कलावंताची आहेत.

तात्या : ( उठण्याचा प्रयत्न करीत ) निघू का मी ?

सीता : जरा थांबा. यांनी तुम्हांला माझ्यासंबंधी जी माहिती दिली होती, ती खोटी होती. ती खोटी होती, असं तुम्ही म्हणताय्, ते खरं आहे; पण त्यांनी तो खोटेपणा का केला, ह्याचा तुम्ही विचार करा. लोकांच्या खोट्या समजुतीतून सुटका करून घेण्यासाठी त्यांनी हा खोटेपणा केला... मला चार वर्षांपूर्वी रोगाची भावना झाली... तेव्हा तो माझा रोग सांसर्गिक नव्हता.... शिवाय हा रोग इतर काही रोगांप्रमाणे आनुवंशिक नाही. आणि आता तर गेले नऊ महिने मी रोगमुक्त आहे... डॉक्टरांनी पुन्हा पुन्हा चाचण्या घेतल्या... मी साफ.... स्वच्छ बरी झाले आहे.... ( सर्टिफिकेट काढून देते... ते वाचू लागतात ) हे डॉक्टरांचं सर्टिफिकेट ! डॉक्टरी शास्त्राप्रमाणे सिद्ध झालंय्, की मी आता रोगी नाही... आता या रोगाला प्रतिबंध करणारी लसही या देशात तयार झालीय्... प्रश्न आहे, तात्यासाहेब, तुम्ही शास्त्राला मानणार, की खुळ्या-खोट्या समजुतींना चिकटून राहणार ? ( तात्यासाहेब सर्टिफिकेट वाचून परत देतात. ते पोलक्यात ठेवीत ) महत्त्वाचं म्हणजे शास्त्राच्या म्हणण्यानुसार हा रोग आनुवंशिक नाही...

(ती अपेक्षेने तात्यासाहेबांच्या तोंडाकडे बघत राहते.... तात्यासाहेब जायला उठतात.)

तात्या : (मंदपणे हसत...सुटका करून घेण्यासाठी) कळतं... पण वळत नाही, असं म्हटलं पाहिजे....जातो मी.... (नमस्कार करीत) तुम्हांला अधिक चांगला जावई मिळेल, असा आशीर्वाद देतो...(जातात.)

सीता : (त्यांना पाठमोरे पाहत) वळत नाही.... कळत नाही. म्हणून आमच्यासारख्याचा छळ होतो....आम्हांला जिवंतपणी मरावं लागतं....

[तिचा आवाज बोलता बोलता दाटून येतो...समोरचे दैनिक ती उचलते आणि ती जाहिरात वाचता वाचता तिच्या डोळ्यांतून पटापट टिपे गळतात... ती पदराने डोळे टिपता टिपता काळोख होतो...]

**का ळो ख**

**प्र का श**

[स्थळ तेच. रामरावांच्या बंगल्यातील दिवाणखाना. दोन–तीन तासांनंतर रात्रीचे नऊ वाजले असावेत. रामराव आपल्या टेबलापाशी बसून टेबल-लॅम्पच्या प्रकाशात आपल्या वकिलीचे कागदपत्र वाचत आहेत. मध्येच 'लॉ-रिपोर्टर'सारखा ग्रंथ चाळत आहेत. दिवाणावर सीताबाई बसली आहे... पाय वर घेऊन, भिंतीला टेकून. ती एक कादंबरी वाचते आहे. पार्श्वभूमीला दुरून एखाद्या दिंडीचा–टाळ मृदंगाचा–भजनाचा आवाज येतो आहे. रामरावांचे आपल्या कामात फारसे लक्ष नसावे. कारण मध्येच ते बाजूला मान वळवतात आणि चश्म्याच्या वरून सीताबाईकडे बघतात. दोन क्षण असेच जातात. तेवढ्यात स्वैपाकघरातून घाईघाईने रेखा येते. कामात असल्यामुळे तिने पदर खोचला आहे. ती बाहेर येते आणि...]

रेखा : चला, अण्णा, जेवायला येता ना ?

[सीताबाई काहीच ऐकू न आल्याप्रमाणे वाचनात मग्न आहे.]

रामराव : हो. (टेबल आवरत, टेबल-लॅम्प घालवीत) चिनू कुठं गेला ?

रेखा : ते आधीच येऊन बसलेत. तुम्ही चला.

रामराव : नीता जेवली ?

रेखा : ती तिकडे आईकडे राहिलीय्...ये म्हटलं, तर येईना.... फार हट्टी झालीय्... (आत जाते.)

रामराव : ( आत जाता जाता सीताबाईला ) मी जेवून येतो....तू मागाहून बसणार ?

[ते आत जाऊ लागतात. ती उत्तर देत नाही. फक्त पुस्तकातून नजर उचलून रामरावांना पाठमोरे पाहते. ते आत जातात. ती पुन्हा पान उलटते आणि वाचू लागते, तेवढ्यात रेखा परत येते. ]

रेखा : आई, तुम्हांला वाढून इथं आणू का ?

सीता : (वाचता वाचता) नको.

रेखा : का ?

सीता : मी हल्ली रात्रीची जेवत नाही.

रेखा : एखादी भाकरी आणि थोडं भरीत खा...एवढं हौसेनं केलंत, ते...

सीता (तिच्याकडे बघत) नको !

रेखा : बरं. (ती घाईघाईने आत जाते. )

[ सीताबाई पुन्हा कादंबरी वाचू लागते. तेवढ्यात घाईघाईने वीणा येते. ]

वीणा : ( सीताबाईला हलवत ) तू चल ना, ग, आई, जेवायला.

सीता : छे छे, ग, मी कुठं हल्ली रात्रीची जेवते ?

वीणा : थोडंसं काही तरी खा ना....एवढ्या वर्षांनंतर आलीस...

सीता : नको. तू जेव जा.

वीणा : एवढं काय वाचते आहेस ?

सीता : कादंबरी... ' शुभा '...श्री. रा. बिवलकरांची... (तिच्या केसांवरून कौतुकाने हात फिरवीत) जोगांनी नकार दिला, म्हणून तुला वाईट नाही ना वाटलं ?

वीणा : छे, ग. मला काहीसुद्धा वाटलं नाही. (सीताबाई तिच्या तोंडाकडे बघत राहते.) आई, तू एकदम अशी गप्प गप्प का ?

सीता : सारखी त्या नीताची आठवण येते मला. तिचा वाढदिवस, म्हणून मी आज घाईघाईनं आले ..माझ्यामुळं तिचा वाढदिवस रद्द झाला... बिचारी अगदी हिरमुसली असेल. (रेल्वेची एक शिट्टी ऐकू येते.)

वीणा : मुद्दाम ती तिला तिथं आईकडे ठेवून आलीय्... ( थांबून ) काही हरकत नाही... कुठं जाऊन राहायचं असलं, तर राहा, म्हणावं.... अण्णा असेपर्यंत

तुला काळजी नको. (सीता तिच्या डोळ्यांत बघत राहते. तेवढ्यात आतून 'वीणा, चल लवकर जेवायला.... वीणा' अशी रेखाची हाक ऐकू येते.) मी तुला काही सांगेन, म्हणून हाका मारतेय्...कमी नाही...

सीता : तू जा जेवायला....जा. ते थांबले असतील..

वीणा : (उठून) तुला जेवायचं नसलं, तर नुसती आत येऊन बस तरी.

सीता : नको. (गंभीरपणे) तेवढ्यात ही कादंबरी संपवते.

वीणा : एवढं आहे काय या कादंबरीत ?

सीता : उद्या वाच तू...(विनूची आतून हाक ऐकू येते. 'वीणा, तुला जेवायचं, की नाही ?') जा तू...तो ओरडतोय्, बघ.

वीणा : मग तू थोडं दूध तरी घेणारेस का ?

सीता : नको, ग, खरंच नको.

वीणा : (हसत) घरात दूध नाहीच आहे, म्हणा.... अण्णांनासुद्धा आज दूध नाही. पण तू घेणार असशील, तर बाहेरनं आणता येईल.

सीता : घरात का नाही दूध ? मी मघाशीच चरवी भरून दूध काढलं, ते ?

वीणा : (चोरट्या आवाजात) रेखानं ते केळीच्या मुळात ओतून टाकलं... (जायला निघते.... थोडी जाते आणि परत येऊन चोरट्या आवाजात) तिला विचारू नकोस हं मात्र ! माझ्या नावानं मग जळफळणार.... आणि विन्या भांडत बसणार.

[ती धावत आत जाते. सीताबाई खिन्न होते. विचारात मग्न होऊन कुठं तरी बघत राहते. रेल्वेच्या दोन शिट्ट्या आणि इंजिन सुरू झाल्याचा आवाज ऐकू येतो... तेवढ्यात नाटेकर येतात. येतात, ते तिचे पाय धरून पायांवर डोके ठेवतात.]

नाटेकर : (सद्गदित होतात.) आईसैब, मला आज पराकाष्ठेचा आनंद झालाय्. हा दिवस आमच्या भाग्याचा आहे...

सीता : (त्यांच्या डोक्यावरून हात फिरवीत) नाटेकर, बरे आहात ना ?

नाटेकर : (उठत) होय, आईसैब. (अदबीनं उभे राहतात.)

सीता : उभे का ? बसा ना.

नाटेकर : (मोढ्यावर बसत) तुम्ही जेवायला नाही गेलात आत ?

सीता : (एकदम गंभीर होत) नाही...मी हल्ली रात्री जेवत नाही.

नाटेकर : मग दूध घ्या थोडं. कालच केदार आणून ठेवलंय्.

सीता : घेईन मग.

[ती कुठेतरी बघत शांत बसून राहते. दोन क्षण तसेच जातात.]

नाटेकर : (थोड्याशा उत्साहाने) मी उद्याच्या उपासाचं सामान आणायला बाजारात गेलो आणि तुम्ही आलात. मी बाजारातनं आलो, तर अकोल्याचे जोग येऊन बसले होते.... तेवढ्यात जरा घरी जाऊन आलो. (थांबून, थोड्या उत्साहाने) आज सकाळपासून मला एकसारखं वाटत होतं....तुम्ही आज-उद्या येताय्, म्हणून... (ती त्यांच्याकडे बघत राहते.) उद्या उपासासाठी वैनीसैबांनी मऊ रताळी, साबुदाणा आणि शेंगदाणा आणायला सांगितला... (स्वतःशीच हसत) पण मी येताना डझनभर हलव्याची केळीही आणलीत.... तुम्ही याल, म्हणून... तुम्हांला उपासाला केळ्यांचा हलवा फार आवडतो....

सीता : (स्वतःशीच बोलल्यासारखी) एकट्या तुम्हांलाच तेवढी आठवण आहे. (आठवत...जड आवाजात) मला आठवत आहे, नाटेकर, दोन वर्षांपूर्वी एकदा एकादशीलाच तुम्ही अमरावतीला आला होतात.... मला भेटायला... येतान डबा भरून केळ्यांचा हलवा आणला होता तुम्ही.... तुम्ही तुमच्या हातानं करून....(दुरून दिंड्यांचा सूक्ष्म आवाज ऐकू येतो.)

नाटेकर : (जरा घाबरून) इथं ते सांगू नका कुणाला... उगाच चिडतील माझ्यावर... जास्त करून वैनीसैब.

सीता : छान केला होता पण तुम्ही हलवा. माझ्या जिभेवर राहिलाय् केशराचा वास तर...

नाटेकर : (लाजून हसत) केशर इथनंच नेलं होतं मागून.... हिला हलवा खावास झालाय्, म्हणून खोटं सांगून. उद्या उपासाचा हलवा करून खा. छान आहेत केळी. (दिंड्यांचा आवाज थोडा जवळ येतो.) या वर्षी खूप दिंड्या बाहेर पडल्यात. उद्या चिखलीच्या विठ्ठल मंदिराकडे बघायला नको. चिखली म्हणजे आमची पंढरी. (थांबून) तुमचं पंढरपूरला जायचं तसंच राहिलं. इच्छा असेल, तर उद्या चिखलीला जाऊ. (उत्तरासाठी वाट बघतात. ती उत्तर देत नाही.)

सीता : (एकदम) तुमच्या राधाबाईचं आता कसं आहे?

नाटेकर : बरी आहे.

सीता : उठून बसतात?

नाटेकर : छे! आता गेले सहा महिने तर तिची वाचाही गेलीय्....

सीता : मग बरी काय?

नाटेकर : बरी म्हणायची.

सीता : उद्या येऊन त्यांना बघून जाईन.

नाटेकर : या....या. तुम्ही तिच्या डोक्यावरनं, केसांवरनं हात फिरवलात, तर तिला खूप आनंद होईल....खूप आनंद होईल....रडेल ती...तुमच्याशी बोलता येत नाही, म्हणून.

सीता : येईन मी... सकाळीच येईन...

नाटेकर : वाचा जाण्याआधी वर्षभर माझ्यामागे लागली होती....माझे डोळे उघडे असे-पर्यंत दुसरं लग्न करा, म्हणून....दुसरं लग्न. ( आपलं अंग आवळून घेत स्वतः-शीच विकट हसतात.)

सीता : मग करावं....

नाटेकर : छे, हो !

सीता : तुम्हांला सुख नाही मिळालं. गेली कित्येक वर्षं ती बिछान्याला खिळलीय्.

नाटेकर : ( कपाळावर बोटे ओढत ) सुख इथं हवं. इथं नसलं, तर ते कुठंच मिळणार नाही.

सीता : तुम्ही म्हणून तिची एवढी सेवा करता, नाटेकर !

नाटेकर : त्यातसुद्धा एक प्रकारचं सुख आहे, आईसैब. ( ती ऐकत राहते. ) खूप वर्षां-पूर्वी आमच्या स्वामींनी मला सांगितलं होतं. स्वतःला सुख नाकारून दुसऱ्याचं दुःख आपलं करायला शीक...त्यात तुला सुख मिळेल. स्वतःच्या सुखापेक्षा... ( तेवढ्यात ढेकर देत रामराव येतात. बोलणे अर्ध्यावरच टाकून नाटेकर अद-बीने उभे राहतात. सीताबाई पटकन पुस्तक उघडून वाचू लागते. )

रामराव : नाटेकर, तुम्ही आता जेवा आणि घरी जा.

नाटेकर : होय, सैब. ( तसेच उभे राहतात. सीताबाईकडे बघत खालच्या आवाजात ). उद्या चिखलीला...

रामराव : नाटेकर, तुम्ही उभे का ?

नाटेकर : जातो, सैब. ( बाहेर जातात. )

रामराव : ( शतपावली घालतात. काही क्षणांनंतर शतपावली घालता घालता ) एवढं कसलं वाचन चाललंय् तुझं ?

सीता : ( हातात पुस्तक उघडेच. पटकन वर बघत ) वांग्याचं भरीत खाल्लंत ?

रामराव : ( एकदम तिच्याकडे वळून बघतात ) वाः ! किती दिवसांनी खाल्लं .

सीता : आणि भाकऱ्या ? आपला घरचा....पालीचा जोंधळा ना ?

रामराव : ( शतपावली घालत ) म्हटलंच मी...या तुझ्या हातच्या भाकऱ्या ! त्यामुळं थोडं जास्त जेवलो... ( ढेकर देतात. कृत्रिम...एकदम विषय बदलण्यासाठी ). मघाशी कविता म्हटलीस, ती....छान होती....म्हण बघू परत एकदा.

सीता : ( कविता म्हणण्यात तिचे मन नाही. तरीसुद्धा म्हणते.)

'असे हजारांसंगे आहे
जडलेले माझे नाते
असेच आहे आणि तरीही
अनोळखी मी सदाच राही

दूर हजारांपासुनी आहे
विजनामधि माझे घरटे
मीपण भरले जगात माझे
जे आहे माझ्यापुरते ...'

रामराव : (आरामखुर्चीत बसत.) छान आहे, कविता...तू ती म्हणतेसही छान. आता मला आठवलं...ती तू तुझ्या पत्रात लिहिली होतीस...

सीता : कशी आठवणार तुम्हांला ? तुम्ही ती कविता वाचलेलीच नाही.

रामराव : (एकदम वळून) कशावरून ?

सीता : कारण माझी पत्रं तुम्ही कधी फोडलीच नाहीत.

रामराव : (आश्चर्य व्यक्त करीत) काय म्हणतेस तू....सीता ?

सीता : खोटं ? (ती रामरावांकडे बघत राहते. रामराव बोलत नाहीत.) गेल्या चार वर्षांत एकही पत्र तुम्ही फोडलं नाही. उघडलं नाही. (आवाज कातर होतो) गेल्या चार वर्षांतल्या सगळ्या पत्रांचा गठ्ठा माडीवर पडला आहे. धूळ खात...

रामराव : तू आता माडीवर कशाला गेलीस ?

सीता : आता नाही. भवाशी जोग आले, तेव्हा तुम्हीच दोघांनी मला माडीवर घालवलंत ना ? (थांबून) पत्राचं पाकिट फोडलं असतं, तर तुम्हांला माझ्या स्पर्शाचा संसर्ग झाला असता. आश्रमातले रोगी हातमाग चालवतात....त्यांनी तयार केलेली बॅंडेजीस् देशभर हॉस्पिटलात सगळीकडे वापरली जातात... आणि तुम्हांला माझ्या पत्राचा संसर्ग...आधी कळतं, तर एवढा जीव टाकून पत्रंच मी लिहिली नसती.

[पदराने डोळे पुसते. काय बोलावे, ते रामरावांना सुचत नाही. त्यांच्या सुदैवाने तेवढ्यात वीणा जेवून येते. वीणाला बघताच सीता स्वतःला सावरते... पुस्तक वाचू लागते...क्षणापूर्वी आपण रडलो, हे तिला कळू नये, म्हणून....]

वीणा : (तिच्या शेजारी गुडघे टेकून बसत) कसली कादंबरी एवढी मन लावून वाचते

आहेस ?....आहे तरी काय त्यात ?

सीता : ह्यात काय आहे, ते तुला उद्या सांगते. ( तिच्या गालावर चापटी मारीत ) तू आता झोप जा...जा...उपास ना आज तुझा ?...जा...झोप....( ती उठते आणि आत जाते. )

वीणा : ( जाता जाता ) उद्या मला दे हं वाचायला-( आपल्या खोलीत जाते.)

[ विनू जेवून बाहेर येतो. दिवाणखान्यात शतपावली घालतो. सीताबाई वाचत राहतात. रामराव उठून टेबलाकडे बसतात. टेबल-लॅम्प लावतात आणि आपल्या वकिलीचे पेपर्स वाचू लागतात. मध्येच रेखा पाण्याचा तांब्या आणि फुलपात्र आणून सीताबाईंच्या खोलीत ठेवून येते. मग तसाच तांब्या-फुलपात्र घेऊन आपल्या खोलीत जाते. जाताना आपल्या खोलीच्या बाजूचा दिवा घालवते. झोपण्याची वेळ सूचित करण्यासाठी.]

विनू : ( सीताबाईला ) आई, तू आता झोपत का नाहीस ? दिवसभरच्या प्रवासानं थकली असशील ?

[ पुन्हा दिंड्यांचा सूक्ष्म आवाज येतो. ]

सीता : वांग्याचं भरीत खाल्लंस ? की आपलं...

विनू : म्हणजे काय ?....छान झालं होतं....( घाईघाईने झोपायला जातो.) झोप जा तू ..( आत जातो. )

सीता : ( रामरावांना ) यानं खाल्लं नसणार. म्हणून मी एकाच वांग्याचं केलं....म्हटलं, उगाच टाकायला नको...खाणार तुम्ही...आणि...आणि....मी....

रामराव : तू तर जेवत नाही म्हणालीस...

सीता : का नाही ? रात्रीची आश्रमात जेवत होते मी.

रामराव : मग नाही का म्हणालीस ?

सीता : ( आवाज चढवून ) कुणी बोलावलं का मला ? तू जेवायला आत ये, असं कुणी म्हणालं मला ? ( ती रागाने थरथरते.)

रामराव : ( अपराधी आवाजात ) तू नको म्हणालीस....

सीता : रेखानं वाढून ताट बाहेर आणू का, म्हणून विचारलं...म्हणून मी नको म्हणाले...तुम्हांला मला आत बोलवायला हरकत नव्हती.

रामराव : तू जेवायचं नाही म्हणालीस.

सीता : ( आवाज चढवून ) जेवायचं नसलं, तरी तुमच्या पाठीमागे उभी राहिले

असते...तुम्हांला जेवताना ठसका लागेल, म्हणून. मला बाकीच्यांची पर्वा नाही....पण मला एकमेव आधार तुमचा. ( मुळूमुळू रडू लागते. )

रामराव : चुकलं माझं. रडू नकोस आता...तुला दूध आणायला सांगू का ?

सीता : नको...तुम्ही घ्या...तुम्हांला मी गरम करून आणून देते...केशर लावून...

रामराव : छे...छे...मला नको...

सीता : का ?

रामराव : मी हल्ली दूध घेत नाही....दोन वर्षे झाली. मला त्रास होतो.

सीता : असू दे ! नाही तरी घरात दूध नाहीच आहे.

रामराव : का ?

सीता : गाईचं दूध मी माझ्या हातानं काढलं, म्हणून ओतून टाकलं तिनं.

रामराव : ( चिडल्यासारखे दाखवीत ) कुणी ? रेखानं ? उद्या सांगायला पाहिजे तिला.

सीता : असू दे. सहज विचारलं मी ! म्हटलं, माझ्या हातचं, म्हणून नको असेल दूध.

रामराव : काहीतरीच तुझं. आता तू साफ बरी झाली आहेस, हे कळत का नाही मला ?

सीता : नाहीतर...जोग म्हणाले, तसं. कळतं, पण वळत नाही.

[ दिंड्यांचा आवाज थोडा जवळ ऐकू येतो. ]

रामराव : ( तो आवाज ऐकत ) तुला पंढरपूरला जायचं का ?

सीता : ( स्वतःशीच बोलल्यासारखी, कडवट हसत ) म्हणजे एकदाची कुठं तरी जा.

रामराव : जा, असं मी म्हटलंय् का ?

सीता : जा, असं म्हणावंच लागतं का ?

रामराव : ( आपल्या कामात लक्ष घालीत ) मला वाटतं, तू आता आत जाऊन झोपावंस.... ( कामाचे कागद वाचू लागतात. )

सीता : ( स्वतःशीच ) मला इथं आल्यापासून वाटतंय्...मी इथं येण्यात चूक केली, की काय ?

रामराव : पण असं कुणी म्हटलं का ?

सीता : ( दुर्लक्ष करीत स्वतःशीच ) रोगमुक्त झालेल्या लोकांना त्यांच्या घरी परत स्वीकारलं जावं, म्हणून प्रेमाताई प्रचाराचं कार्य करणार आहेत... त्यांना मला मदत करायचीय्... त्यांच्या बरोबर घरोघरी जाऊन मला सांगायचं होतं... बघा, मला माझ्या घरी माझ्या नवऱ्यानं स्वीकारलंय् ... मी पूर्वीसारखीच

त्यांची बायको आहे. ( रामराव काही बोलतील, म्हणून वळून त्यांच्याकडे बघते पण ते बघत नाहीत, किंवा बोलत नाहीत. तेवढ्यात स्टेशनावरून दोन करूण, उदास अशा शिट्ट्या ऐकू येतात... मग ती स्वतःशीच बोलू लागते. ) आश्रमात रात्री बिछान्यावर अंग टेकलं... की रात्रीच्या शांत वातावरणातून अमरावती स्टेशनवरल्या अशा शिट्ट्या ऐकू यायच्या आणि... या घराची ... घरातल्यांची आठवण होऊन मन व्याकूळ व्हायचं... जीव कासावीस व्हायचा.... तेच हे घर आता किती बदललंय्... ( डोळ्यांना पदर लावते. )

रामराव : हे बघ... तू लहान–सहान गोष्टींतून अर्थ काढून दुःख करीत बसू नकोस. ( थांबून ) त्यापेक्षा तू असं का करीत नाहीस ? ( ' कसं ? ' या अर्थी ती) बघत राहते. ) तू पालीला का जाऊन राहत नाहीस ? म्हणजे तुला कोणाचा त्रास होणार नाही.

सीता : त्रास मला कोणाचा ?... की माझा कोणाला ?

रामराव : तू मागे म्हणायचीस ना ? पालीला जाऊन राहते... पालीला जाऊन राहते...

सीता : त्या वेळची गोष्ट वेगळी होती. आता का तिथं जाऊन राहू टाकलेल्या बायको-सारखी ?

[ तिचा आवाज रडवेला होतो. रामराव एकदा आपल्या टेबलावरचा ग्रंथ उघडून त्यात डोके घालतात. ती स्वतःलाच सांगितल्यासारखी बोलते... ]

सीता : गेल्या चार वर्षांत अडीच हजार लोकांबरोबर राहिलेय् मी. दुःखाचे अनेक थर मी पाहिले आहेत...आता मी कोणाच्या आधारासाठी चाचपडणार नाही.

[ रेल्वेची एक शिट्टी वाजते. पाठोपाठ दोनदा गाय गोठ्यात हंबरते. ती उठून जाऊ लागते... ]

रामराव : ( दचकून ) सीता, तू या वेळी कुठं चाललीस ?

सीता : ( वळून ) गोठ्यात.... कावेरी हंबरतेय्.... माझ्यासाठी. ( ते बघत राहतात. ) तिच्या पाठीवरनं हात फिरवून येते. ती प्रेमानं माझी बोटं चाटेल....

[ बाहेर जाते. ती बाहेर जाईपर्यंत रामराव तिला पाठमोरी बघतात. ती अदृश्य होताच ते उठतात. आरामखुर्चीत बसतात. डोक्यावर हात घेऊन बसतात. त्यांना झोप येते. पण ते मांडीवर टेबलावरचे कागद घेतात. गोठ्यात गाय हंबरते. ते क्षणभर मान मागे टेकून झोपतात. काही क्षणांनी सीताबाई परत

येते. मुख्य दरवाजा बंद करते. तरी रामराव झोपलेले.]

सीता : झोपलात ? आत झोपा, जा. ( तिच्या आवाजात दुःख आहे. )

[ एकदम दचकून उठत–मांडीवरचे कागद डोळ्यांसमोर धरतात. ]

रामराव : मला थोडं वाचायचंय् ... तू झोप जा.

सीता : मला आज रात्री झोप येईलशी दिसत नाही.

रामराव : का ?

सीता : आमची दुःखं म्हणजे मुंग्यांचं वारूळ फुटल्यासारखी.

रामराव : काही दुःखं नाहीत ... आपण उगाच भलते सलते विचार करू नतये.

सीता : ( शेपटीवर पाय पडावा, तशी ) उगाच ? भलते सलते विचार ? गोठ्याच्या पलीकडे जाऊन पाहा....

रामराव : काय झालं ?

सीता : काय झालं ? गायरीत जाऊन पाहा... मी केलेल्या सगळ्या भाकऱ्या टाकल्यात... सगळं भरीत टाकलंय् .... ( रडत ) निदान माझ्या कावेरीच्या पुढ्यात तरी टाकायच्या... ( ती रडत राहते.... रामराव बघत राहतात. ती दिवाणावर पाय घेऊन बसते. आणि पुस्तक उघडते. )

रामराव : तू आता झोप जा शांतशी.

सीता : ( स्वतःशीच ) या कादंबरीतल्या नायिकेला एकदा स्वप्न पडतं, तसं एकदा खरंच व्हायला पाहिजे...

रामराव : काय ? कसलं स्वप्न ?

सीता : ही बावीस–तेवीस वर्षांची नायिका... तिला हा रोग झालेला... सांसर्गिक... तिची गावातल्या सर्व लोकांनी नाकेबंदी करून तिचा एवढा छळ केला, की तिला पिण्याचं पाणीसुद्धा मिळेना, मग एका रात्री तिला स्वप्न पडलं.... ती आणि तिचे वडील पिण्याच्या पाण्यासाठी...विहीर खोदताहेत.... खोदखोद... खोदताहेत... पण पाणी लागत नाही... चिकाटीनं पृथ्वीच्या पोटात हजारो मैल खोदत राहतात. पिण्याच्या पाण्यासाठी पृथ्वीच्या केंद्रबिंदूपर्यंत ती दोघं खोदत, खणत जातात... आणि एकदम पवित्र, खळखळणाऱ्या जळाचा मोठा झरा लागतो. ती मुलगी पाणी पिण्यासाठी धावते... वडील तिला अडवतात... म्हणतात... हे या जगाचं मूळ जल आहे. जगभर हे जातं ... तू त्याला स्पर्श करू नकोस. भ्रष्ट करू नकोस... मुलगी म्हणते, नाही. मी त्या पाण्यात माझे पाय घालणार... जगाला ते पाणी पिऊ दे... त्यांना हा रोग होऊ दे. मग

त्यांना आम्हांला काय वाटतं, ते कळेल. आमच्या व्यथांची जाणीव होईल... ती त्या पाण्यात...

रामराव : (ते वर्णन असह्य होऊन) थांब! पुरे झालं ते ओंगळवाणं स्वप्न! आत जा– आणि झोप जरा स्वस्थशी.

सीता : (उठत) आणि तुम्ही ?

रामराव : मला वेळ आहे.... मला केसपेपर्स वाचायचेत...

[सीता काय समजायचे, ते समजते आणि आत जाते. क्षणभर रामराव वाचण्याचे सोंग करतात. पार्श्वभूमीला दिंड्यांचा आवाज. स्टेशनवरून एखादी दुसरी शिट्टी. इंजिनचा आवाज. थोडा वेळ गेला, हे सूचित करण्यासाठी प्रकाश आणखी थोडा मंद होतो. ते उठतात. खोलीत जातात. दिंड्यांचा आवाज ऐकू येतो. दुसऱ्या क्षणी रामराव उशी आणि चादर घेऊन बाहेर येतात. दिवाणावर चादर पसरतात. उशी ठेवतात आणि बसतात– तेवढ्यात दारात सीता उभी दिसते. ते दचकून तिला बघतात. तीही क्षणभर काही न बोलता त्यांच्याकडे बघत राहते.]

रामराव : (अपराधी आवाजात) इथंच मी झोपतो मी! आत फार उकडतंय्....

सीता : झोपा! मी आतच झोपते! मला इथं फार उकडतंय्–

[ती पटकन आत जाते आणि धाडकन दरवाजा लावून घेते. रामराव तसेच बंद दाराकडे बघत राहतात. दिंड्यांचा आवाज.]

रामराव : (स्वतःशीच) जोग म्हणाले, तेच खरं! कळतं, पण वळत नाही! तिच्या स्पर्शाला धोका नाही, हे कळतं.... तरीसुद्धा!

[दीर्घ सुस्कारा टाकतात आणि देवाला नमस्कार करून झोपतात. रेल्वेच्या इंजिनाचा आवाज. दिंड्यांचा आवाज.
हळूहळू काळोख होत जातो.
घड्याळाचे चार टोल पडतात. दूरवर कुत्री भुंकल्याचा आवाज येतो. तेवढ्यात शांतपणे खोलीचे दार उघडून सीताबाई बाहेर येते. तिच्या हातात भरलेली पिशवी आहे. टेबलावर बसून ती पत्र लिहिते. पत्र टेबलावर ठेवते. क्षणभर झोपलेल्या रामरावांना पाहते. घराचा दरवाजा उघडण्याआधी एकवार घरावर नजर टाकते. आणि दरवाजा उघडणार, तोच– वीणा आपल्या खोलीतून बाहेर

येते. ती सीताबाईकडे बघते, तोच गाय हंबरते. ]

वीणा : आई... आई... (ती रडवेली होते.)

सीता : (दबलेल्या आवाजात) तू कशाला उठलीस ?

वीणा : कुठं चाललीस तू ?

सीता : पुन्हा आश्रमात...

वीणा : (रडत) मी येते तुझ्याबरोबर... (आईला एकदम मिठी मारते. रडते.)

सीता : रडू नकोस ! ते जागे होतील–झोपू दे त्यांना.... त्यांच्या मनावर ताण आहे...

रामराव : (दचकून जागे होतात.) कोण ? सीता ?

वीणा : (रडत) बाबा, आई परत आश्रमात जातेय् ...

रामराव : सीता, तुला वेड लागलंय्, की काय ?

सीता : दुसरा मार्ग नाहीय् मला ! मी इथं नकोशी झालेय् ...

रामराव : (पुढे येत) कुणालाही नकोशी झालेली नाहीस....

सीता : नुसतं बोलल, म्हणजे झालं ? अजून तुम्हांला माझ्या स्पर्शाची भीती वाटतेय्.... वीणाला वाटत नाही, आणि तुम्हाला ?

रामराव : नाही, ग, सीता ! (एकदम आवेगाने तिचे दोन्ही हात हातांत घेतात. आता नाही मी भीत.... (ती एकदम जवळ येऊन त्यांच्या छातीवर मान टेकते.) आपण तिघंही पालीच्या घरात राहू ...चल...(गाय हंबरते.)

सीता : (डोळे पुसत) आणि आपल्या कावेरीलाही पालीला नेऊ– चला... जाता जाता थोडा वेळ नाटकरांच्या घरी जाऊ. राधाबाईंच्या केसांवरनं हात फिरवते तिला खूप बरं वाटेल.

रामराव : चल–

[ तिघेही जायला वळतात. गाय हंबरते. शर्टिंगचा धडधड आवाज होतो. ते तिघे दारातून जाताना गाडमोरे दिसतात आणि काळोख होतो. ]

पडदा

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शास्त्र
दा. क्र. 22292 नों. दि. 9/10/1986
वि. ............ क्र. ............
IRBK-0122212